9e<8

REFBK-0016960

REFBK-0016960

# मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना :— खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक / मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

[ क्र. मा. प. ]

# मधुघट

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थापना
अनुक्रम ... वि: ...
क्रमांक ... नों: दि: ...

संपादक

गं. भा. निरंतर, एम्. ए.
माजी मराठीचे अध्यापक
बृहन्महाराष्ट्र कॉलेज, ऑफ कॉमर्स, पुणे

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. १६९६०

मूल्य रु. ?.००

REFBK-0016960

व्हीनस प्रकाशन : पुणे

आवृती पहिली ऑक्टोबर १९४६
पुनर्मुद्रण डिसेंबर १९४७
पुनर्मुद्रण जून १९५४
पुनर्मुद्रण ऑगस्ट १९६२
पुनर्मुद्रण जानेवारी १९६८

सर्व हक्क प्रकाशकांचे स्वाधीन

प्रकाशक :
सदाशिव कृष्ण पाध्ये
व्हीनस प्रकाशन
*'तपश्चर्या'*
३८१ क, शनिवार पेठ : पुणे २

मुद्रक :
रा. ना. सरनाईक
सुलभ मुद्रणालय
२९१ शनिवार पेठ : पुणे २

# अनुक्रमणिका


| | | | |
|---|---|---|---|
| अर्वाचीन काव्य ( प्रास्ताविक )— | ... | ... | १ |
| **१. भा. रा. तांबे—परिचय** | ... | ... | ३३ |
| १ गेली ज्योति विझोनिया | ... | ... | ४७ |
| २ पन्नास वर्षांनंतर | ... | ... | ४८ |
| ३ भयचकित नमावे तुज रमणी ! | ... | ... | ५० |
| ४ नववधू प्रिया, मी– | ... | ... | ५१ |
| ५ घन तमी शुक्र बघ० | ... | ... | ५२ |
| ६ रुद्रास आवाहन | ... | ... | ५३ |
| ७ रुणुझुणु ये ! | ... | ... | ५४ |
| ८ सहज तुझी हालचाल– | ... | ... | ५५ |
| ९ रिकामे मधुघट | ... | ... | ५६ |
| १० वाटेच्या वाटसरा ! | ... | ... | ५७ |
| **२. शं. के. कानेटकर** ( गिरीश ) **परिचय** | | | ५९ |
| १ भलरी | ... | ... | ६७ |
| २ शांतिस्थान | ... | ... | ६९ |
| ३ सारंगीवाला | ... | ... | ७२ |
| ४ कृतज्ञता | ... | ... | ७४ |
| ५ स्मृतिस्थळ ! | ... | ... | ७६ |
| ६ सुंदर हिरवे माळ ! | ... | ... | ७८ |
| ७ आईचा आशीर्वाद | ... | ... | ८० |
| ८ मानसमेघ | ... | ... | ८३ |
| ९ दौल्याची दिवाळी | ... | ... | ८६ |
| १० माळावरील शिरीष | ... | ... | ८८ |
| **३. मा. त्र्यं. पटवर्धन** ( माधव जूलियन् ) **परिचय** | | ... | ९१ |
| १ चांदण्यातील हुरहूर | ... | ... | १०१ |
| २ रसिकास | ... | ... | १०३ |
| ३ संगमोत्सुक डोह | ... | ... | १०५ |
| ४ सर्वा खल्विदं माया ! | ... | ... | १०८ |
| ५ चंदाराणी | ... | ... | ११० |

६ तेथे चल राणी ... ... ११२
७ आई ... ... ११५
८ दुबळ्यांचा न्याय ... ... ११६
९ ताजमहाल ... ... ११८
१० फटकळ अभंग ... ... १२०
**४. य. दि. पेंढरकर ( यशवंत ) परिचय** ... १२३
१ आई ... ... १३१
२ तुरुंगाच्या दारात ... ... १३३
३ मांडवी ... ... १३५
४ अखेरचे मागणे ... ... १३८
५ विहिरींचे गाणे ... ... १४०
६ जग-रहाटी ... ... १४२
७ शृंखलेस शाप आणि उःशाप ... ... १४४
८ वंदन तुज मायभूमी ... ... १४६
९ युगंधरांचे पालुपद ... ... १४८
१० द्या आम्हांला सुळी ... ... १५२
**५. वि. वा. शिरवाडकर ( कुसुमाग्रज ) परिचय** ... १५४
१ स्वप्नाची समाप्ती ... ... १६१
२ कोलंबसाचे गर्वगीत ... ... १६३
३ टिळकांच्या पुतळ्याजवळ ... ... १६५
४ हिमलाट ... ... १६७
५ बळी ... ... १६८
६ पृथ्वीचें प्रेमगीत ... ... १७०
७ अहि—नकुल ... ... १७२
८ क्रांतीचा जयजयकार ... ... १७५
९ मूर्ति-भंजक ... ... १७८
१० ताजमहाल ... ... १८०
**टीपा** ... १८३–१९०


( कविता उपलब्ध कालानुक्रमाने छापल्या आहेत )

# अर्वाचीन काव्य

१६९६०

## ६० वर्षांपूर्वी :

'अर्वाचीन काव्य' म्हणून ज्या काव्याचा उल्लेख होतो त्या काव्याचा इतिहास आता तितकासा अर्वाचीन राहिला नाही. कारण त्या काव्याचा आरंभ होऊन आता ६० वर्षे झाली. काव्यामध्ये काही तरी नवे वळण सुरू होऊन ६० वर्षे लोटली आहेत. ६० वर्षांपूर्वी ज्या कवींनी काव्यरचनेस आरंभ केला त्यांच्या काव्यांत त्यापूर्वीच्या काव्यापेक्षा काही स्पष्ट निराळेपण दिसते; म्हणून तेथपासून नवा कालखंड गणण्यास सुरुवात झाली.

**६० वर्षांपूर्वी** : म्हणजे १८८५ च्या सुमारास केशवसुतांनी काव्यरचनेस आरंभ केला. त्यांच्या काव्यसंग्रहातली कालानुक्रमे पहिली कविता १८८५ च्या दिवाळीत नोव्हेंबरमध्ये लिहिलेली आहे, आणि शेवटची कविता त्यांनी २५ मे १९०५ रोजीं लिहिलेली दिसते. केशवसुतांच्या कविता 'करमणूक' वगैरे पत्रांतून प्रसिद्ध होत होत्या; तरी त्यांच्या कवितांत काही नवीन वळण प्रगट होत असल्याची जाणीव त्यांच्या हयातीमध्ये वाचकांस झाली नाही. त्यांच्या मृत्यूनंतर बारा वर्षांनी (१९१७ मध्ये) हरी नारायण आपटे यांनी त्यांच्या कवितांचा संग्रह प्रसिद्ध केला. त्यांचे काव्य संकलित स्वरूपात पाहिल्यावर त्यातील वैशिष्ट्ये टीकाकारांच्या लक्षात आली आणि या कवीने काव्यात नवे युग सुरू केले आहे असा अभिप्राय कवीच्या मृत्यूनंतर १२ वर्षांनी व्यक्त होऊ लागला.

केशवसुतांपासून सुरू झालेले गेल्या ६० वर्षांतील काव्य केवळ कालानुक्रमाने अर्वाचीन नाही तर त्याचे अंतर्बाह्य स्वरूपही त्यापूर्वीच्या काव्यापेक्षा निराळे आहे.

मराठी काव्याचे केशवसुतांच्या काळापर्यंतचे स्वरूप पाहिले म्हणजे अर्वाचीन काव्याचे स्वरूप सहज लक्षात येईल.

**प्राचीन काव्य : संत कवी :**

मराठी काव्याच्या आरंभकाली आपणास ज्ञानेश्वरादिकांचे दर्शन होते. ज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथ, तुकाराम इत्यादी संत कवींनी विविध प्रकारची काव्यरचना केली. त्यांनी केवळ तत्त्वज्ञानावर ग्रंथ लिहिले नाहीत, तर हरिकथानिरूपण केले; तसेच वैयक्तिक भावना व्यक्त करणारे अभंगही रचले. या सर्व काव्यरचनेत त्यांचा हेतू परमार्थसाधन हाच होता. स्वतः परमार्थाचा मार्ग शोधीत तो इतरांनाही दाखवावा यासाठी त्यांनी काव्यरचना केली.

**वाग्विलास विस्तारूं । गीतार्थेंसी विश्व भरूं ।**
**आनंदाचा आवारूं । मांडूं जगा ।।**

अशी ज्ञानेश्वरांची आकांक्षा होती. एकनाथांनी आपल्या भावार्थ-रामायणात ग्रंथ कसा ‘ करावा ’ ते सांगितले आहे. ते म्हणतात :

**अफाट न करावा ग्रंथ ।**
**ग्रंथीं बोलावा मुख्यार्थ ।।**
**पदीं दावावा परमार्थ ।**
**हा निजस्वार्थ कवनाचा ।।** ( १–११८ )

जीविताच्या भलेपणाचे लक्षण सांगताना रामदास म्हणतात :

**ज्यानें प्रपंच साधून परमार्थ केला**
**तोचि भला रे भला !**

पण प्रपंच परमार्थाच्या आड येऊ लागला तर ?

**देवाच्या सख्यत्वासाठीं ।**
**पडाव्या जिवलगासि तुटी ।।**
**सर्व अर्पावें शेवटीं ।**
**देवापायीं ।।**

संतांची जीविताच्या सार्थकतेची कल्पना अशी असल्याने त्यांनी त्याच हेतूने काव्यरचना केली. या हेतूने लिहिलेल्या काव्याचे विषयही अर्थात हेतूस पोषक असेच होते. देवादिकांची चरित्रे सांगून आणि साधुपुरुषांच्या

जीवनकथा गाऊन ते संसाराचा फोलपणा आणि मानवी जीविताची नश्वरता काव्यांतून वारंवार सांगत. संसार, जग हे सर्व माया आहे, हे सर्व नश्वर आहे. तेव्हा नश्वरात न गुरफटता ईश्वराची वाट धरावी हेच त्यांच्या उपदेशाचे सार आहे. हा उपदेश करताना काव्याच्या बाह्य स्वरूपाकडे त्यांचे लक्ष नव्हते. सांगावयास आणि समजावयास सोपा असा काव्यरचनाप्रकार म्हणजे ओवी आणि अभंग; त्याचाच त्यांनी सर्रास उपयोग केला. सांगण्याच्या ओघात मूळच्या काव्यशक्तीमुळे काही उपमा-दृष्टान्त सुचत. एखाद्या प्रसंगी भाषेचा ओघ विषयानुरूप जमून जाई. परंतु रचनेविषयी त्यांनी हेतुपुरस्सर असे प्रयत्न केले नाहीत.

**सख्या विश्वंभरें बोलविलें ।**

अशी त्यांची आपल्या काव्याविषयीची भूमिका होती.

काव्यरचनेविषयी संतकवींनी मुद्दाम काही प्रयत्न केले नसले आणि केवळ परमार्थहेतूने त्यांनी रचना केलेली असली तरी काव्यगुणाच्या दृष्टीनेही त्यांचे काव्य संपन्न आहे. उत्तम काव्याचे सर्व विशेष त्या काव्यात सर्वत्र आढळतात. आपल्या श्रोत्यांच्या ठिकाणी त्यांनी भक्तीचे अमर्याद सामर्थ्य निर्माण केले. रामदासांनी तर महाराष्ट्रात चैतन्य उत्पन्न करण्याच्या कार्यात शिवाजीमहाराजांच्याइतकेच कर्तृत्व सिद्ध केले. ज्ञानेश्वरांचा ज्ञानेश्वरी हा ग्रंथ सर्व काव्यग्रंथांत आजही श्रेष्ठत्व पावला आहे. तुकाराममहाराजांचे अभंग हे भावगीताच्या उत्कटतेने आजही वाचकांची अंतःकरणे हालवून सोडतात.

**पंडित कवी**

संत कवींच्या नंतर मराठी काव्यात पंडितयुग सुरू झाले. वामनपंडित आणि मोरोपंत हे या युगाचे अध्वर्यू होत. पुराणातील कथांचे रसाळ अनुवाद करण्याच्या कामी त्यांनी आपली काव्यशक्ती प्रगट केली. हरिगुणगान हाच त्यांच्याही काव्यरचनेतील प्रधान हेतू होता. परंतु त्या गायनाचा थाट संत कवींपेक्षा निराळा आहे. हरिकथा गाता गाता, आपल्या अंगचे काव्य-रचनाकौशल्य—पांडित्य—व्यक्त व्हावे असा त्यांचा हेतू होता. काव्याच्या अंतरंगात फारसा बदल झाला नाही, परंतु काव्यशरीराची सजावट करण्यास

## प्राचीन काव्य : संत कवी :

मराठी काव्याच्या आरंभकाली आपणांस ज्ञानेश्वरादिकांचे दर्शन होते. ज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथ, तुकाराम इत्यादी संत कवींनी विविध प्रकारची काव्यरचना केली. त्यांनी केवळ तत्त्वज्ञानावर ग्रंथ लिहिले नाहीत, तर हरिकथानिरूपण केले; तसेच वैयक्तिक भावना व्यक्त करणारे अभंगही रचले. या सर्व काव्यरचनेत त्यांचा हेतू परमार्थसाधन हाच होता. स्वतः परमार्थाचा मार्ग शोधीत तो इतरांनाही दाखवावा यासाठी त्यांनी काव्यरचना केली.

**वाग्विलास विस्तारूं । गीतार्थेंसी विश्व भरूं ।**
**आनंदाचा आवारूं । मांडूं जगा ।।**

अशी ज्ञानेश्वरांची आकांक्षा होती. एकनाथांनी आपल्या भावार्थ-रामायणात ग्रंथ कसा ' करावा ' ते सांगितले आहे. ते म्हणतात :

**अफाट न करावा ग्रंथ ।**
**ग्रंथीं बोलावा मुख्यार्थ ।।**
**पदीं दावावा परमार्थ ।**
**हा निजस्वार्थ कवनाचा ।।** ( १–११८ )

जीविताच्या भलेपणाचे लक्षण सांगताना रामदास म्हणतात :

**ज्यानें प्रपंच साधून परमार्थ केला**
**तोचि भला रे भला !**

पण प्रपंच परमार्थाच्या आड येऊ लागला तर ?

**देवाच्या सख्यत्वासाठीं ।**
**पडाव्या जिवलगांसि तुटी ।।**
**सर्व अर्पावें शेवटीं ।**
**देवापायीं ।।**

संतांची जीविताच्या सार्थकतेची कल्पना अशी असल्याने त्यांनी त्याच हेतूने काव्यरचना केली. या हेतूने लिहिलेल्या काव्याचे विषयही अर्थात हेतुस पोषक असेच होते. देवादिकांची चरित्रे सांगून आणि साधुपुरुषांच्या

जीवनकथा गाऊन ते संसाराचा फोलपणा आणि मानवी जीविताची नश्वरता काव्यांतून वारंवार सांगत. संसार, जग हे सर्व माया आहे, हे सर्व नश्वर आहे. तेव्हा नश्वरात न गुरफटता ईश्वराची वाट धरावी हेच त्यांच्या उपदेशाचे सार आहे. हा उपदेश करताना काव्याच्या बाह्य स्वरूपाकडे त्यांचे लक्ष नव्हते. सांगावयास आणि समजावयास सोपा असा काव्यरचनाप्रकार म्हणजे ओवी आणि अभंग; त्याचाच त्यांनी सर्रास उपयोग केला. सांगण्याच्या ओघात मूळच्या काव्यशक्तीमुळे काही उपमा-दृष्टान्त सुचत. एखाद्या प्रसंगी भाषेचा ओघ विषयानुरूप जमून जाई. परंतु रचनेविषयी त्यांनी हेतुपुरस्सर असे प्रयत्न केले नाहीत.

**सख्या विश्वंभरें बोलविलें।**

अशी त्यांची आपल्या काव्याविषयीची भूमिका होती.

काव्यरचनेविषयी संतकवींनी मुद्दाम काही प्रयत्न केले नसले आणि केवळ परमार्थहेतूने त्यांनी रचना केलेली असली तरी काव्यगुणाच्या दृष्टीनेही त्यांचे काव्य संपन्न आहे. उत्तम काव्याचे सर्व विशेष त्या काव्यात सर्वत्र आढळतात. आपल्या श्रोत्यांच्या ठिकाणी त्यांनी भक्तीचे अमर्याद सामर्थ्य निर्माण केले. रामदासांनी तर महाराष्ट्रात चैतन्य उत्पन्न करण्याच्या कार्यात शिवाजीमहाराजांच्याइतकेच कर्तृत्व सिद्ध केले. ज्ञानेश्वरांचा ज्ञानेश्वरी हा ग्रंथ सर्व काव्यग्रंथांत आजही श्रेष्ठत्व पावला आहे. तुकाराममहाराजांचे अभंग हे भावगीताच्या उत्कटतेने आजही वाचकांची अंतःकरणे हालवून सोडतात.

## पंडित कवी

संत कवींच्या नंतर मराठी काव्यात पंडितयुग सुरू झाले. वामनपंडित आणि मोरोपंत हे या युगाचे अध्वर्यू होत. पुराणातील कथांचे रसाळ अनुवाद करण्याच्या कामी त्यांनी आपली काव्यशक्ती प्रगट केली. हरिगुणगान हाच त्यांच्याही काव्यरचनेतील प्रधान हेतू होता. परंतु त्या गायनाचा थाट संत कवींपेक्षा निराळा आहे. हरिकथा गाता गाता, आपल्या अंगचे काव्य-रचनाकौशल्य—पांडित्य—व्यक्त व्हावे असा त्यांचा हेतू होता. काव्याच्या अंतरंगात फारसा बदल झाला नाही, परंतु काव्यशरीराची सजावट करण्यास

या युगात सुरुवात झाली. रसाला अनुकूल अशा अनेक वृत्तांची योजना पंडित-कवींनी केली. काव्यरचना करताना काही वेळा मूळ कथेचा धागा सोडून स्वतंत्रपणे त्यांनी प्रतिभाविहार केला. त्यामुळे देवादिकांच्या कथांमध्ये मानवी जीवितातील विविध भावनांची अतिशय उठावदार शब्दचित्रे या पंडित-कवींच्या काव्यात दिसतात. निरनिराळ्या रसांचा परिपोष, श्रवण-माधुर्याचा विविध अनुभव देणारी रचना, शब्दसंपत्तीचे खुले वैभव इत्यादी गुणांनी पंडित-कवींचे काव्य मंडित झाले आहे.

## शाहिरांची कामगिरी :

या पंडितयुगातच मराठी काव्यात एक नवा विभाग सुरू झाला. तो म्हणजे शाहिरांचे काव्य. महाराष्ट्रात स्वराज्याचा सूर्योदय झाल्यावर सर्व समाजात नव्या चैतन्याची जाणीव झाली. वीरांच्या पराक्रमाने सर्वांची अंतःकरणे उचंबळून येत होती. त्या वातावरणात शाहीर जन्मास आले आणि त्यांनी आपल्या साध्या सरळ ओघवती रचनेने वीरांच्या पराक्रमकथा दुमदुमत ठेवल्या. शाहिरांनी पोवाडे रचिले आणि लावण्याही रचल्या. वेदान्तपर उपदेश करणारी कवनेही काहींनी रचली. त्यांचे मुख्य कार्य म्हणजे पराक्रमाचे वैभव उपभोगणाऱ्या समाजाचे मनोरंजन करणे. सामान्य माणसाच्या मनास अतिशय प्रिय असे शृंगाराचे प्रसंग लावण्यांतून हुबेहूब रंगवून शाहीर बहुजनसमाजास आनंदाने बेहोष करीत. लावण्या आणि पोवाडे हे काव्यरचनेचे नवे प्रकार यामुळे लोकप्रिय झाले, आणि काव्य-विषयाची व्यापकता पुष्कळच वाढली. मुमुक्षूंच्या जीवनाचाच विचार करणारी मराठी कविता या काळी अगदी सामान्य जीवनातील विविध अनुभवांत रंगून जाऊ लागली.

शाहीरयुगाच्या शेवटी शेवटी पारतंत्र्याचा अंधार पसरू लागला. स्वराज्य गेले, सत्ता गेली, स्वास्थ्य गेले, आणि मधल्या काळात समाजाची स्थिती काहीशी बावरल्यासारखी झाली. शाहीरातला शेवटला शाहीर प्रभाकर आपल्या हयातीतच स्वराज्याचे वैभव आणि नाश पाहत होता. तो तळमळून म्हणतो :—

**जुने कायदे अगदी मोडले जधीपुन झाले इंग्रेजी**
**कांदाभाकर एक्या मोलें तुपसाकर मैदासोजी**
**मोठे मोठे उमराव धारकरी जरब चहूंकडे दरारा**
**राव्यापरी पिंजऱ्यांत कोंडले मायेणीचा चंदीचारा**

स्वराज्यनाशाबद्दल अशी हळहळ सर्वांच्याबरोबर कवींच्याही मनात वाटत होती. परंतु हळूहळू आंग्लाईचा परिचय झाला. नवे राज्य आले. त्याबरोबर नवे विचार आणि नवे वाङ्मय नजरेस पडू लागले. त्या नावीन्याची चिन्हे काव्यातही दिसू लागली.

## आधुनिक पंडितांची पहिली पिढी : भाषांतरयुग :

इंग्रजी विद्या शिकलेली आधुनिक पंडितांची पहिली पिढी समाजात वावरू लागली, आणि त्यांच्यामुळे काव्याचा एक नवा प्रवाह सुरू झाला. संस्कृत वाङ्मयातील नाटकांची मराठीत भाषांतरे होऊ लागली. मानवी जीवनात अनुभवास येणारे सुखदुःखाचे प्रसंग कवींना जास्त आकर्षक वाटू लागले. जीवनाविषयी जिव्हाळा वाटून ऐहिक जीवनातील सुखदुःखांचाच कवीही जास्त विचार करू लागले, आणि तो विचार संस्कृत वाङ्मयातील उत्तर-रामचरित, मेघदूत, शाकुंतल इत्यादी ग्रंथांच्या भाषांतरांच्या द्वारे मराठीत व्यक्त होऊ लागला. भाषांतरासाठी संस्कृत वाङ्मयातील परमार्थपर व वेदान्तपर असे ग्रंथ न निवडता वरील ग्रंथ निवडण्यातच कवींचा बदललेला दृष्टिकोन दिसून येतो.

संस्कृतातील काव्यनाटकांच्या भाषांतराबरोबर इंग्रजीचा परिचय होऊ लागल्यावर त्या भाषेतील काव्याची भाषांतरे मराठी कवी करू लागले. इंग्रजी शिक्षणाच्या निमित्ताने आंग्ल वाङ्मयातील काव्याचा परिचय होऊ लागला. त्या वाङ्मयात आपल्या वाङ्मयापेक्षा सर्वस्वी नवीन असा बराच भाग कवींच्या अवलोकनात आला. आंग्ल कवींचे ऐहिक जीवितातील सुख-दुःखांनी रंगलेले काव्य वाचून कवींना अनुवादाची स्फूर्ती झाली. स्कॉट्, टेनिसन् इत्यादी आंग्ल कवींच्या काव्यांची मराठी रूपांतरे या काळात झाली.

### स्वतंत्र काव्यरचनेस आरंभ :

परकीय भाषांतील काव्यांची मराठीत भाषांतरे झाली तरी मूळ काव्यातील विदेशी वातावरण मराठीतही विदेशीच राहिले होते. आपल्या काव्यात आपल्या संस्कृतीचे प्रतिबिंब वठले पाहिजे, ते आपल्या स्वभावधर्मास अनुरूप पाहिजे, अशी जाणीव कवींमध्ये उत्पन्न झाली. आणि त्या दृष्टीने काव्यरचनेस आरंभ ' राजा शिवाजी ' या काव्यापासून झाला. आधुनिक काळातील पहिले स्वतंत्र काव्य म्हणून ' राजा शिवाजी ' हे काव्य महत्त्वाचे आहे. ते महादेव मोरेश्वर कुंटे यांनी १८७१ मध्ये लिहिले.

१८७१ मध्ये लिहिलेल्या ' राजा शिवाजी ' या काव्याच्या प्रस्तावनेत त्या काव्याचे कवी कुंटे यांनी काव्यरचनेचा हेतू सांगितला आहे त्यावरून काव्यरचनेची दृष्टी कशी बदलली होती हे दिसून येईल. कुंटे म्हणतात :

" राष्ट्रांच्या प्रगतीला शास्त्राइतकीच काव्याचीही आवश्यकता आहे.... कालाला अनुरूप असा नवीन कविवर्ग निर्माण झाला पाहिजे. खालचा व वरचा हे दोन वर्ग जवळ आणून राष्ट्र एकजीव केले पाहिजे. यानेच राष्ट्रहित साधेल. भाषा व्यवहारातली पाहिजे."

या हेतूप्रमाणे अनेक कवी इंग्रजांच्या गुणांचे अनुकरण करून आपली उन्नती करून घेण्याचा उपदेश करू लागले.

**करा उद्यमें देशसंपत्तिवृद्धि**

असे कवी सांगू लागले. गद्यलेखक आणि पद्यलेखक नव्या विद्येचे आणि नव्या विचारांचे विवेचन काव्यातून करू लागले. धर्मसुधारणा, समाजसुधारणा व राजकीय सुधारणा यांच्या चळवळी सुरू झाल्या. मराठ्यांच्या इतिहासाकडे चालू काळास मार्गदर्शन करण्यासाठी लेखक पाहू लागले. महाराष्ट्रापुरते पाहिले तर रानडे, टिळक, आगरकर, चिपळूणकर, भांडारकर इत्यादी व्यक्ती समाजातील निरनिराळ्या क्षेत्रांत पुनरुज्जीवनासाठी आपली लेखणी व वाणी यांचा आवेशाने उपयोग करू लागल्या. राजकीय चळवळीपेक्षा सामाजिक चळवळींच्या क्षेत्रात जास्त खळबळ माजली. कारण राजकीय स्वातंत्र्याची गरजच सर्वांना पटत होती. सामाजिक सुधारणेच्या बाबतीत लोकांत मतभेद होते. आपले सामाजिक आचारविचार आहेत ते

चांगलेच आहेत, त्यांत घडामोड करण्याचे काही कारण नाही असे काहींना वाटे; तर समाजसुधारकांना वाटे, अनेक प्रकारचे अज्ञान आपल्या सामाजिक जीवनात आहे. बालविवाह, वैधव्य इत्यादी चालींनी समाजाचा ऱ्हास होत आहे; धर्माचरणातले तत्त्व विसरून पुष्कळसे ढोंग आणि बुवाबाजी माजली आहे. त्यामुळे अनेक प्रकारे भेद माजले आहेत. ते दूर करणे हे राजकीय स्वातंत्र्याइतकेच, किंबहुना त्यातूनही जास्त तातडीचे आणि अत्यावश्यक आहे. कारण समाजात अज्ञान आणि निरर्थक रूढींचे प्राबल्य राहिले तर दुबळा समाज राजकीय स्वातंत्र्य मिळाले तरी ते टिकवू शकणार नाही. सनातनी समाजाचा प्रचंड विरोध न जुमानता आपले शक्तिसर्वस्व खर्च करून समाजसुधारणेचे विचार समाजापुढे मांडण्याचे कार्य आगरकरादिकांनी धैर्याने चालू ठेविले. त्याचे पडसाद काव्यात ऐकू येऊ लागले.

## आधुनिक कविपंचक :

आपल्या समाजात सुरू झालेले हे विचारप्रवाह आणि इंग्रजी वाङ्मयाचा परिचय यांचा परिणाम काव्यातही दिसू लागला आणि काव्याचे आधुनिक युग सुरू झाले. १८८५ मध्ये या नव्या युगाचे प्रवर्तक कवी केशवसुत ऊर्फ कृष्णाजी केशव दामले ( १८६६–१९०५ ) यांनी काव्यलेखनास सुरुवात केली. वर सांगितलेल्या **परिस्थितीच्या पार्श्वभूमीकडे** लक्ष देऊन त्यांचे काव्य वाचले तर त्यांच्या काव्यात नवयुगाची सुरुवात कशी झाली हे लक्षात येते. १८८६ मध्ये त्यांनी ‘ एका भारतीयाचे उद्गार ’ ही कविता लिहिली. त्या कवितेत ते म्हणतात :

**संध्याकाळीं बघुनि सगळी कांति ती पश्चिमेला**
**वाटे सद्यःस्थितिच अपुली मूर्त ती मन्मनाला**
**तेणें माथें फिरुनि–सगळें जें म्हणोनी दिसावें**
**त्या त्यामध्यें स्वजनकुदशा वाचुनी मीं रडावें !**

शेवटी ते म्हणतात :

**केव्हां आम्ही सुटुनि सहसा पंजरांतूनि देवा,**
**राष्ट्रत्वाला फिरुनि अमुचा देश येईल केव्हां ?**

'घराकडील गोष्टी' आपल्या मित्रास सांगताना आपल्या भावास उद्देशून केशवसुत म्हणाले होते :

**बापू ! गड्या ! ध्वज उभा करशील काय ?**
**तूं देशकारण करूं झटशील काय ?**

समाजातील जन्मानेच श्रेष्ठत्व पावलेले 'विप्र' डौलात हिंडत आणि अंत्यजाच्या मुलास म्हणत :

**"सरा रे दुरी पोर हो म्हारड्यांचे"**

त्या बालकाने आपल्या आईला विचारले :

**"जरी त्यावरी सांवली माझि गेली,**
**तरी काय बाधा असे ठेविलेली ?–"**

तो त्याचा सुज्ञांस निरुत्तर करणारा प्रश्न केशवसुतांनी समाजापुढे टाकला. भोवतालच्या समाजात न्यायाच्या अधिष्ठानावर माणुसकीची सत्ता प्रस्थापित करण्याचे प्रयत्न चालले होते. त्याचे पडसाद केशवसुतांच्या वेळेपासून काव्यात दिसू लागले. 'निबंधमाला' (१८७४), 'केसरी' (१८८१), 'सुधारक' (१८८८) या वृत्तपत्रांतून चिपळूणकर, टिळक आणि आगरकर स्वदेश, स्वभाषा आणि स्वधर्म यांच्या उन्नतीसाठी समाजाचे सामर्थ्य चेतवीत होते. वाङ्मयसेवकांनीही त्या कामी त्या थोर राष्ट्रसेवकांच्या कार्यास हातभार लावला. कवीही मागे राहिले नाहीत. 'कवितेचे प्रयोजन' सांगताना केशवसुत म्हणतात :

**हातीं घेउनियां निशाण कवि तो पाचारितो बांधवा**
**या हो या झगडावयास सरसे व्हा मेळवा वाहवा !**
**प्रेतेंही उठवील जी निज रवें ती तो तुतारी करीं**
**आतां नादवती, निरर्थ तर ती त्याची कशी चाकरी ?**

आपल्या 'तुतारी' या कवितेत त्यांचा आवेश पाहा :

**प्राप्तकाल हा विशाल भूधर**
**सुंदर लेणीं तयांत खोदा,**

निजनामें त्यावरती नोंदा
बसुनी कां वाढवितां भेदा ?
विक्रम कांहीं करा चला तर !

—उठवा अपुले उंच मनोरे
पुराण पडक्या सदनीं कां रे !
भ्याड बनुनिया रडतां पोरें ?
पुरुषार्थ नव्हे पडणें रखडत !

—नीतीला आणिती अडथळे,
विसरुनिया हे जातात खुळे
नीतीचें पद जेथें न ढळे—
धर्म होतसे तेथेंच स्थिर—

हल्ला करण्या तर दंभावर—तर बंडावर,
शूरांनो ! या, त्वरा करा रे !
समतेचा ध्वज उंच धरा रे
नीतीची द्वाही पसरा रे
तुतारिच्या या सुराबरोबर !

नियमन मनुजासाठीं, मानव—
नसे नियमनासाठीं जाणा.

केशवसुतांचे समकालीन कवी **नारायण वामन टिळक** (१८६२–१९१९) यांनी ' रणशिंग ' फुंकलेः—

नवयुग ! नवयुग ! नवयुग ! हो !
शिंग फोडितें हा टाहो.
—हात धरीला कालानें
धावा त्यासह हौसेनें

‘ ब्राह्मण किंवा महार ’ या कवितेत ते म्हणतात :

**मी ब्राह्मण वा महार मी**
**गणीं न कवणालाच कमी.**
**हिंदभूमि माझी जननी**
**आले हीच्या कुशींतुनी**
**हिरेच अवघे माझे ते**
**—विपन्नता ज्यांच्यापाठीं**
**जीव कळवळे त्यांसाठीं.**
**—होइन नीचाहुन नीच**
**करीन अवघ्यांना उंच**

आधुनिक काव्यकालातील आद्य शाहीर **विनायक जनार्दन करंदीकर** ( १८७२—१९०९ ) यांचा जन्म केशवसुतांच्या नंतर ६ वर्षांनी झाला. त्यांनी इतिहासातील अनेक उज्ज्वल प्रसंग आणि व्यक्ती यांवर काव्य लिहिले. भोवतालच्या परिस्थितीतील दौर्बल्य दाखविताना ‘ दसऱ्याचें सोनें ’ या कवितेत ते म्हणतात :

**वैभवशाली सत्ताधारी**
**गुलाम फिरती दारोदारीं.**
**—सुवर्णभूची रक्षा झाली.**
**सोन्याजागीं पानें आलीं.**
**सीमोल्लंघन घडलें दैवा । बघशी अंत किती.**

या स्थितीतून बाहेर येण्यासाठी—

**गडावर जाऊं । शिवराजदर्शना लाहूं ।**
**आमचा गुरु श्रीशिवराणा**
**पुनरुज्जीवनहेतु पुराणा**
**महाराष्ट्रवीर्याचा बाणा**
**संकटीं वाहूं.**

'महाराष्ट्र–लक्ष्मी' चे स्तवन करताना त्यांनी इतिहासाचा बोध सांगितला की,

**पूर्व दिव्य ज्यांचे त्यांना रम्य भाविकाल.**

विनायकांच्यानंतर **गोविंदाग्रज** (**राम गणेश गडकरी** : १८८५–१९१९) यांनी 'दसरा' कवितेत 'केशवसुतांचा सच्चा चेला' म्हणून 'तुतारी' चाच संदेश सांगितला :

जुन्या ऋषींना सलाम ठोकुनि
करा तयारी छाती ठोकुनि
आजकालच्या ऋषींमागुनि
जा तिकडे हा नेइल दसरा !
––घ्या कृष्णाची करीं "तुतारी"
रूढीच्या किल्ल्यावर स्वारी
"आगरकरांची" झडवा नौबत !
––दीनपणाला गर्वें छळतें,
आज्ञानाला भिऊन पळतें,
या वर घ्याया नच जें वळतें
उच्चत्वा त्या लावा आग !
––मानवधर्माचा हा दसरा.

आणि आधुनिक कविपंचकातील आणखी एक कवी **बालकवी** (**त्र्यंबक बापूजी ठोमरे** : १८९०–१९१८) आपल्या 'धर्मवीर' कवितेत याच मानवधर्माचे प्रवचन करीत होते :

धर्म तुम्हांसाठीं बनला;
धर्म तुम्हीं तुमचा केला.
सत्यासाठीं नित्य नवे
धर्मनियम आम्हांस हवे.
––विश्वकुटुंबी विश्वधनी
तेज खरें हिंदुस्तानी

‘ब्राह्मण किंवा महार’ या कवितेत ते म्हणतात :

**मी ब्राह्मण वा महार मी**
**गणीं न कवणालाच कमी.**
**हिंदभूमि माझी जननी**
**आले हीच्या कुशींतुनी**
**हिरेच अवघे माझे ते**
**—विपन्नता ज्यांच्यापाठीं**
**जीव कळवळे त्यांसाठीं.**
**—होइन नीचाहुन नीच**
**करीन अवघ्यांना उंच**

आधुनिक काव्यकालातील आद्य शाहीर **विनायक जनार्दन करंदीकर** ( १८७२—१९०९ ) यांचा जन्म केशवसुतांच्या नंतर ६ वर्षांनी झाला. त्यांनी इतिहासातील अनेक उज्ज्वल प्रसंग आणि व्यक्ती यांवर काव्य लिहिले. भोवतालच्या परिस्थितीतील दौर्बल्य दाखविताना ‘दसऱ्याचें सोनें’ या कवितेत ते म्हणतात :

**वैभवशाली सत्ताधारी**
**गुलाम फिरती दारोदारीं.**
**—सुवर्णभूची रक्षा झाली.**
**सोन्याजागीं पानें आलीं.**
**सीमोल्लंघन घडलें दैवा । बघशी अंत किती.**

या स्थितीतून बाहेर येण्यासाठी—

**गडावर जाऊं । शिवराजदर्शना लाहूं ।**
**आमचा गुरु श्रीशिवराणा**
**पुनरुज्जीवनहेतु पुराणा**
**महाराष्ट्रवीर्याचा बाणा**
**संकटीं बाहूं.**

'महाराष्ट्र–लक्ष्मी' चे स्तवन करताना त्यांनी इतिहासाचा बोध सांगितला की,

**पूर्व दिव्य ज्यांचे त्यांना रम्य भाविकाल.**

विनायकांच्यानंतर **गोविंदाग्रज** (**राम गणेश गडकरी** : १८८५–१९१९) यांनी 'दसरा' कवितेत 'केशवसुतांचा सच्चा चेला' म्हणून 'तुतारी' चाच संदेश सांगितला :

**जुन्या ऋषींना सलाम ठोकुनि**
**करा तयारी छाती ठोकुनि**
**आजकालच्या ऋषींमागुनि**
**जा तिकडे हा नेइल दसरा!**
**—घ्या कृष्णाची करीं "तुतारी"**
**रूढीच्या किल्ल्यावर स्वारी**
**"आगरकरांची" झडवा नौबत!**
**—दीनपणाला गर्वें छळतें,**
**आज्ञानाला भिऊन पळतें,**
**या वर घ्याया नच जें वळतें**
**उच्चत्वा त्या लावा आग!**
**—मानवधर्माचा हा दसरा.**

आणि आधुनिक कविपंचकातील आणखी एक कवी **बालकवी** (**त्र्यंबक बापूजी ठोमरे** : १८९०–१९१८) आपल्या 'धर्मवीर' कवितेत याच मानवधर्माचे प्रवचन करीत होते :

**धर्म तुम्हांसाठीं बनला;**
**धर्म तुम्हीं तुमचा केला.**
**सत्यासाठीं नित्य नवे**
**धर्मनियम आम्हांस हवे.**
**—विश्वकुटुंबी विश्वधनी**
**तेज खरें हिंदुस्तानी**

धर्मवीर हिंदिस्तान
——सत्यधर्म निरहंकार
सर्वांचें समता सार.

अशी या नवयुगातील विचारपरंपरा केशवसुतांपासून आधुनिक काव्यात व्यक्त होऊ लागली.

**आधुनिक कविपंचकाचे कार्य :**

केशवसुत, टिळक, विनायक, गोविंदाग्रज आणि बालकवी यांचा आधुनिक कविपंचक म्हणून उल्लेख करण्यात येतो. या पाच कवींनी आधुनिक काव्याचा प्रवाह सुरू करून त्यास निश्चित वळण लाविले. वरील विवेचनात त्यांच्या काव्यातील एक विचारप्रवाह दाखविला आहे. कवी समाजोन्मुख होऊ लागले होते हे त्या विचारप्रवाहावरून दिसते. त्याबरोबरच त्यांच्या काव्यात इतरही वैशिष्ट्ये दिसतात.

या कवींनी कवितेचे बाह्य स्वरूप पूर्णपणे बदलले. भावगीतांचेच लेखन त्यांनी विशेषतः केल्याने कवितांची लांबी अगदी कमी झाली. एखाद्या उत्कट भावनेचा उद्‌गार एवढेच कवितेचे कार्य ठरले. त्या भावनेच्या आविष्काराच्या सोईसाठी अक्षरवृत्ते जाऊन मात्रावृत्ते प्रचलित झाली आणि काव्यरचनेची बंधने शिथिल झाली. हळूहळू गाण्याच्या चालींचा कवी स्वीकार करू लागले.

रचनेच्या बाबतीत सुनीत हा काव्यप्रकार विशेष प्रचारात आला. इंग्रजी काव्यरचनेतील सॉनेट या प्रकारावरून आधुनिक कवींनी सुनीताची रचना केली, आणि कवितेची अंतर्गत रचना सॉनेटप्रमाणे होऊ लागली. रचनेच्या बंधनाचा पूर्णपणे त्याग करण्याचा प्रयत्न केशवसुतांचे अनुयायी रेंदाळकर यांनी केला. निर्यमक कविताही अर्थ आणि रसदृष्ट्या चांगली असू शकते हे रेंदाळकरांनी दाखवून दिले.

कवितेच्या बाह्य रूपाप्रमाणे अंतरंगातही परिवर्तन करण्याचे कार्य या कविपंचकाने केले. काव्यविषयाची पूर्वीची बंधने या कवींनी पूर्णपणे झुगारून दिली. लौकिक जीवनातील कोणत्याही विषयास काव्यात प्रवेश मिळाला. मागे उल्लेखिलेल्या सामाजिक प्रश्नांप्रमाणेच वैयक्तिक जीवनातील सुखदुःखांनाही

काव्यात वाट मिळाली. काव्यात कवी आपले व्यक्तित्व निःसंकोचपणे व्यक्त करू लागले. त्यामुळे वैयक्तिक जीवनातील प्रेमभावनेने काव्याचा बराच भाग व्यापून टाकला. गोविंदाग्रज हे प्रेमाचे शाहीर ठरले, आणि जुन्या शाहिरी परंपरेतल्या विनायकांइतकीच त्यांचीही कविता लोकप्रिय झाली. पत्नी आणि प्रिया यांच्याबरोबरच फुलांना आणि मुलांना काव्यात स्वच्छंदाने विहार करता येऊ लागला. निसर्गातील व्यवहारांशी एकरूप होऊन टिळक आणि बालकवी यांनी काव्यरचना केली. निसर्गाचे मानुषीकरण या कालात झालेले दिसते. तरुण आणि प्रौढ यांच्याप्रमाणेच बालकांच्या लीलांतही कविता रंगू लागली, आणि शिशुगीते हे शैशवाइतकेच रम्य दालन काव्यात खुले झाले.

अशा रीतीने या कविपंचकाने कवितेस लौकिक जीवनात प्रतिष्ठा मिळवून दिली.

केशवसुतादि पंचकाने नवे काव्य नावारूपास आणण्यात बरेच यश संपादिले. त्यांच्या वैयक्तिक आणि वाङ्मयीन सहवासाने अनेक कवींना स्फूर्ती झाली. विनायकांप्रमाणे राष्ट्रीय कविता लिहिणारे आणि टिळकांच्याप्रमाणे शिशुगीते लिहिणारे दत्त ( १८७५–१८९९ ) अवघ्या चोवीस वर्षांच्या जीवनकालात अविस्मरणीय काव्यरचना करून गेले. याच कालातील **माधवानुज** ( १८७२–१९१६ ) यांच्या निरलंकृत साध्या कवितांत केशवसुतांच्या परंपरेत समावेश करता येईल अशा कविता पुष्कळ आहेत. ‘ सुरेख संगम किती ’ ही त्यांची कविता बरीच लोकप्रिय झाली आहे. परंतु माधवानुज हे आपल्या वैयक्तिक सुखदुःखांचा फारसा आविष्कार न करता परदुःखांनी मनात आलेले विचारच व्यक्त करीत.

केशवसुतांच्यानंतर सहाच वर्षांनी जन्मलेले ‘ बी ’ हे नुकतेच कैलासवासी झाले. त्यांनी काव्यातून सामाजिक दोषांवर प्रहार करण्याचा नवा सांप्रदाय स्वीकारला. त्याचप्रमाणे कवीच्या कार्याचे श्रेष्ठत्व काव्यात आवेशाने मांडले. इतिहासाच्या थोड्याशा आधारावर ‘ कमळा ’ हे अद्‌भुतरम्य दीर्घ प्रेमकाव्य लिहून ‘ बी ’ अविस्मरणीय झाले आहेत. १९२३ सालापासून ‘बी’ नी काव्यलेखन सोडल्यामुळे त्यांचे नाव आज काव्यप्रान्तात फारसे ऐकू येत नाही. तरी त्यांच्या काव्याने रसिकांच्या मनात अढळ स्थान मिळविले आहे.

## जुन्या परंपरेचे अवशेष :

आधुनिक कविपंचक नवे नवे प्रांत व्यापीत होते त्या वेळी जुन्या वळणाने काहींचे काव्यलेखन चालू होते. त्यांत कवी चंद्रशेखर ( १८७१–१९३७ ) यांचे नाव अग्रस्थानी आहे. चंद्रशेखरांनी पंडितयुगाचेच वळण चालू ठेविले. रचना आणि विषय या बाबतीत त्यांनी जुन्याच मार्गाचा अवलंब केला. नव्या कवींप्रमाणे आत्मलेखन त्यांनी केले नाही आणि अक्षरवृत्तांची बंधनेही सोडली नाहीत. परंतु अगदी पौराणिक काळात ते गुरफटले नाहीत. इंग्रजीतील दीर्घ काव्यांची त्यांनी सुंदर रूपांतरे केली. त्यांचे 'काय हो चमत्कार' हे अद्भुत वातावरणाचे दीर्घ प्रेमकाव्य अतिशय चित्तवेधक झाले आहे. परंतु एकंदरीत भावनाविलासापेक्षा चिंतनाकडेच त्यांचा कल होता. जुन्या वळणाचे धोरण संभाळूनही उत्तम काव्यरचना होऊ शकते, हे आधुनिकांना चंद्रशेखरांनी पटविले. शब्दांची अचूक निवड, वृत्तांची रसानुकूल योजना, अनुप्रास व यमक यांनी क्लिष्टता येऊ न देता कवितेचे नादमाधुर्य वाढविण्याचे कौशल्य इत्यादी गुणांनी चंद्रशेखर आधुनिक युगातही मान्यता पावले.

चंद्रशेखरांच्याप्रमाणे लेंभे, मोगरे, अनंततनय इत्यादी कवी नव्या कालात जुनी परंपरा टिकवीत होते. परंतु केशवसुतादिकांच्या काव्याविषयी सर्वत्र जो जिव्हाळा वाढू लागला तो त्यांना न लाभल्याने त्यांच्या कवितांतील काव्यगुणांचा प्रभाव जनमनावर परिणाम करू शकला नाही.

## रविकिरणमंडळ

आधुनिक कविपंचकातले शेवटचे कवी गोविंदाग्रज १९१९ साली दिवंगत झाले. त्यांच्या मृत्यूमुळे आधुनिक काव्यपरंपरा एकदम तुटल्यासारखी वाटावी इतका त्यांच्या काव्याचा प्रभाव होता. परंतु त्याच सुमारास काव्यक्षितिजावर नव्या कविमंडळाचा उदय झाला. तेच सुप्रसिद्ध रविकिरणमंडळ होय. गोविंदाग्रजांच्यानंतर आधुनिक काव्यावर या मंडळाचेच संस्कार प्रभावी ठरले आहेत. त्यांच्या अनुयायांची संख्या सारखी वाढत आहे, आणि आधुनिक काव्याचे वैशिष्ट्य आज सुप्रतिष्ठित आहे. या कामगिरीमुळे १९२० नंतरच्या काव्याच्या कालास रविकिरणमंडळाचे नाव प्राप्त झाले आहे.

या कालात अग्रभागी विराजमान असलेले कवी **भास्कर रामचंद्र तांबे** ( १८७४-१९४१ ) हे वयाने चंद्रशेखरांचे समकालीन आणि रविकिरण मंडळातील सर्व सदस्यांपेक्षा ज्येष्ठ आहेत. रविकिरणमंडळाच्या स्थापनेपूर्वी ३० वर्षे ते काव्यरचना करू लागले होते. परंतु महाराष्ट्राच्या बाहेर ( ग्वाल्हेरला ) वास्तव्य आणि प्रसिद्धिपराङ्मुख वृत्ती यांमुळे त्यांची ओळख महाराष्ट्रास फार उशिरा झाली. त्यांचा पहिला काव्यसंग्रह १९२० साली प्रसिद्ध झाला. या योगायोगामुळे त्यांच्या काव्याचा परिचय रविकिरण-मंडळाच्या कार्याबरोबरच होऊ लागला.

आधुनिक महाराष्ट्राचे अत्यंत आवडते कवी माधव जूलियन, गिरीश आणि यशवंत हे योगायोगाने पुण्यास एकत्र आले. या कवित्रयास श्री. बा. रानडे, ग. त्र्यं. माडखोलकर, द. ल. गोखले, दिवाकर यांची जोड मिळाली आणि या सात मित्रांनी आपल्या मैत्रीचे स्वरूप चिरस्थायी करण्यासाठी रविकिरण-मंडळ १९२३ साली स्थापन केले या कविसप्तकाबरोबरच सौ. मनोरमाबाई रानडे या कवयित्रीही रविकिरणमंडळात होत्या.

या मंडळाच्या सदस्यांपैकी माधव जूलियन, यशवंत आणि गिरीश यांनी काव्यक्षेत्रात अतिशय भरीव कामगिरी केली. रविकिरणमंडळातील कवींनी गोविंदाग्रजांपर्यंत आलेला काव्यप्रवाह पुढे जोमाने चालू ठेविला आणि त्यात आपल्या वैशिष्ट्याची भर घालून स्वतःच्या कृतींची स्पष्ट छाप आधुनिक कालावर वठविली.

रविकिरणमंडळाने आधुनिक काव्याचा प्रसार करण्याचे अतिशय महत्त्वाचे कार्य केले. गेय काव्यरचनेबरोबर स्वतः काव्यगायन करीत राहिल्याने आबालवृद्धांपर्यंत आधुनिक काव्य गेले. काव्यरचनेच्या बाबतीत सदस्यांनी आपापले वैशिष्ट्य दाखविले. माधवरावांनी गज्जलांची ओळख करून देऊन त्या प्रकाराची अनिवार गोडी लाविली. गिरीशांनी सामाजिक खण्डकाव्यास आरंभ केला. गिरीशांबरोबर यशवन्तांनी जानपदगीते लिहून त्या काव्य-विभागाकडे लोकांचे लक्ष वेधले. मंडळातील सदस्यांनी गुरुस्थानी मानलेले तांबे यांनी काव्यरचनेस संगीताची साथ देऊन काव्याच्या प्रसारास आणि लोकप्रियतेस अतिशय साहाय्य केले. रचनेची शुद्धता आणि भावनेची उत्कटता यांचा अपूर्व संयोग या कवींच्या काव्यात दिसून आला. केशवसुत-

युगातील विचारांचाच प्रभाव या कवींच्या काव्यात आहे. याचे कारण त्यांचा जीवनविषयक दृष्टिकोण एकच आहे. परंतु तो दृष्टिकोण मांडताना रचनेच्या सफाईची जोड मिळाल्याने या कवींचे कार्य अतिशय परिणाम-कारक झाले आहे.

केशवसुतांच्या परंपरेत गोविंदाग्रजांच्या मृत्यूनंतर न या उत्साहाचे जे नवे कवी उदयास आले त्यांत **तांबे, माधव जूलियन, यशवंत, गिरीश** इत्यादी कवींचे काव्य प्रामुख्याने रसिकांच्या मनाचे आकर्षण करीत आहे, आणि त्यानंतरच्या अगदी तरुण कवींत **कुसुमाग्रजांनी** रसिकांचे लक्ष जास्त वेधले आहे. अर्थात ही ५।१० नावे जरी प्रमुख म्हणून उल्लेखिली तरी यांच्याभोवती असे अनेक कवी आहेत की, ज्यांच्याही काव्याने रसिकांची मने आकृष्ट केली आहेत. काव्याच्या नव्या युगाची जाणीव सर्वत्र दिसते. आणि त्या युगातील **युगधर्मांची लक्षणे** आजच्या काव्यातून दिसतात.

**जीवनाकडे पाहण्याचा दृष्टिकोण** बदलला ही जशी एक नवयुगाची खूण सांगितली, त्याचप्रमाणे आणखीही काही विशेष लक्षणे या युगाची आहेत. सामाजिक जीवनाविषयी काव्यात आस्था स्पष्टपणे दिसू लागली हे वरील काही काव्यपंक्तींवरुन लक्षात येईलच. आपले प्राप्त जीवन ही शिक्षा किंवा अधःपात नसून ती एक भाग्याची गोष्ट आहे; त्याविषयी आपण मुद्दाम जिव्हाळा बाळगला पाहिजे; असे जीवनाचे चित्र रंगविणारे काव्य अलौकिकाकडून लौकिकाकडे येऊ लागले, असे सामान्यतः म्हणता येईल.

स्त्री-पुरुषांमधील प्रेम ही भावना सर्व स्थळी अतिशय प्रभावी ठरली आहे. त्या भावनेसंबंधीचे विविध अनुभव आधुनिक काव्यांत जास्त प्रमाणात आढळतात. म्हणून आधुनिक काव्य म्हणजे प्रेमकाव्य असे एकदम समीकरण मांडून त्याचा उपहास करणारे काही टीकाकार आजही आहेत; आरंभी बरेच होते. केशवसुतांनीही प्रेमविषयक कविता बरीच लिहिली; आणि त्यांच्यानंतर बहुतेक कवींनी या विषयात बराच विहार केला आहे. जुन्या काव्यातही शृंगार वर्ज्य होता असे नाही; परंतु त्यात फरक पडला तो असा की, केवळ स्त्रीदेहाच्या सौंदर्याचे, यौवनावस्थेचे वर्णन करीत न बसता स्त्रीमनाचे विश्लेषण आधुनिक कवींनी केले आहे.

शृंगाराविषयी आधुनिक कवींना कमीपणा वाटत नाही. त्यात राधा-कृष्णांच्या नावांखाली चोरून दबकत लिहिण्यासारखे काही ‘ पाप ’ आहे असे त्यांना वाटत नाही; कारण, वस्तुतः तसे ते नाही. त्यामुळे स्वतःच्या व इतरांच्या जीवनातील प्रेमासंबंधीचे अनुभव आधुनिक कवींनी मनमोकळे-पणाने मांडले. त्यामुळे प्रेमकाव्यात अधिक वास्तवता आली, आणि वाचकांस त्याविषयी जास्त आपुलकी वाटू लागली. सीताविरहाच्या यातना प्रभू रामचंद्राला जितक्या जाणवल्या, तितक्या रामचंद्राच्या मानाने सामान्य अशा प्रेमळ पतीसही पत्नी-विरहात जाणवतात. प्रिया व प्रियकर यांना एकमेकांविषयी अनावर ओढ वाटते, हे राधा–कृष्ण, दुष्यंत–शकुंतला यांच्याच उदाहरणांनी सांगण्याचे कारण नाही. आपल्या भोवतालच्या जीवनातही ती ओढ, ते आकर्षण अनुभवास येते, ते काव्यात व्यक्त होऊ लागले.

स्त्री ही एक उपभोग्य वस्तू नसून तिला आत्मा, स्वत्व, भावना, विकार, स्वतंत्र विचार व बुद्धी असू शकतात हे विशेषतः इंग्रजी काव्यात आधुनिक कवींना दिसले, आणि त्या दृष्टिकोणाने स्त्रीजीवनाकडे कवी पाहू लागले. स्त्री ही सहचारिणी, सहधर्मिणी, स्फूर्तिदात्री आहे ही भावना आधुनिक कवितेत जास्त स्पष्टपणे व्यक्त झाली आहे. स्त्रीसहवासातील प्रणयसुखा-नुभवाबरोबर कर्तव्याची स्फूर्ती आणि चित्तशांतीचे उगमस्थान हेही अनुभव आधुनिक काव्यात नमूद झाले आहेत.

स्त्रीदेहाच्या सौंदर्याची अत्यंत रेखीव चित्रे तर आधुनिक काव्यात ठिक-ठिकाणी आहेत. चंद्रशेखरांसारख्या जुन्या-नव्याच्या संगमावर वावरणाऱ्या कवीनेसुद्धा हे कौशल्य व्यक्त केले आहे. जुन्या काव्यातही, संस्कृत आणि प्राकृत वाङ्मयात या सौंदर्याची विलोभनीय दर्शने पदोपदी होतात. परंतु आधुनिक कवींनी स्त्रीच्या अंतःकरणाचे आविष्करण करून आपले वैशिष्ट्य आणि नावीन्य दाखविले आहे.

> **लोचनांला या होसि तूं प्रकाश**
> **मदीयात्म्याचा तूंच गे विकास**
> **नाडि माझी तव करीं वाहताहे**
> **हृदय माझें तर उरीं हालताहे**

असे **केशवसुत** ‘ —प्रत ’ या कवितेत लिहितात.

**टिळक** '**माझी भार्या**' या कवितेत म्हणतात—

> **उषा साध्वी स्मेरीं भरित मधु साध्वेपण तिच्या**
> **अहा हारी साध्वी म्हणुन मन सायंतनरुचा**
> **स्वभावोक्ती साध्वी म्हणुनच अलंकारिं सरसा**
> **प्रिया माझी साध्वी म्हणुन मम तो स्वर्गच जसा !**

**तांबे** स्त्रीजातीविषयी वासनात्मक भावना बाळगणाऱ्यास सावध करीत आहेत :—

> **पापाची स्मृति राहिली जर नरा पाहून ही सुंदरी**
> **धिग्धिक् ! त्या कळली अगाध हरिची नाहींच कारागिरी.**

**गोविंदाग्रजांनी** स्त्रीप्रेमावाचून चिरंमृतासारखे झालेले जीवन व त्या जीवनातील भेसूर नैराश्य पानोपानी रंगवून स्त्रीचे जीवनातील महत्त्व वर्णन केले. '**बी**'च्या **चांफा** आणि **बुलबुल** यांसारख्या कवितांतून व गोविंदाग्रजांच्या 'प्रेम आणि मरण' यांसारख्या कवितांतून प्रेमाची दिव्य स्वरूपे व्यक्त झाली आहेत. **माधव जूलियन** यांचे **विरह-तरंग** व **यशवन्त** यांचे **जयमंगला** ही दीर्घ प्रेमकाव्यांची आधुनिक काळातील उल्लेखनीय उदाहरणे आहेत.

आधुनिक समाजात स्त्री-पुरुषांच्या सहवासाचे नवे नवे प्रसंग येतात आणि त्या सहवासात प्रेमाबरोबर प्रेमाचे आभास होऊन त्या सहवासाचा शेवट तीव्र निराशेत आणि शोकात होतो. प्रणयमीलनाबरोबर अशी प्रणयभंगाची चित्रे रेखाटली जाऊन काव्यात वास्तवता आली आहे.

सुधारलेला समाज स्त्रीजीवनाचा जास्त सहृदयपणे विचार करू लागला आहे. वैधव्याविषयी अनुकंपा उत्पन्न झाली आहे. पतितांविषयी क्षमाशीलता व्यक्त होत आहे. परित्यक्तांना संरक्षण देऊन त्यांना आपले जीवन शुद्ध करण्याची संधी देण्याइतके औदार्य समाज दाखवीत आहे. या सुसंस्कृत दृष्टिकोणाची ओळख काव्यात होत आहे. विधवांच्या बाबतीत होणाऱ्या अरेरावीचा निषेध सर्वांनीच तीव्र शब्दांत केला आहे. परंतु नुसता निषेध न करता त्यांच्या दुःखांची आणि यातनांची चित्रे रंगवून अन्तःकरणात सहानुभूती उत्पन्न करणाऱ्या कविता विशेषतः उल्लेखनीय ठरतील.

गडकऱ्यांच्या राजहंसाची माता नवविधवा आहे. 'बी' नी विधवेस दीपज्योती असे संबोधिले आहे. तांबे यांनी 'विधवेची स्वप्ने' रंगविली. "शरीर जीवा हो थडगेंसे" अशा यातनांत तिचा चाललेला आत्मयज्ञ सांगितला. गिरीशांनी 'अभागी कमल' या दीर्घकाव्याने ती करुणकथा सांगितली. काही कवींनी विधवांच्या पोरक्या मुलांचे कारुण्यपूर्वक जीवन रंगवून या भावनेस उत्कटता आणिली.

परित्यक्तांच्या बाबतीत समाजाने आपली जबाबदारी ओळखिली पाहिजे आणि त्यांचे संरक्षण केले पाहिजे. पुरुषांच्या अरेरावीला बळी पडणाऱ्या परित्यक्तांचे रक्षण करणे हे पुरुषजातीचे कर्तव्य आहे अशी वृत्ती माधव जूलियन यांचा 'सुधारक' नायक दाखवीत आहे आणि प्रत्यक्ष आचरणाचे धैर्य दाखवीत आहे. स्त्रीजातीविषयीचा दृष्टिकोण ही समाजाच्या संस्कृतीची खूण आहे. कविमनाची सुसंस्कृती आधुनिक काव्यात पूर्णपणे प्रगट झाली आहे.

सुसंस्कृत स्त्री-पुरुषांच्या सुखी संसाराची चित्रे रंगविली जाऊन "जगीं उपमा कोणती त्या गृहातें !" असे उद्गार काव्यातून ऐकू येतात.

आई म्हणून स्त्रीजीवनाचे जे नितान्तरम्य विकसित स्वरूप दिसते तो तर काव्याचा अमर विषय आहे. आईच्या अन्तःकरणातली वात्सल्याची हृदयस्पर्शी चित्रे प्रणयरसकुशल आधुनिक कवींनीही रेखाटली आहेत.

**वात्सल्य दिसे तें बहुविध विश्वविकासी**
**तें विश्वात्म्याचें विमल हास्य अविनाशी**
**तें स्वार्थसमर्पण धन्य परार्थासाठीं**
**प्रत्यक्ष निर्मितें स्वर्ग धरेच्या पाठीं**

हे 'बी' नी केलेले वात्सल्याचे वर्णन आधुनिक काव्यात कधी अपत्य-वियोगाने ( गोविंदाग्रज – राजहंस माझा निजला ), तर कधी मातृवियोगाने ( यशवन्त – आई ), कधी मातृविरहाच्या व्याकुलतेने ( माधव जूलियन– दूरस्थ मातेस; गोपीनाथ – बाळ जातो दूर देशा ), तर कधी अपत्याच्या भेटीने ( टिळक – सुशीला ) असे व्यक्त झाले आहे.

मातेच्या अन्तःकरणाइतकेच हृदयस्पर्शी चित्र पित्याच्याही अन्तःकरणाचे काव्यात दिसते. टिळकांची 'बापाचे अश्रु' ही कविता, बींची 'माझी कन्या'

गिरीशांची ' पितृस्मृति ' इत्यादी कविता याची सहज साक्ष देतील. ' दैवते माय–तात ' या यशवंतांच्या कवितेत दोन्ही भावनांचा संगम झाला आहे.

रूढीमुळे स्त्रीजीवनात जे कारुण्य आले होते तेच समाजातील दलित व अनाथ यांच्याही जीवनात कवींना दिसले. त्यांच्याही दुःखाशी आधुनिक कवी समरस होत आहेत. दुष्काळातील व सुकाळातील कष्टाळू मजूर पूर्वीही होते, परंतु त्यांच्या दुःखाविषयी दैववादानेच विचार व समर्थन होई. नव्या मानवधर्माने दैववादाचा आश्रय न करता ' नरेंच केला हीन किती नर ' हे ओळखले आणि दीनांचा आणि दलितांचा कैवार घेत कवीही पुढे सरसावले. केशवसुतांच्या काव्यात हा कैवार काही कवितांत व्यक्त झाला आहे. पुढील कवींनी या विषयाचा जास्त जास्त विस्तार केला. यशवंतांची ' बंदीशाला ' एका बालगुन्हेगाराची कैफियत सांगत आहे. या प्रश्नाविषयी आजच्या जगात किती जागृती झाली आहे, हे कुसुमाग्रजांच्या कवितेत दिसते. कामकऱ्यांच्या यातनांतून क्रांतीचा जन्म होणे अपरिहार्य आहे याची स्पष्ट कल्पना किती तरी कवींच्या काव्यात दिसते. कोणी त्याचा स्थूल निर्देश केला, कोणी त्याचा विस्तार करून अरेरावांच्या भवितव्याची भेसूर चित्रे रंगविली. तांबे यांनी ' रुद्रास आवाहन ' केले. ' साम्राज्यवादी ' या कवितेत साम्राज्यवादी वृत्तीचा खादाडपणा तीव्र उपहासाने त्यांनी व्यक्त केला. प्रा. वा. भा. पाठक यांच्या ' आशागीत ' या गोड नावाच्या कवितेतही :

**नाहीं परि तो देव दयाघन कुठें बरें लोपला**
**गरिबाचा छळ सगळा राया हा कळतो त्याजला**

असा उद्वेग व्यक्त केला.

पु. य. देशपांडे यांनी आपल्या ' निर्माल्य–मालेत '—

**संस्कृतीचे प्रगतिचे वा गोडवे गाती मुखीं**
**गात असतां, रक्त चाखिति श्रमजिवींचे ते सुखी**

असा त्या सुखी धनिकांविषयी तिरस्कार व्यक्त केला आहे. या विचारांनी डोके भणभणल्यावर ' दिवाळी ' सुचत नाही म्हणून दत्त म्हणाले :

**दिवाळी ही करणें न मला भावे**

तर काव्यविहारी ' दसऱ्या 'चे भेसूर स्वरूप सांगतात :

जिथें दैन्य थैमान घालितें तिथें कशाला दसरा ?
पाचोळयाचें सोनें लुटुनी म्हणतों आला दसरा
त्या दसऱ्याच्या मंगलरात्री
दुबळया राष्ट्रासाठीं नसती

यशवंतांनी आपला ' मुजरा ' शेताच्या बांधावरच्या भूपतीसाठी राखून ठेविला आहे. श्री. अनंत काणेकरांनी हे सर्व अन्याय मुकाट्याने पाहणाऱ्या परमेश्वरावरच त्वेषाने मुठी वळल्या.

आकाशांतिल पोलिसा ! छळिसि कां दीनांस आम्हां बरें ?
देतों टाकूनि मूर्ति ही गिरणिच्या काळया धुराड्यांत रे

असे म्हणून मजुरांकडून परमेश्वराचेच विसर्जन केले; आणि क्रांतीच्या ध्वजाचे दर्शन त्यांच्या मनश्चक्षूंस झालेले दिसले.

क्रांतीचा रक्तध्वज तो
दृष्टिपुढें फडकत येतो.
दलितजनीं उसळत थोर
शक्ति असे अपरंपार
जुलमाचें उखडूं मूळ
ढोंग्यांचें काढूं खूळ
वसुंधरा माई अमुची
चोरुनि जे बसले त्यांची
हिरावुनी शक्ती घेऊं
लोकांचें लोकां देऊं

याच ' क्रांतीचा जयजयकार ' डमडमच्या तुरुंगातील राजबंद्यांनी केला. तो कुसुमाग्रजांनी सर्वत्र घुमविला आहे.

श्रमजीवी वर्गाविषयी समाजात स्वतंत्रपणे विचार सुरू झाला, त्याबरोबर ग्रामीण जीवनाविषयी जास्त सहानुभूती आणि जिव्हाळा दिसू लागला. काव्य फक्त शहरातील जीवनातच गुरफटून न राहता खेडेगावातील गोपाळ आणि

शेतकरी यांच्याही सुखदुःखांशी समरस होऊ लागले. ग्रामीण जीवनाविषयीचे काव्य हा अभिनव काव्यविभाग काव्यप्रांतात दिसू लागला. मात्र त्या जीवनाचा प्रत्यक्ष परिचय असण्याचा योग फारशा कवींना न लाभल्याने त्या जीवनाविषयी केवळ कल्पनेने असेच बरेचसे लिहिले गेले आहे. काहींनी शहरातील सुशिक्षितांतील प्रेमविलास शेतकऱ्यांच्या झोपडीत आणि शेतावर रंगविले, आणि मोडकीतोडकी मराठी भाषा लिहून ते वातावरण जिवंत करण्याचा प्रयत्न केला; परंतु त्या कृत्रिमपणामुळे शेतकऱ्यांच्या जीवनाचा नकळत उपहासच झाला आहे, आणि गावठी भाषेतील प्रणयगीते लिहिण्यापलीकडे बऱ्याच कवींना ग्रामीण जीवनाविषयी काही सांगता आले नाही. तरी त्या विभागात यशवंत, ग. ह. पाटील, ग. ल. ठोकळ इत्यादी कवींनी संस्मरणीय कामगिरी केली आहे. त्यांच्या यशाचे मुख्य रहस्य त्यांचा त्या जीवनाशी निकटच्या जिव्हाळ्याचा संबंध हेच होय. या कवींनी त्या जीवनातील साधेपण, श्रमसौंदर्य, भाविकता यांबरोबर त्यांचे अज्ञान व दारिद्र्य हीही परिणामकारकपणे रंगविली आहेत. ग. ह. पाटील यांची 'रानजाई' खेडेगावातील नैसर्गिक रम्यता जागोजाग दाखविते आणि ती पाहिल्यावर ते सहजच कवि-बांधवांस म्हणतात,

**शहराची सोडुनि शीव शिवारांतली**
**कवितेस तुझ्या खाउं दे हवा मोकळी.**

भोवतालच्या मोकळ्या हवेतून गावात आपण शिरलो की मग मात्र जीव गुदमरू लागतो. पूर्वीचे पाटील आठवून आजच्या पाटलांच्या जीवनातील दैन्य जास्तच भडक दिसू लागते.

**या अमदानींत उरले असती नांवाचे पाटिल**
**स्वतांची त्या जाणिव कोठिल ?**

कवी शेवटी म्हणतो,

**काळाचा हा ओघ ओळखा व्हा पाटिल शहाणे**
**नका करुं हीन आपुलें जिणें.**

या हीनदीन स्थितीतही शेतकऱ्यांच्या संसारात प्रेमाची उत्कटता आणि मनाचे औदार्य दिसते. त्यांची शब्दचित्रे जात्यावरचे गाणे ( ग. ल. ठोकळ ), शेवंती ( पाटील ), रायबा ( गोपीनाथ ), इत्यादी अनेक कवितांतून दिसतात.

जीवनात फुलांचा आणि मुलांचा सहवास याच्याइतके निर्मल आनंद देणारे दुसरे काय आहे ? आनंदाची विविध दर्शने आधुनिक कवींच्या शिशुगीतांतून होतात. इतर विभागांत यशस्वीपणे काव्यलेखन करणाऱ्या कवींनीच हृदयस्पर्शी शिशुगीते लिहिली आहेत. तांबे, दत्त, बालकवी, माधव जूलियन, यशवंत, मायदेव या नामवंत कवींनी चिरस्मरणीय शिशुगीते लिहिली आहेत. भवानीशंकर पंडित यांच्या शिशुगीतांचे संकलन 'चवथीचा चांद' यात झाले, तसे इतर कवींच्या शिशुगीतांचे झाले तर त्यांच्या मनाची समरसता किती व्यापक आहे हे चांगले लक्षात येईल. कवींना तरुण-तरुणींची सलज्ज कुजबुज ऐकू येते. प्रौढ जीवनातील सुखदुःखांचे पडसाद त्यांना कळतात. दीनांचे मूक रुदन त्यांच्या मनापर्यंत पोहोचते; तसेच शिशुमनाचेही ते पूर्णपणे आकलन करू शकतात. शिशुगीते ही आधुनिक काव्याची अभिमानास्पद भूषणे आहेत. शिशुगीतांमुळे मायदेव यांचे नाव (भावतरंग) आबालवृद्धांच्या कायमचे स्मरणात राहिले आहे. यशवंतांनी बालांसाठी 'मोतीबाग' तयार केला आहे. गोपीनाथ तळवलकर यांनी तर पद्य आणि गद्यही शिशुमनाच्या विलासांनी भूषविले आहे. त्यांची **शिशुविहार** आणि **गृहरत्ने** ही पुस्तके असंख्य बालकांना आणि मातापितरांना अपूर्व आनंद देत आहेत. तांबे यांची 'कुणि असेल ग ! असेल बोबडकांदा', 'चिवचिव चिमणी छतांत', 'अंगाईगीत', 'रुणुझुणु ये' इत्यादी गीते वात्सल्यरसाचा मनमुराद आस्वाद देतात. बालकवींची अंगाईगीते आणि पाळणा, 'घोडा–घोडा', 'माझा भाऊ ग' इत्यादी गीते, माधव जूलियन यांची बाळाच्या 'आजोळी जाणें', 'माझी सोनुली', 'सुखरूप आहे ना ग', 'काऊ काऊ गे आमुचें घर', 'आगगाडी', 'माझी बाहुली', 'अंगाई' इत्यादी शिशुगीते, दत्त यांची शिशुगीते, अशी किती तरी भर आधुनिक काव्यात शिशुविभागात पडली आहे. मराठी वाङ्मयाचा तो एक अमोल ठेवा झाला आहे यात शंका नाही.

जीवनाचा रसास्वाद घेत असताना निसर्गाच्या सहवासात कवीस जी शांती आणि समाधान लाभते त्याची ओळख होण्यास प्राचीन काव्यापेक्षा आधुनिक काव्यच जास्त उपयोगी पडेल. निसर्गाच्या शांत आणि रौद्र स्वरूपाची दिव्य आणि भव्य अवताराची वर्णने प्राचीन

मराठी काव्यातही आहेत. परंतु इंग्रजी काव्यवाङ्मयाच्या परिचयानंतर निसर्ग हा माणसाचा गुरू वा मित्र आहे याची ओळख आधुनिक कविमनास होऊ लागली आणि निसर्गाकडे पाहण्याचा दृष्टिकोण बदलला. निसर्गामध्ये मानवी सुखदुःखांची प्रतिबिंबे कवींस दिसू लागली. निसर्ग आणि मनुष्याचे मन वा जीवन यांच्यात काही जिव्हाळ्याचे नाते आधुनिक काव्यात दिसते. कोणी संध्यारागात प्रणयभावनेचा आस्वाद घेतो, तर कोणी उषःकाली जीवनातील पावित्र्याचे आणि मांगल्याचे दर्शन घेतो; कोणी वृक्ष-वेलींच्या सहवासात प्रीतिविलास अनुभवतो, तर कोणी निर्झराबरोबर चिरतारुण्याचे चैतन्य अनुभवतो; कोणास संध्यारजनीच्या दृश्यात विवाहप्रसंगीचे चित्र दिसते तर कोणी तारकांच्या हालचालींत लपंडाव पाहता पाहता रमून जातो.

मानवी जीवनातील विषमता आणि कृत्रिमता पाहून आणि तज्जन्य दुःखांनी वैतागून निसर्गाच्या सहवासात गेल्यावर काहींना तेथे शांततेचा अखंड झरा सापडल्यासारखे वाटले, आणि ‘ निसर्गाकडे चला ’ असे ते आपल्या बांधवांना सांगत आहेत. माधव जूलियन आपल्या प्रियेस म्हणतात :

**तेथे चल राणी**

**अंकावर खेळूनि शिकूं सृष्टिसतीच्या**
**आत्मप्रगतीच्या**
**त्या गूढ कथा, ज्या न कुराणीं, न पुराणीं**
**—फेंसाळत गाईल जिथें ओहळ गाणीं**
**कोठूनि गरीबी असतां रानफुलांहीं**
**शृंगारित राई ?**

‘ सृष्टीचे ध्यान ’ पाहण्यास कवी सांगतो, कारण :

**मुकलित हृदयीं तव तम वाढे**
**ग्रंथ फोल मग जाडे जाडे**
**चल पड बाहेर, उघड कवाडें**
**खुल्या मोकळ्या वातावरणीं जा कर अमृतपान.**

बालकवींची तर निसर्गाच्या सहवासात तंद्रीच लागली होती. त्यांच्या-

२५
नों. दि.

इतकी निसर्गपर कविता अद्याप कोणी लिहिली नाही. कारण त्यांच्या मनाला सृष्टीची तशीच अनावर ओढ होती:—

**सृष्टि हांसवी मला फुलांनीं तारांनीं नभ तसें**
**सदाचें मंगल मज देतसे**
**जिकडे तिकडे दिव्य सांठलें, रत झालें गायनीं**
**पहाया जनीं मनीं कीं वनीं**
**त्यासह जी क्रीडा प्रेमच माझें खरें**
**ही क्रीडा म्हणजे जीवित माझें वरें**
**या दिव्यासह सखि कवितेशीं जिणें वेंचिलें जरी**
**खरी मज माझी मुक्ती तरी.**

ही 'मुक्ति' त्यांनी मिळविली. त्या मुक्तिसुखाचा इतरांस सुखोपभोग देण्यासाठी त्यांनी आपले काव्य ठेविले आहे. बालकवींच्या निर्झराबरोबर रानोमाळ भटकण्याचा कधीही कंटाळा येत नाही. त्यांच्या संध्यारजनीची ओळख झाली की आकाशात काही निराळेच सौंदर्य दिसू लागते.

टिळकांसारखे कवी तर 'सृष्टीची भाऊबीज' पाहता पाहता स्वतःचे प्रौढत्वही विसरतात. बाह्यसृष्टीचे आणि अंतःसृष्टीचे गानवादन त्यांना ऐकू येते आणि त्या दोन गानवादनात 'वादी-संवादी'चे नाते असल्याचे त्यांच्या प्रत्ययास येते. नदीची खळबळ, कोकिळेचा प्रातिरव, इत्यादी नाद हे एक दिव्य 'भैषज' आहे आणि एरव्ही क्षुल्लक वाटणारे हे नाद, ही 'अल्पें' प्रसंगी माणसाच्या मनास धीर देतात.

**परंतु जेव्हां हृदयाचे**
**तुकडे होती मनुजाचे**
**तेव्हां हीं अल्पेंच तया**
**सांवरिती दावून दया**

गोविंदाग्रजांनी आपल्या प्रेमशून्य चिरंमृत चित्ताच्या सांत्वनासाठी सृष्टीचे 'प्रेमपाठ' गाऊन मन रिझविले, 'अरुणा'चे दीर्घकाल दर्शन घेत असता त्यांच्या प्रतिभेने आणि कल्पनेने अद्‌भुत भराऱ्या मारल्या, 'अवेळी ओरडणाऱ्या कोकिळेस' ते समदुःखी म्हणून आळवीत आहेत; तर विद्युल्लतेच्या

आघाताने क्षणार्धात निर्मूल झालेल्या वृक्षाच्या जीवनात त्यांना प्रेमातील निस्सीम एकनिष्ठेची ओळख पटली, आणि

**क्षण एक पुरे प्रेमाचा । वर्षाव पडो मरणांचा**

अशा आवेशाने ती निष्ठा त्यांनी व्यक्त केली.

मानवी जीवनाच्या उद्धाराचे मार्ग निसर्गाकडून कळतात अशा श्रद्धेने कवी निसर्गाच्या निरनिराळ्या स्वरूपांचा आविष्कार करीत आहेत. या भावनेने यशवंत नदीच्या जीवनाचा संदेश सांगत आहेत. सरितेचे जीवन पाहा. ‘ करूं जग शोभावंत ’ ही एकच उत्कृष्ट इच्छा तिच्या जीवनात दिसते. मांडवीचे वारंवार दर्शन घेताना इतिहासग्रंथाची पाने डोळ्यांसमोर फडकू लागतात आणि ती ‘ समर्थ-संदेश ’ वाहिनी आहे असे त्यांचे मन ग्वाही देते. ‘सुंदर हिरवे माळ’ पाहता पाहता गिरीशांना विरळ बाभळीसुद्धा ‘ चैतन्याने ’, स्वानंदाने डुलू लागलेल्या दिसल्या. ‘सकाळ-सायंकाळ’ अशी चैतन्याची जाणीव झाली. चंद्रशेखरांनी ‘गोदागौरव’ लिहून गोदातटाकीचे वैभव अजरामर केले.

आजच्या यंत्रप्रधान संस्कृतीच्या काळी निसर्गाच्या सहवासाचे क्षण प्रत्यक्ष जीवनात दुर्मिळ होत आहेत. परंतु आधुनिक कवी आपल्याला एखाद्या गिरणगावातही निसर्गाच्या सहवासाचे नितान्त सुख देतील. निसर्गाचा जो जो परिचय व्हावा तो तो त्याचे अगम्यत्वच पटत जाते. नित्य नवी सौंदर्ये तो धारण करतो. आधुनिक कवी त्या सौंदर्याच्या खाणीतील रत्ने वाचकांपुढे अखंडपणे ठेवीत आहेत. आपल्या जीवनातील रूक्षता, नैराश्य, उद्वेग ही क्षणार्धात नाहीशी करतील अशी निसर्गविषयक कवने आधुनिक कवी लिहीत आहेत. आपल्या प्रत्येक भावनेची आणि विचाराची निसर्गा-कडून साथ होत आहे हे या काव्यात दिसत आहे. ‘ करद्या ’ ची (यशवंत) व्याकुळ मनःस्थिती आणि ‘ पृथ्वीचे प्रेमगीत ’ ( कुसुमाग्रज ), सागराचे सामर्थ्य आणि पर्वताचे गांभीर्य, अरण्याची गहनता आणि आकाशाचे अनंतत्व, फुलांचे पावित्र्य आणि फुलपाखरांचे चिरयौवन, यांची जोड मानवी जीवनास आधुनिक कवींच्या कवनांतून लाभत आहे.

**—उदयगिरीवरच्या पृष्ठीं । उदयोन्मुख सारी सृष्टि**
**—विद्युन्मय स्वातंत्र्याचे । श्वास वाहती अद्रीचे**

अशा ' गिरिगाना 'चा अर्थ ' बी ' सांगतात :—

**नित्यविकासपरायणता । ही काळावर दे सत्ता**
**विशालता ही विकसविते । व्यक्तिदृष्टिसंकोचातें.**

यासाठी :—

**भाग्याची ही उषा पुनः । जरी प्राप्त व्हावी अपणां**
**चल जाऊं या गिरिगहनीं । महासिद्धिमूलस्थानीं**

निसर्गाच्या विविध दृश्यांचे केवळ तटस्थपणे दर्शन घेण्यापुरताच पूर्वीच्या कवींना निसर्गाचा सहवास लाभला. आजचे कवी त्या दृश्यातील रहस्ये उलगडून दाखवीत आहेत. मनुष्याच्या हृदयाप्रमाणे सृष्टीचेही अंतःकरण आधुनिक कवींना कळू लागले आहे. फार काय, कविमन हे लौकिक मर्यादा ओलांडून सृष्टीशी एकरूप होऊ लागले आहे. ज्या भावना लौकिक जीवनात प्रगट होऊ शकत नाहीत, त्यांना वाट देण्यासाठी कवी निसर्गाचे साहाय्य घेतात, आणि त्या भावनेस अनुकूल असे दृश्य निवडून पुन्हा मानवी मनाचेच सुप्त भाव विशद करतात. अशा रीतीने मानवी अंतःकरणातील गूढे उकलण्याचे निसर्ग हे एक यशस्वी माध्यम झाले आहे.

जीवितातील अनेकविध अनुभवांतून जो आनंद व्यक्त होतो तो काही वेळा विनोदाच्या रूपाने बाहेर पडतो. अशा प्रसंगांनी आधुनिक मराठी काव्यात विनोदाचे दालन खुले होऊन तेही इतर विभागांप्रमाणे वाढत आहे. गोविंदाग्रजांसारख्या अतिशय आत्मनिष्ठ कवीने अत्यंत हृदयस्पर्शी नैराश्य काव्यातून प्रगट केले. नैराश्यमय कवनाच्या आसपासच त्यांच्या विनोदबुद्धीचेही विलास दिसतात. त्यांनी नाट्यवाङ्मयात ज्या विनोदाचा प्रकर्ष दाखविला, त्या विनोदाचे दर्शन त्यांच्या ' वाग्वैजयंती 'तही प्रगट झाले आहे. मनुष्यस्वभावाचे सूक्ष्म अवलोकन केले की, अभिजात विनोदाचे किती तरी प्रसंग हरघडी घडत असलेले दिसतात. अशा अवलोकनातून गोविंदाग्रजांच्या ' विहिणींचा कलकलाट ', ' चिंतातुर जंतु ', ' काय करावें ' इत्यादी कवितांचा जन्म झाला आहे. विचारप्रधान वृत्तीचे कवीही काही काही क्षणी जीविताकडे खेळाडू वृत्तीने पाहू शकतात.

विनोदाने निर्हेतुक मनोरंजन करणाऱ्या काव्यापेक्षा काही हेतू मनात धरून विनोदाचा उपयोग करण्याचा प्रघात आधुनिक काव्यात जास्त रूढ

झाला आहे. तो प्रघात म्हणजे विडंबनाचा. एखाद्या व्यक्तीतील वा कृतीतील दोषांचे आविष्करण करताना उघड टीका करण्याऐवजी ते दोष त्याच व्यक्तीच्या वा कृतीच्या काही विशेषांचे अनुकरण करून, थोडक्यात म्हणजे वेडावणे दाखवून, ते दोषाविष्करण जास्त परिणामकारक करता येते. या क्षेत्रात केशवकुमारांनी फारच घसघशीत कामगिरी केली आहे. त्यांची 'झेंडूची फुले' काव्योद्यानात गुलाब, जाईजुईच्या शेजारी आपल्या डौलाने मिरवत आहेत. विडंबनाच्या हत्याराने अदर्शाची शुद्धी करण्याचे कार्य करता येते. माधव जूलियन यांचे 'नकुलालंकार' हे याचे उत्तम उदाहरण होय. केशवकुमारांच्यापूर्वी किंवा नंतर या विभागात फारशी गर्दी झाली नाही. परंतु या तुरळक जागेतही पंडित सप्रे यांनी दिलेला 'अर्धचंद्र', चं. ग. दीक्षित यांचे 'कॉलेजचें विश्व' इत्यादी कविता रसिकांच्या लक्षात राहिल्या आहेत. या क्षेत्रात कवी बाबुलनाथ हे केशवकुमारांची परंपरा चालविण्याची उमेद बाळगून काव्यरचना करीत आहेत.

विनोद किंवा विडंबन या काव्यप्रकारातील काव्यतत्त्व टिकविणे हे मोठे कौशल्याचे काम आहे. ते कौशल्य आपल्या ठिकाणी आहे की नाही त्याची फारशी पर्वा न करता या काव्याचा प्रयोग करणारे कवी स्वतः मात्र विनोदविषय झाले आहेत. त्यामुळे केशवकुमार, जयकृष्ण केशव उपाध्ये, पंडित सप्रे, चं. ग. दीक्षित किंवा बाबुलनाथ इत्यादी कवींचे काव्य अनेक 'विनोदी' कवींच्या प्रलापांत गडप होत आहे. तरी या गोंधळातही नकुलालंकाराचे तीक्ष्णत्व लोपले नाही, हे माधव जूलियन यांचे स्वयंभू बळ होय.

अशा रीतीने जीवनाच्या सर्व अंगांस स्पर्श करताना काव्य परमेश्वरापर्यंत सहजच पोहोचले आहे. आणि भक्तिरसाचाही प्रवाह आधुनिक काव्यात दिसत आहे. परंतु त्या प्रवाहाचा प्राचीन काव्याइतका विस्तार वा आवेश आधुनिक मनात दिसत नाही. माणसाचे मन ऐहिकाने आणि प्रस्तुतानेच जास्त व्यापलेले आहे. तरी कविमनास ईश्वराचा विसर पडला नाही. भक्तीची ओळख आधुनिक कविमनासही आहे. त्यात :—

**ठेविलें अनंतें तैसेंचि रहावें**

अशी वृत्ती फारशी दिसत नाही. 'ईश्वरेच्छा बलीयसी' अशी श्रद्धा

आधुनिक मनाच्या ठिकाणी नाही. मानवी समाजात न्यायाचा जितका अट्टाहास कवींनी बाळगला आहे, तितकाच ते ईश्वराच्या बाबतीतही दाखवीत आहेत. माणसाला दैवाधीन करणारी आणि जीवित निष्क्रिय करणारी भक्ती आधुनिक कवींसही मंजूर नाही. ईश्वराच्या अस्तित्वाविषयी साशंकताही काहींनी व्यक्त केली आहे. जगातील सुखदु:खात्मक घडामोडींचे कारण शोधताना, सुखदु:खाची कारणे मानवी कृतीतच आहेत असे आजच्या विवेकप्रधान मनास वाटते. त्यामुळे ईश्वराविषयीच्या प्राचीन कल्पनांप्रमाणे त्याच्याकडेच सर्व कर्तृत्व देण्यास आजचा माणूस तयार नाही. उलट, जगातील अन्याय आणि अरेरावी, सत्ताभिलाषा आणि तज्जन्य क्रौर्य ही जर ईश्वराला मंजूर असतील तर आजचे कवी अशा ईश्वराचीच निर्भर्त्सना करून ईश्वरविषयक जुन्या कल्पनांचा उपहास करतील. धर्म आणि ईश्वर यांना एकंदरीत बरेच वाईट दिवस आलेले दिसतात ! परंतु याविषयी उपहास व्यक्त करण्याची प्रवृत्ती वाढत असली तरी धार्मिकता आणि आस्तिक्यबुद्धी यांच्याविषयी अनादर वाढला आहे असा त्याचा अर्थ नाही. काव्यातून या विषयावर जी भयंकर टीका आढळते ती धर्म वा आस्तिकता यांच्या नावाखाली जो भोंदूपणा, निष्क्रियता आणि दैववाद माजला आहे त्यांच्या रोखाने होत आहे. कारण याच टीकात्मक वा उपहासात्मक कवितांतून मानवधर्माची घोषणा केली आहे; दयेची व्यापक कल्पना व्यक्त झाली आहे; प्रयत्नवादाचा पुरस्कार केला आहे. आधुनिक कवींचा याविषयीचा दृष्टिकोन स्थूलमानाने 'बीं' च्या शब्दांत सांगता येईल :

**आपोआप घडेल इष्ट समयीं तें कार्य, हें बोलणें**
**आहे भ्रामक ! युक्त काय सगळें काळावरी लोटणें ?**
**भागीदार कृतींत मानव असे काला-निसर्गासवें**
**आणा त्यांत समीप एकवटुनी यत्नप्रयत्नोत्सवें.**

आस्तिक्यबुद्धीला श्रद्धेने मांगल्य आणि चित्तशांती मिळते. त्यांची तळमळ व्यक्त करणाऱ्या भक्तिपर कविता काही कवींनी लिहिल्या आहेत. त्यांत कलानुक्रमे टिळकांची 'अभंगांजलि' हिचा प्रथम उल्लेख करावा लागेल. त्यानंतर वा. भा. पाठक यांची 'ओढणी' ही दीर्घ कविता अभंगांजलीच्या प्रकारातील आहे. आपल्या मनातील भक्तिपर भावना व्यक्त करताना

आधुनिक कवींनी बहुधा ‘ अभंग ’ या काव्यप्रकाराचाच आश्रय केला आहे. अभंगांप्रमाणेच इतरही काव्यप्रकारांनी कवींनी आपल्या मनातील ‘ भक्ती ’ ही भावना प्रकट केली आहे. परंतु एकंदरीत केवळ एखाद्या आराध्यदैवताचे नामस्मरण, चिंतन आणि साक्षात्काराची तळमळ किंवा निर्गुण-निराकार अशा ईश्वर या तत्त्वाची वा जगत्कारणाची ओळख दाखविणारी कविता आधुनिक काळात फारशी आढळत नाही. त्या मानाने जीविताचा व्यापकपणे मूलगामी विचार करणाऱ्या चिंतनपर अशा कविता पुष्कळांनी लिहिल्या आहेत. परंतु त्यातही अशा काव्यात, प्राचीन काव्यांत कवीच्या जीवनातील जे आध्यात्मिक अनुभव दिसतात, त्या अनुभवांची पार्श्वभूमी आधुनिक काळच्या तत्त्वज्ञानपर किंवा चिंतनपर काव्यात आढळत नाही. या कवितांत बराचसा भाग भावनेपेक्षा बुद्धीतून निघालेला दिसतो.

या विषयातील मराठी वाङ्मयाची प्राचीन परंपरा फारच उच्च दर्जाची असल्याने अनुभवाविण काढलेले हे आधुनिक बोल तुलनेने तावडतोब फोल ठरतात. काही काव्यांत तर संत कवींचा केवळ भाबडेपणाने किंवा लौकिकेच्छेने केलेला अनुवादच दिसतो.

प्रत्यक्ष अनुभवावर आधारलेले, चिंतनशील मनःस्थितीत केलेले असे चिंतन तांबे यांच्या उत्तरवयातील कवितांत दिसते. तसे ते फारच थोड्या आधुनिक कवींच्या काव्यात आढळते. आधुनिक कालखंडातील दिवंगत कवींपैकी फारच थोड्या कवींना तांबे यांच्याइतके दीर्घ आयुष्य लाभले. त्यामुळे जीविताच्या परिपक्व अवस्थेतच उत्पन्न होणारी आणि सर्वस्वी स्वयंस्फूर्त अशी ही भावना अनुभवण्याची स्थिती त्यांना लाभली नाही, हे एक या प्रकारच्या काव्यातील उणीवेचे कारण सांगता येईल. कारण भक्ती ही भावना, ईश्वराविषयीची तळमळ, जगत्कारणाची ओळख ही केवळ प्रतिभाबलाने आणि कल्पनाविहाराने आकलन होण्यासारखी गोष्ट नाही. शिवाय या भावनेस मनाची एक विशिष्ट वृत्ती लागते; ती आधुनिक युगधर्माप्रमाणे दुर्मिळ झाली आहे. त्यामुळे अल्पवयात ज्ञानेश्वरांसारखे किंवा प्रौढ वयात तुकारामांसारखे उत्कट भक्तिपर काव्य निर्माण होण्याचा संभव सध्या तरी बराच कमी दिसतो.

काव्याच्या अंतरंगाप्रमाणेच बाह्य स्वरूपातही बरेच नवेपण आले आहे.

वृत्तांची बंधने आधुनिक कवींनी बाजूस केली आहेत, आणि आता काव्य-रचनेच्या बाबतीत पूर्णपणे "मुक्त" झाल्याचे दिसत आहे. "मुक्तच्छंद" हे त्या स्वातंत्र्याचे गमक आहे. दीर्घकाव्यरचना मागे पडली आणि स्फुट-काव्यांची संख्या वाढली. विद्वत्ता, विचार, चर्चा यांऐवजी भावना हेच काव्याचे सर्वस्व ठरल्याने भावगीतांना प्राधान्य मिळाले. भाषेच्या बाबतीत आलेली स्वाभाविकता आणि साधेपणा हा भावगीतांचाच अपरिहार्य परिणाम आहे. त्यामुळे काव्याच्या रसास्वादास पांडित्याची आता जरूरी नाही. कोणत्याही भावक्षम व्यक्तीस आधुनिक काव्याचा सहज आस्वाद घेता येतो. स्वतःच्या अनुभवातील आणि अनुभवाच्या कक्षेबाहेर असलेल्याही प्रसंगांतील भावनांची भावचित्रे आधुनिक काव्यात दिसतात, आणि समरसतेचा आनंद उपभोगता येतो.

रसिकांच्या अंत करणास समरस करण्याच्या कामी आधुनिक काव्यातील गेयतेचा बराच उपयोग होतो, भावनांना अनुकूल अशा सुरावटीच्या योजनेने रसिक सहज नादलुब्ध होतो. आणि काव्यातील भावना त्याच्या अंतःकरणात सुलभपणे प्रवेश करते. या बाबतीत तांबे यांनी अपूर्व यश मिळविले आहे. काव्याची हानी न करता केवळ साधन म्हणून संगीताचा आश्रय घेऊन त्यांनी आपल्या भावगीतांना रसिकांच्या अंतःकरणात सुलभ प्रवेश मिळवून दिला.

सुनीत, भावगीत, नाट्यगीत, गजल, मुक्तच्छंद इत्यादी काव्यरचनाप्रकार हे रसास्वाद अतिशय अनुकूल ठरले आहेत. काव्यरचना ही रसाविष्काराचे साधन आहे, रसाविष्कारापेक्षा तिला जास्त महत्त्व नाही हे काव्याने सिद्ध केले आहे.

आधुनिक काव्य हे असे अतर्बाह्य निराळे झाले आहे. ते जीवनाच्या जास्त जवळ आले आहे. त्याने जीवनास सौंदर्य दिले आहे आणि त्याबरोबर जीवनातील सत्य व शिव यांचा निकट परिचय घडवून आणला आहे. आधुनिक काव्य हे तुमच्या—आमच्या सर्वांच्या जीविताचे प्रतिबिंब आहे, आणि त्याबरोबर मनुष्यातील शाश्वत तत्त्वाचीही ओळख करून देणारे आहे.

या काव्यकालखंडातील पहिल्या कविपंचकाच्या (टिळक, केशवसुत, विनायक, गोविंदाग्रज आणि बालकवी यांच्या) नंतर म्हणजे १९२० साला-नंतर, रविकिरणमंडळाच्या स्थापनेपासून ज्या कवींनी काव्यरचना केली त्यांचे

काव्य आपल्या ध्यानीमनी अगदी ताजे आहे. काव्याची आधुनिकता रविकिरणमंडळातील कवींनी सर्वगुणसंपन्न केली आहे. तिचा परिचय म्हणून या काव्यविभागाचा लक्षपूर्वक अभ्यास आपण केला पाहिजे.

जीवनात प्रवेश करून विहार करू लागलेल्या शिशुमनापासून तो मृत्यूच्या समोर येऊन ठाकलेल्या प्रौढ मनापर्यंत संपूर्ण जीवनग्रंथाचे विस्तृत 'भाष्य' आणि संपूर्ण जीवनाचा रसास्वाद आधुनिक काव्यात उपलब्ध होत आहे. बाल-बालिका, तरुण–तरुणी, प्रियकर–प्रिया, पति–पत्नी, प्रेमपूर्ती लाभलेले आणि प्रेमभग्न, संतप्त आणि वंचित, परित्यक्ता, विधवा, सुखी आणि दु:खी, माता, पिता, गुरू, मित्र, देशसेवक, समाजसेवक, धर्मवीर आणि धर्मगुंड, दुबळे आणि समर्थ, श्रमजीवी, अशी मानवी जीवनाची अनंत दर्शने आधुनिक काव्यात होत आहेत. काव्याच्या अनेक व्याख्यांपैकी, Poetry is criticism of life ( कविता म्हणजे संसृती – टीका ) ही व्याख्या घ्या किंवा Poetry is appreciation of life ही व्याख्या घ्या. या दोन्ही व्याख्यांच्या कसोटीस आधुनिक मराठी काव्य उतरेल यात शंका नाही.

या दृष्टीने या कालखंडातील पाच प्रमुख कवींच्या कवितांचे संकलन आणि संपादन या ग्रंथात केले आहे.

"मराठी कविता ही शब्दसौष्ठव, वृत्त, कला वगैरे अनेक दृष्टींनी संपन्न होत चालली आहे. तिला ध्येयवाद पटला आहे व तिची दृष्टी सौंदर्यस्पर्शी झाली आहे. तिच्यात सखोलता व व्यापकता ही आता येऊ लागली आहेत......आजच्या तरुण कवींची नीट जोपासना करून उद्यांकडे पाहा म्हणजे तो काल जास्त उज्ज्वल दिसेल व त्यांत ही रसवाहिनी जोराजोराने फोफावत पुढे चाललेली दिसेल."

ह्या एका विद्यमान कविवरांचा ( गिरीश ) 'निरोप' या ग्रंथाच्या अभ्यासू रसिकांस सांगून हे प्रास्ताविक संपवितो.

टिळक-पुण्यतिथी :
पुणे, १ ऑगस्ट १९४६.

**गं. भा. निरंतर**

# भास्कर रामचंद्र तांबे

" कवीच्या मोठेपणाचे एक दुहेरी गमक असे की, तो स्वयंभू असून त्याची छाप पाठीमागून येणाऱ्या इतर कवींवर पडलेली असावी. "

—प्रा. रा. श्री. जोग

वरील गमकाप्रमाणे मोठेपण लाभलेले तांबे हे एक कवी आहेत. गोविंदाग्रज बालकवी, टिळक इत्यादी कवींच्या नंतरच्या काळात झालेले जे अगदी आधुनिक कवी आहेत, त्यांत तांबे हे श्रेष्ठ आहेत. काव्यगुणाच्या श्रेष्ठत्वाबरोबर त्यांना वयाचेही ज्येष्ठत्व लाभले. त्या दृष्टीने आधुनिक काव्ययुगातही ते ज्येष्ठस्थानी आहेत. त्यांचा जन्म केशवसुतांच्यानंतर ८ वर्षांनी म्हणजे १८७४ मध्ये झाला आणि टिळक, गोविंदाग्रज, बालकवी यांच्या मृत्यूनंतर ते २० वर्षे काव्यनिर्मिती करीत होते. महाराष्ट्र-काव्यपरंपरेत फार मोठे मानाचे स्थान मिळविलेल्या या कवीचा जन्म, बालपण, तारुण्य, उपजीविका अशी सर्व हयात अंतकालपर्यंत महाराष्ट्राबाहेर गेली. तांबे यांचे पूर्वज मूळचे कोकणातील. परंतु मराठी साम्राज्याच्या उत्तरेकडील हालचालीच्या काळी तांबे-कुटुंब नर्मदेच्या उत्तरेस झांशी येथे स्थायिक झाले. भास्करराव यांचा जन्म २७ नोव्हेंबर १८७४ रोजी मुगावली येथे झाला. त्यांचे वडील झाशी संस्थानात कारकून होते. बेताचे उत्पन्न व मोठे कुटुंब यामुळे मुलांच्या शिक्षणाची आबाळ होणे अपरिहार्य होते. त्यांच्या शिक्षणाची सुरुवात मुगावली येथे एका खाजगी शाळेत झाली. तेथे बालबोध व मोडी लेखन, वाचन, गणित व सुंदर अक्षर यांपलीकडे त्यांना ज्ञान लाभले नाही. ज्ञानाच्या दृष्टीने त्या काळी फारसे पदरात पडले नाही, तरी भास्कररावांनी बालपणी गावातल्या नदीकाठी आणि रानावनात स्वैर विहार करण्याची हौस मनसोक्त भागवून घेतली. खेडेगावच्या शाळेतले सर्व शिक्षण संपल्यावर पुढे शिक्षणाची सोय होईपर्यंत भास्करराव गावात भिक्षुकी करीत राहिले. परंतु घरातल्या वातावरणामुळे त्यांना वाङ्मयाचाही सहवास घडत राहिला. आईला वाचून दाखविण्याच्या निमित्ताने त्यांनी संतचरित्रांचे रसभरित वर्णन करणारे ग्रंथ वाचले.

असा काही काळ गेल्यावर वयाच्या १४ व्या वर्षी भास्करराव देवास येथे आपल्या आजोळी गेले. तेथे गेल्यावर त्यांनी इंग्रजी शिक्षणास आरंभ केला. मूळची प्रखर बुद्धी व स्वतःचे श्रम यांच्या जोरावर भास्कररावांनी मध्ये वाया गेलेली वर्षे भरून काढली आणि वयास अनुरूप अशी शिक्षणाची मर्यादा गाठली खरी. परंतु घरच्या गरिबीने त्यांची पदोपदी अडवणूक झाली. त्यांचे वडील बंधूही शिकत होते. ते मॅट्रिक झाल्यावर दोघांचे शिक्षण करणे शक्य नसल्यामुळे रामचंद्रपंतांनी भास्कररावांचे शिक्षण थांबवून त्यांना उज्जयिनीस काही नोकरी शोधण्याच्या इराद्याने पाठविले. तेथे भास्कररावांनी ग्वाल्हेर संस्थानच्या कायद्याचा अभ्यास सुरू केला. परंतु शिक्षणासाठी त्यांचे तळमळणारे मन स्वस्थ राहीना. एक दिवस रात्री त्यांनी गुपचूप घर सोडले आणि २५ मैलांचा प्रवास पायी करण्याच्या निश्चयाने ते देवासकडे निघाले. त्यांची शिक्षणाची तळमळ पाहून त्यांच्या आजोबांनी त्यांना शाळेत घातले. तेथे लेले नावाच्या गुरुजींच्या अपत्यवत् वात्सल्याने भास्कररावांना फार मोठा आधार दिला. ४ वर्षांत त्यांनी ८–१० वर्षांचा अभ्यास पुरा केला व १८९३ साली म्हणजे १९ व्या वर्षी ते मॅट्रिक झाले.

शिक्षणाची संधी मिळताच भास्कररावांनी सर्व वेळ अध्ययनात घालविण्यास सुरुवात केली. याच सुमारास त्यांनी काव्यलेखनासही सुरुवात केली. पुढील शिक्षणाच्या आतुरतेने ते कॉलेजच्या प्रवेशद्वाराकडे जाण्याची धडपड करीत होते. इतक्यात वडील परलोकवासी झाले! वडील बंधूंचेही शिक्षण पूर्ण झाले नव्हते. त्यांनी स्वावलंबनाने आग्रा येथे बी. ए. चा अभ्यास सुरू केला होता. भास्कररावांचे पितृतुल्य गुरुजी लेले हे भास्कररावांसाठी शिष्यवृत्तीची खटपट करीत होते. परंतु शेवटी मिळाली ती स्कॉलरशिप एंजिनिअरिंगच्या शाखेची होती. भास्कररावांना त्या बाजूस जाण्याची इच्छा नव्हती. शेवटी दुसऱ्या एका उदार गृहस्थाच्या साहाय्याने भास्करराव इंदूर येथे कॉलेजात दाखल झाले! परंतु कॉलेजचे उघडलेले द्वार भास्कररावांना आपल्या हाताने बंद करावे लागले ते आपल्या वडील बंधूंच्या शिक्षणासाठी! बंधूंच्या शिक्षणाचा मार्ग सुलभ करण्यासाठी ते देवासला परत गेले आणि रु. २० वर आपल्या लेले गुरुजींच्या शाळेतच शिक्षक झाले! परंतु त्यांच्या सुदैवाने तेथे त्यांना हात दिला.

देवासच्या बाल-युवराजांसाठी एक शिक्षक पाहिजे होता. भास्करराव राजपुत्राचे शिक्षक झाले. स्वतःच्या शिक्षणाचा विचार पूर्णपणे सोडून देऊन ते आदर्श शिक्षक होण्याची तयारी करू लागेल आणि त्या बाबतीत त्यांनी धन्यवाद मिळविले. राजपुत्रांच्या शिक्षणाच्या निमित्ताने त्यांना ग्रंथसंग्रहाची सोय मिळाली. त्याचा भास्कररावांनी मनसोक्त फायदा घेतला. कॉलेजच्या शिक्षणाची उणीव त्यांनी स्वतःच भरून काढली. काव्यलेखनासही हळूहळू बहर येत होता. उत्तम काव्याचे आदर्श डोळ्यांसमोर ठेवून ते काव्यलेखन करीत होते आणि मनासारखे काव्य जमले नाही, म्हणून त्यांनी कित्येक कविता आपल्या हाताने नष्ट केल्या. त्यांना टाकाऊ वाटलेल्या कवितांपैकीच 'डोळे हे जुलमि गडे' ही कविता आहे! अशा काही कविता त्यांच्या स्मरणात राहून गेल्या म्हणूनच त्या वाचकांच्या हाती लागल्या आहेत.

१८९५ साली वडील बंधू पदवीधर झाले व चांगल्या नोकरीस लागले आणि भास्करराव आपल्या थोर कर्तव्यातून यशस्वीपणे पार पडेल. १८९६ साली वयाच्या २२ व्या वर्षी त्यांचा विवाह झाला आणि आपल्या पत्नीच्या ठिकाणच्या थोर गुणांच्या सहवासात भास्कररावांचे जीवित आणि काव्य मोठ्या डौलाने फुलू लागले. त्यांच्या प्रेमगीतांचे मुख्य अधिष्ठान म्हणजे त्यांच्या पत्नी होत. अशा गृहिणीच्या सहवासात त्यांचे मन म्हातारपणी उत्साही आणि तरुण राहिले. त्यांच्या प्रौढ वयातील प्रेमगीतांतही तरुण मनाचे प्रतिबिंब दिसते. कारण तांबे मनाने म्हातारपणीही तरुणच राहिले!

भास्करराव देवासच्या राजपुत्राबरोबर इंदुरास १९०१ मध्ये गेले. तेथे खासेसाहेबांचे शिक्षण पूर्ण होईपर्यंत ते राहिले आणि नंतर देवासला महाराजांचे खाजगी कारभारी झाले. दोन वर्षांनी देवासचे वकील म्हणून ते इंदुरास राहू लागले. ही नोकरी १९०८ पर्यंत होती. या सुखाच्या नोकरीची सहा वर्षे भास्कररावांनी अखंड अध्ययनात घालविली. आंग्ल वाङ्मयाच्या अभ्यासाची उत्कंठा तृप्त केली व इतर भाषांतीलही विविध वाङ्मय मनमुराद वाचले. इंदुरास त्यांनी आपल्या घरी वाङ्मयप्रेमी लोकांचा एक मेळाच तयार केला आणि ते काव्यावर कॉलेजातही व्याख्यान देऊ लागले.

१९०९ मध्ये न्यायाधीश म्हणून त्यांची एका खेडेगावी रवानगी झाली. दोन वर्षे त्या कुग्रामात काढल्यावर १९११ साली ते पिप्लोदा संस्थानात

दिवाण झाले. चार वर्षे दिवाणपदाचे काम केल्यावर आपल्या सडेतोड स्वभावास प्रतिकूल परिस्थिती उत्पन्न झाली म्हणून त्यांनी त्या जागेचा राजीनामा दिला. १९२० पर्यंत ते आणखी एक-दोन संस्थानांत बड्या हुद्द्यावर काम करीत होते. प्रत्येक ठिकाणी त्यांच्या न्यायप्रियतेने कीर्ती दिली आणि त्याच वृत्तीमुळे त्यांना संस्थानी वातावरणाचा निरोप घेण्याचे प्रसंग आले. १९२० साली ५–६ महिने ते घरीच बसून होते. त्या वेळी देशात चाललेल्या असहकार-युद्धाकडे एकाग्र चित्ताने ते पाहत होते. राष्ट्रीय संस्थेत काम करण्याच्या इच्छेने ते पुण्यासही गेले. परंतु त्याच वेळी त्यांना त्यांच्या शिष्याकडून — खासेसाहेबांकडून — ग्वाल्हेरास बोलावणे आले. खासेसाहेब त्या वेळी ग्वाल्हेर येथे होम-मेंबर होते. भास्करराव अजमेर तेथे ग्वाल्हेरच्या सरदारांच्या मुलांचे पालक म्हणून नोकरी करू लागले. तेथे १९२३ साल-पर्यंत राहिल्यावर ते ग्वाल्हेर सरकारच्या ताब्यातील एका मांडलिक संस्थानचे सुपरिंटेंडेंट झाले आणि १९२६ साली खुद्द ग्वाल्हेरलाच शिक्षणखात्यात परीक्षा-विभागाचे रजिस्ट्रार म्हणून दाखल झाले. १९२६ सालापासून शेवट-पर्यंत ते ग्वाल्हेरलाच संस्थानची सेवा करीत होते. ५२ व्या वर्षापर्यंत नोकरीसाठी अनेक स्थित्यंतरे झाली ती शेवटी थांबली आणि त्यांना स्थिर जीवनाचा लाभ आयुष्याच्या उत्तर विभागात सुमारे १५ वर्षे तरी लाभला. ग्वाल्हेर येथे ७ डिसेंबर १९४१ रोजी ते वयाच्या ६७ व्या वर्षी निधन पावले.

या ६७ वर्षांत भास्कररावांच्या जीवितात अनेक स्थलांतरे आणि स्थित्यंतरे झाली. त्यांतून त्यांचे काव्य जन्मास येऊन विकास पावत गेले आणि वयाबरोबर झालेला त्याचा पूर्ण विकास रसिकांस लाभला आहे. त्यांच्या काव्यामुळेच त्यांची स्मृती मराठी वाङ्मयात अविस्मरणीय झाली आहे.

या काव्याचे हे मोठेपण, त्यांत कवीच्या अंतःकरणाचे जे मनोरम प्रतिबिंब पडले आहे, त्यात आहे. आपल्या काव्याविषयी तांबे यांनीच विस्तृत खुलासा केला आहे. ते म्हणतात :

“ माझ्या कवितेची वाढ माझ्या जीवनाच्या संगतीने झाली आहे. माझ्या कवितांचा आधार येथून तेथपावेतो समाजाच्या अंतर्बाह्य अवलोकनावर आहे.”

प्रसिद्धीची हौस तर दूरच, परंतु अगदी स्पष्ट नावड असल्याने भास्करराव यांच्या काव्याचा परिचय मराठी वाचकांस फार उशिरा झाला. कवी मायदेव यांनी त्यांच्या कवितांचा पहिला विभाग १९२० साली प्रसिद्ध केला. तोपर्यंत वयाच्या ४६ व्या वर्षापर्यंत कवी म्हणून त्यांची फार थोड्या लोकांना माहिती होती ! त्यांनी काव्यलेखनास आरंभ मात्र १८९० पासून म्हणजे वयाच्या १६ व्या वर्षीच केला. तीस वर्षे त्यांचे काव्य वाचकांपुढे फारसे आले नाही खरे; परंतु त्याचा विकास प्रसिद्धीवाचून थांबला नव्हता. एखाद्या उद्यानात हिंडता हिंडता एखादे पूर्ण विकसित पुष्प एकदम नजरेस पडावे आणि प्रथमदर्शनीच त्याचा रंग, रूप आणि गंध यांनी मनास एकदम मोहिनी पडावी ती मात्र कायमची, तसे तांबे यांच्या काव्याचे झाले. त्यांच्या कविता राग-तालात रचलेल्या असल्याने त्यांना गेयता प्राप्त झाली. मराठी काव्यप्रांतात हा एक नवाच प्रकार तांबे यांच्यापासून सुरू झाला. १९२० साली तांबे या अभिनव व आकर्षक स्वरूपात महाराष्ट्र-काव्योद्यानात आकस्मिकपणे प्रगट झाले. परंतु आता ते त्या काव्याने असंख्य रसिकांच्या अंतःकरणात वावरत आहेत.

१९२६ साली ते मध्यभारतीय कविसंमेलनाचे अध्यक्ष झाले. १९३२ सालच्या कोल्हापूर येथील साहित्यसंमेलनातील काव्यविभागाचे ते अध्यक्ष होते आणि त्यांचा ६१ वा वाढदिवस मराठी भाषेच्या सर्व प्रांतांत अतिशय मोठ्या प्रमाणावर साजरा झाला. त्या प्रसंगी त्यांच्याविषयीचा आदर रसिकांनी विविध प्रकारे व्यक्त केला. त्यात ‘ तांबे — व्यक्ति आणि कला ’ हा ग्रंथ विशेष उल्लेखनीय आहे. त्या ग्रंथात माधवराव पटवर्धन यांच्यासारख्या रसिकवराने केलेल्या रसाविष्करणाप्रमाणे स्वतः तांबे यांचेही काव्यविषयावरील अतिशय उद्बोधक लेख संकलित केले आहेत.

या लेखाच्या आरंभी प्रा. जोग यांनी तांबे यांचे काव्य स्वयंभू असल्याचे सांगितले आहे. त्याचा अर्थ असा की, इतरांपेक्षा त्यांच्या काव्याचा जन्म काहीसा निराळ्या स्थितीत झालेला आहे. “ सृष्टीचे बहुविध सौंदर्य आपण पाहणे व दुसऱ्यांस दाखवून देणे एवढेच कवीचे कार्य आहे असे त्यांचे मत असावे ” असे प्रा. जोग म्हणतात ( अर्वाचीन मराठी काव्य, पृ. १७० ) तेच कोणाही रसिकाच्या प्रत्ययास येईल.

तांबे यांच्या काव्यात हे सृष्टीचे बहुविध सौंदर्य व्यक्त झाले आहे. आपले वैयक्तिक जीवन ज्या ज्या अवस्थांतून गेले व ज्या ज्या अनुभवांशी समरस झाले, त्यांची त्यांची भावचित्रे म्हणजे त्यांचे काव्य. त्यात केवळ वैयक्तिक असा भाग बराचसा आहे. उदाहरणार्थ, त्यांची प्रेमकविता पाहा. जवळ-जवळ निम्म्या कविता या विभागात येतील. त्यात प्रेमभावनेचे त्यांना जे जे अनुभव आपल्या कौटुंबिक जीवनात आले त्यांचीच ती विविध चित्रे आहेत. वैवाहिक जीवनात तांबे हे पूर्ण समाधानी होते. त्यामुळे त्यांच्या प्रेमकाव्यात गोविंदाग्रजांच्या प्रेमकाव्यात दिसून येणारी आणि वाचकांस अतिशय अस्वस्थ करणारी अशी नैराश्याची छटा कोठे दिसत नाही.

जन्मजन्मिचें क्षुधाव्यथित मन
लाभुन तुज आकंठचि धालें
गे सखि जीवन सुफलित झालें

असे ‘ प्रेमान्त ’ विवाहाचेच उद्‌गार सर्वत्र आढळतात. पतिपत्नींच्या प्रेमाच्या ऐक्याचे, मीलनाचे व अद्वैताचे चित्र आपल्या विवाहापूर्वीच ते रंगवीत होते. १८९६ साली वयाच्या २२ व्या वर्षी त्यांचा विवाह झाला. त्यापूर्वीच्या कवितांत— (‘ तुजविण ’) —

वेणूंत नादसम नित्य सखे, हृदयांत
प्राणशी विहरशी उगम सुखाचा आंत

अशा ओळी आढळतात. विवाहापूर्वी लिहिलेल्या या ओळींत व्यक्त झालेली भावना कदाचित् केवळ कल्पनाविलास असू शकेल. परंतु विवाहोत्तर जीवनातही त्यांच्या काव्यात हीच भावना दिसून येते. यावरून त्यांच्या मनोधर्माचेच ते एक वैशिष्ट्य असून ते स्वभावतःच सर्व काळी व्यक्त झाले आहे असे म्हणावयास हरकत नाही. विवाहानंतर १२ वर्षांनी लिहिलेल्या कवितांत त्याच प्रेमभावनेचे स्वरूप दिसते. त्यातही प्रणयाचा प्रथम अनुभव घेणाऱ्या राजकन्येच्या उरातली धडधड त्यांना ऐकू येते. वयाच्या ४५ व्या वर्षीही, ‘ प्रेमोत्कर्ष मनें परस्पर जयीं आकर्षितो भूवरी ’ अशा वेळी महाकवीस

सांगता येणार नाही असे जे काही तरी त्याचे – त्या मन:स्थितीचे – बरोबर चित्रण ते करितात.

उत्कंठा ढकली पदोपदिं पुढें प्रीती उडी घाल्वी
माळा व्याकुळ ही: गळ्यांतिल करी, होई पळाचें युग

अशा रीतीने प्रणयभावनेतील सौंदर्याची विविध चित्रे रंगविण्याचे त्यांचे कौशल्य त्यांच्या काव्यात आरंभापासून अखेरपर्यंत दिसते.

हे सौंदर्य शरीरनिष्ठ नाही. ते वासनेला लाचार झालेले नाही. ते अलंकाराला हपापलेले नाही. ते अंत:करणात उदय पावणारे आणि अंत:करणासच प्रतीत होणारे आहे. त्यांनी स्त्रीमनाची विविध चित्रे रंगवून ही प्रतीती व्यक्त केली आहे.

—सहज तुझी हाल्चाल मंत्रें जणुं मोहिते
—जन म्हणति सांवळी तुज सगळे.
करुणार्ह बिचारे ते अंधळे !

इत्यादी ओळींतून त्यांनी प्रेमाचे सोज्वल, उदात्त स्वरूप वर्णन केले; तसेच प्रेमानुभवात शारीरिक आकर्षणही किती प्रभावी असते हेही,

—कांतेनें पहिल्या रसेंचि हृदया या टाकिलें व्यापुनी
—कांते, त्वन्मूर्ति येतां अनुपम शयनागार लागे खुलाया

अशा रीतीने त्यांनी स्पष्टपणे व्यक्त केले आहे. या भावनेपुढे सामाजिक पाश, सांकेतिक नीती, रूढी हीही काही क्षणी दुबळी ठरतात आणि एखाद्या विधवेचे मन

कुणि कसें म्हणा; कुणि करा हवें तें आतां—
ते कांत यापुढें मीहि तयांची कांता !

इतका आवेश दाखविण्यास सिद्ध होते. परंतु या साहसास तयार न झालेले व्यथित पापभीरू मन आतल्या आत कसे व्याकुळ होत असते तेही पुढील काव्यपंक्तीत दिसते :

सांगुं तुम्हांला किती दयाळा ?
न घडे त्याचे नांव कशाला ?
——बोल न बोला एकहि यावर !
धैर्यांचे हो ढळतिल डोंगर !
भलतें जाइल निघोनि उत्तर !
भागिदार व्हा नच नरकाला !

प्रेमाचा प्रथमानुभव प्रेमाच्या प्राप्तीनंतरच्या सुखानुभवांतील पहिल्या क्षणाची अधीरता व उत्कटता, प्रिया व प्रियकर यांची मीलनातील सर्वव्यापकता आणि धुंदी या सर्वांची रेखीव काव्यचित्रे त्यांनी काढिली. परंतु विधवा मातेच्या जीवनातले दुःख याहिपेक्षा तीव्र असते आणि त्यात तिचे काही निराळेच सामर्थ्य प्रगट होते.

मोलमजूरी करीन बाळा
भिक्षा मागिन रे वेल्हाळा
परि भरीन हीं तोंडें चिमणीं

अशा निर्धाराने ती विधवा आत्महत्त्येने यातनांतून सुटण्याचा विचार रहित करून ‘ आई ’ म्हणून कष्टतर जीवनाचे आघात स्वीकारू लागते. प्रिया, पत्नी, विधवा, माता अशी स्त्रीमनाची विविध स्वरूपे तांबे यांच्या काव्यात दिसतात. स्त्रीजातीबद्दल त्यांची दृष्टी ‘ भयचकित नमावें तुज रमणी ! ’ इत्यादी गीतांत व्यक्त झाली आहे. तेथे ते म्हणतात——

महाकवी, तत्त्वज्ञ, भूपती
समरधुरंधर वीर धीर-गति
स्थितप्रज्ञ हरि उरीं कोंडिती
प्रसव तयांची तूं जननी !

सुंदर स्त्रीच्या अप्रतिम लावण्यदर्शनाचे पर्यवसान मांगल्याची ओळख होण्यात व्हावे, अशी त्यांची सौंदर्यास्वादाची भूमिका आहे.

पापाची स्मृति राहिली जर नरा पाहूनि ही सुंदरी
धिग्धिक् त्या कळली अगाध हरिची नाहींच कारागिरी.

ही ‘ हरिची अगाध कारागिरी ’ त्यांना जशी तरुणतरुणींच्या सलज्ज कुजबुजीत ऐकू येते तशी वृक्षझऱ्यांचे मधुर गूज जेथे आहे तेथेही दिसते. ती कारागिरी तांबे यांना आत्मत्यागाने चिरंजीव झालेल्या हुतात्म्यांच्या जीवनांतही दिसते. ‘ चिरंजीव कोण ’ या कवितेत ते म्हणतात :

तेची चिरंजीव जगीं जहाले,
—वेल्हाळ कांता गृहिं सोडुनिया
तोडोनिया जे धन मोहजाला,
ज्याला रुची अन्न असें त्यजोनी
यजोनि तेजा निजदेशकार्यीं.

अशा हुतात्म्यांची जीवने पाहिली की आल्पात्म्यांच्या मनास आपल्या कर्तव्यहीनतेची तीव्र बोचणी लागते आणि

धिग्धिग् जीवन हें ! असें मन अतां धिक्कारितें गे मला
त्यातें तूं धरिशील काय हृदयीं पान्हा फुटोनी तुला ?

असे ‘ मातृभूमीप्रत ’ कळवळून केलेल्या विनवणीचे शब्द तोंडातून बाहेर पडतात. आत्मदानाने जे जिरंजीव होतात त्यांची परंपरा जगात अखंड आहे. असा एक महात्मा भूतलावर अवतीर्ण झाला आहे आणि भक्तिभावाने कविमन त्यास वंदन करू लागले आहे. ‘ वाटलें नाथ हो ! ’ या कवितेत ( १९२७ साली ) तांबे यांनी असे वंदन केले आहे :

वाटलें उघडलीं द्वारें तीं स्वर्गाचीं,
वाटलें धावली माउलि ती गरिबांची
वाटलें पळालीं सकळ संकटें साचीं
गरिबांचा आला वाली !

अशा महात्म्यांच्या पुण्याईने आता मुक्तता होईल अशी आशा वाटावी आणि मुक्ततेचा क्षण येण्यापूर्वीच ते महात्मे पुन्हा निजधामी जावयास निघालेले पाहिल्यावर

राजराजेश्वरा ! हो दयाळा !
तांतडी कां असे हो निघाळां ?

असा आक्रोशही लोकमान्यांस उद्देशून लिहिलेल्या कवितेतून बाहेर पडला आहे. अशा कविता वाचल्यावर तांबे यांची आत्मनिष्ठा बाहेरच्या जीवनातील सुख-दुःखांशीही आत्मीयतेने एकरूप पावण्याइतकी व्यापक होती हे दिसून येते.

तांबे यांनी लिहिलेली ' नाट्यगीते ' त्यांच्या भावगीतांइतकीच लोकप्रिय झाली आहेत. नाट्यगीतांत इतरांच्या भावनांशीही ते इतके समरस झालेले दिसतात की, त्यांत भावगीतांइतकीच उत्कटता आली आहे. तांबे यांच्या नाट्यगीतांनंतर मराठीत नाट्यगीतांची रचना अतिशय लोकप्रिय झाली. तांबे हे मराठी नाट्यगीतांचे प्रवर्तक ठरले आहेत.

काव्य कोणत्याही परिणामाच्या हेतूने जन्मास येत नाही असे ते आपल्या गद्य लेखांतून वारंवार् सांगतात; तरी श्रेष्ठ कलेचा हेतू व परिणाम ही एकच असतात हे त्यांच्या काव्यावरून दिसते. प्रचारात्मक वाटणाऱ्या कवितेचा त्यांना विलक्षण तिटकारा असला, काही तरी संदेश देणारी कविता त्यांना कमअस्सल वाटली असली आणि त्या दृष्टीने त्यांनी केशवसुतांच्या काव्याविषयी अप्रीती दाखविली असली, तरी त्यांच्याच निर्हेतुक काव्यानेही वाचकांच्या जीवनात काही उद्बोधन व विकास होत असल्याचा अनुभव येतो. कवीने स्वतः काव्य-निर्मिती करताना जरी केवळ सौंदर्यानुभवाचा आत्माविष्कार एवढाच हेतू, हीच आत्मनिष्ठा ठेवली असली तरी त्याची कलाकृती प्रगट झाली की, तिचे परिणाम त्यांच्या जीवनाच्या कक्षेपुरतेच राहत नाहीत. उदा०, ' घन तमीं शुक्र बघ राज्य करी ' ही कविता लिहिताना कवी जरी आपल्यापुरतेच मनात काही सांगत असला तरी त्या वृत्तीशी कवितेच्या साहाय्याने अनेक वाचक एकरूप झाले की तेही स्वतःशी म्हणू लागतात, " घन तमीं शुक्र बघ राज्य करी । रे खिन्न मना बघ जरा तरी ! " तांबे यांचें ' रुद्रास आवाहन ' वाचले की, एका जगड्व्याळ क्रांतीचे चित्र डोळ्यासमोर उभे राहते. असंख्य

मुक्या मनांतल्या आशा हजारो जिभांनी बोलू लागल्या आहेत व गर्जू लागल्या आहेत असे वाटते. ' रुणुझुणु ये ' हे गीत गुणगुणू लागले की अनेक मातृ-हृदये उचंबळून येतात. ती कवीला कदाचित अज्ञातच राहिली असतील आणि पैलतीरी लागलेल्या अनेक नेत्रांना ' रिकामे मधुघट ' या कवितेत व्यक्त केलेल्या हृदयाला ' भिवविणाऱ्या संध्याछाया ' जीवनप्रवासात सोबती अचानक भेटल्यासारखा आनंद देतील !

तांबे यांच्या कवितेत ही जी अनुभवाची एकात्मता अनुभवावयास मिळते यातच त्यांच्या काव्याचे वैशिष्ट्य आहे. मनापासून वाटल्याखेरीज त्यांनी कधी काही लिहिले नाही आणि वाटले त्या वेळी, वाटले तसे लिहिले. त्यांच्या मनावर विविध अनुभवांचे जे संस्कार झाले होते ते त्यांच्या काव्यात जसेच्या तसे प्रति-बिंबित झाले आहेत. कारण त्यांनी काव्यलेखनात स्वतःच्या गरजेपलीकडे व समा धानापलीकडे दुसरा हेतूच बाळगला नाही. त्यांच्या काव्यसंग्रहात ते कधी लहान मुलांबरोबर ' चिंवचिंव चिमणी छतांत ग ' हे गाणे गाताना दिसतात, कधी ' रमणिसंगमा उत्सुक ' अशा हृदयाने प्रियेची मार्गप्रतीक्षा करताना दिसतात. कधी प्रियकराबरोबर बावरलेल्या नववधूची गोड धांदल पाहण्यात रंगतात तर कधी प्रेमप्रसंगात अचानक गवसलेल्या तरुणीची ' दृष्ट ' काढीत बसतात. कोठे ते जिवलगेस ' ठावा न सुखाचा वारा ' म्हणून हळहळतील, तर केव्हा परित्यक्तेच्या दुःखाला साथ देत ' कां रे जाशी मज त्यजुनी ' असे त्या क्रूरास विचारतील. या विविध मनोवृत्तींत शैशवापासून तो वृद्धत्वापर्यंत त्यांच्या जीवनाच्या विकासाचे दृश्य दिसते आणि शेवटी पूर्णाहुतीसाठी जीवनाचे विकसित पुष्प हातात घेऊन ते महाप्रयाणास सिद्ध आहेत असे दिसू लागते.

—कोणि आणूं नका आंसवें लोचनीं.
छे ! न ही शून्यता ! पूर्णता सद्गती !
—आज वीणेवरी भगवती शारदा
साममन्त्रावली स्वैर आलापु ती.
—आज पुष्पांजली स्थण्डिलीं अर्पुनी
स्वस्तिवचनीं करा सांगतासिद्धि ती

अशी त्यांची मनःस्थिती १९३५ च्या सुमारास झालेली दिसते. 'दिव्याङ्गनेच्या ओढीने' ते आपले रिकामे मधुघट पुन्हा भरण्यासाठी इहलोकातून परलोकी गेले. त्या वेळी रसिकही असेच म्हणू लागले—

ऊठ हे मनोभिराम,
तिष्ठतसें मी सकाम;
रुदन करीं, कोण परी मूर्ति ती जीवाची ?

तांबे यांची मूर्ती यापुढे दिसली नाही तरी त्यांचे काव्य आपले सांत्वन करीत राहील.

फूल गळे, फळ गोड जाहलें,
बीज नुरे, डौलांत तरु डुले;
तेल जळे, बघ ज्योत पाजळे,
कां, मरणिं अमरता ही न खरी ?
मना, वृथा कां भीशी मरणा ?
दार सुखाचें तें हरि-करुणा !
आई पाही वाट रे मना,
पसरोनि बाहु कवळण्या उरीं.

त्या जगन्माउलीच्या अंकावर ते आता शांत झोप घेत आहेत.

जीवितातील पार्थिव सुखाने वेडे झालेले त्यांचे मन प्रौढपणी अशा काही चिरंतन शांतीचा शोध करू लागले होते. या जीवनातील हरीच्या जादुगिरीने त्यांचे मन आनंदाने नाचू लागे, त्याच्यामागे धावू लागे आणि त्याच वेळी मधूनमधून त्यांना पैलतीरावरून हाक ऐकू येई. त्या हाकेसरशी मनाला निराळीच ओढ वाटे. या जीवनाइतकेच तेही जीवन त्यांना आनंदमय वाटत होते. जीवनाचा तिरस्कार त्यांना कधी वाटला नाही. पैल-तीरावरच्या जीवनाची अस्फुट भावना होऊ लागल्यावर ते तिकडे जाण्याची मनाची तयारी करू लागले होते. मृत्यूचे आव्हानशृंग ऐकू येऊ लागल्यावर ते

भयभीत झाले नाहीत. उलट ते सांगतात, ' मी आलोच. तयारीच चालली आहे. '

आशेनें कीं नैराश्यानें,
माधुर्यानें कीं लवणानें,
भरे कुंभ जो क्षणाक्षणानें
निमिषांत तुझ्या पदिं वाहतसे.

" महाप्रस्थानांत " ही तयारी कशी चालली आहे पहा.

चल पुढें मुकाट्यानें तूं,
आठवी कुलस्वामीला,
डोळ्यांस अमंगल पाणी
आणि न अशा शुभ वेळां.
—जरि वाट तुला नच ठावी
तीं ऐक पाउलें प्राणा
रे धीर धरीं रे पोटीं, संगिं ये जगाचा राणा.

मनाची महाप्रयाणासाठी तयारी झाल्यावर दुनियेचा निरोप घेताना,

सारे प्रेमीजन, करा बोळवण
पुढे आठवण, राहू द्यावी !

अशी त्यांनी विनंती केली आहे. त्यांच्या अविस्मरणी काव्याने ते कार्य पूर्णपणे केलेच आहे.

' कुस्करूं नका हीं सुमनें '

अशी रसिकांना कळवळून विनंती करण्याची आवश्यकता नाही हे मराठी काव्यप्रेमी वाचकांनी आपल्या रसिकत्वाने दाखविले पाहिजे.

♠ ♠ ♠

# गेली ज्योति विझोनिया : : १

(सुनीत)

गेली ज्योति विझोनिया मग फुका फुंका तयाला किती,
ओता आंत घृता, रचोनि समिधा, प्रार्था फुलें वाहुनी—
झालें स्थण्डिल थंडगार मृत तें, ज्योती न ये आंतुनी,
चालूं द्या मग वेदघोष तुमचा, ती वेदिशाला रिती.
गेली ती शुचिता, पवित्र झळके कोठोनि कान्ती तिथें?
लावा दीपशतां मशाल उजळा, कर्पूर जाळा उठा,
घण्टा घूर्ण पिटा, फुका मग फुका शंखा, नगारा पिटा—
थट्टा ती मग वस्तुची! सकळही कीं फोल छायाचि ते.
प्रीतिज्योति विलासिनीच हृदया टाकूनि गेल्यावरी
सारी भूप्रमदावली मग झटो, पेटेल कां ती तिथें?
गेली जादु, पिशाच विश्व मग हें निस्सत्त्व छायेपरी;
इन्दू, इन्दु न तो; पिशाच विधुचें! तारे, रवी हीं भुतें!
"जातां मी रविचन्द्र येतिल जसे तैसेच"—कां गे अशी
कान्ते, निष्ठुर बोलुनी हृदय हें फाडूनिया टाकिशी?

देवास, ता. ३ ऑगस्ट १९०३ ]

## पन्नास वर्षांनंतर : : २

( जाति – मुद्रिका )

तूं हुबेहूब साउली त्याच मूर्तिची—
हरपली दिवंगत झाली ! जी मूर्ति, साउली तिची १

भटकतां विदेशीं दीन हीन जी मुली,
कधिंकधीं मनोमय ऐशा स्वप्नभूमधें भेटली. २

संपला दिवस, गे अतां सांज जाहली;
कधिं घोर रात्र ये ऐशी हुरहूर जया लागली. ३

त्याचिया उषेचें चित्र, तया दाविशी !
कां जन्मभरी रचिली गे ती घडी अन्तिं मोडिशी ? ४

तें विकसित कमलापरी बिंब, ती प्रभा—
सौवर्ण शरांसम हा हा ! ते किरण झोंबती नभा; ५

तें हरित पल्लवांतील मंजु कूजन,
उघडणें नयन वेलींचें, तें त्यांचें आंदोलन ! ६

आवरीं, आवरीं मुली ! जाइं निर्दये !
जाईल जीव हा माझा पाहतां चित्र तें बये ! ७

लाविलें दार जखडोनि, कुलुप घातलें,
तें वाद्य उघडुनी हा हा ! कळ फिरवूं मन धावलें. ८

गत सूर ऐकतां भान न उरलें मुली,
जा ! पुरे करीं तव माया, हा हाय हद्द जाहली ! ९

चळ भरला म्हणशिल मला खरें तें मुली,
विसरूनि मला मी गेलों पाहूनि तुला या स्थळीं १०

बालार्क-किरण हे तुला न्हाउं घालिती,
या संध्याभेसुर छाया चहुंकडे मला घेरिती. ११

—चढणीवर पाउल तुझें, उतरणीवरी
भरभरां पाउलें माझीं पडतात सावरीं तरी. १२

तुज मण्डोळ्या प्रीतिच्या शोभती परी
वांकलों मृताशाभारें वाहुनि त्या पाठीवरी. १३

यापरी कोण तूं, कोण मीहि आठवें;
जें मेलें गेलें त्याचें भूत गे कशाला हवें ? १४

जा ! जाइं इथोनी, सुखें मरूं दे मला,
या लीला त्यास्तव राखीं जो प्रीतिमदें झिंगला. १५

परि तया करीं त्यावरी जया भेदिशी.
नच हत्या करि कवणाची, बघ दशा होय मम कशी ! १६

तूं नात जिची गे पणतू होउत तिला ।
रडणार कोण मजसाठीं ! नशिबास नर्क ठेविला ! १७

गुदरखेडा, मार्च, १९१०

## पन्नास वर्षांनंतर : : २

(जाति – मुद्रिका)

तूं दुवेहूव साउली त्याच मूर्तिची—
हरपली दिवंगत झाली ! जी मूर्ति, साउली तिची १

भटकतां विदेशीं दीन हीन जी मुली,
कधिंकधीं मनोमय ऐशा स्वप्नभूमधें भेटली. २

संपला दिवस, गे अतां सांज जाहली;
कधिं घोर रात्र ये ऐशी हुरहूर जया लागली. ३

त्याचिया उषेचें चित्र, तया दाविशी !
कां जन्मभरी रचिली गे ती घडी अन्ति मोडिशी? ४

तें विकसित कमलापरी बिंब, ती प्रभा—
सौवर्ण शरांसम हा हा ! ते किरण झोंबती नभा; ५

तें हरित पल्लवांतील मंजु कूजन,
उघडणें नयन वेलींचें, तें त्यांचें आंदोलन ! ६

आवरीं, आवरीं मुली ! जाइं निर्दये !
जाईल जीव हा माझा पाहतां चित्र तें बये ! ७

लाविलें दार जखडोनि, कुलुप घातलें,
तें वाद्य उघडुनी हा हा ! कळ फिरवूं मन धावलें. ८

गत सूर ऐकतां भान न उरलें मुली,
जा ! पुरे करीं तव माया, हा हाय हद्द जाहली ! ९

चळ भरला म्हणशिल मला खरें तें मुली,
विसरूनि मला मी गेलों पाहूनि तुला या स्थळीं १०

बालार्क-किरण हे तुला न्हाउं घालिती,
या संध्याभेसुर छाया चहुंकडे मला घेरिती. ११

—चढणीवर पाउल तुझें, उतरणीवरी
भरभरां पाउलें माझीं पडतात सावरीं तरी. १२

तुज मण्डोळ्या प्रीतिच्या शोभती परी
वांकलों मृताशाभारें वाहुनि त्या पाठीवरी. १३

यापरी कोण तूं, कोण मीहि आठवें;
जें मेलें गेलें त्याचें भूत गे कशाला हवें ? १४

जा ! जाइं इथोनी, सुखें मरूं दे मला,
या लीला त्यास्तव राखीं जो प्रीतिमदें झिंगला. १५

परि तया करीं त्यावरी जया भेदिशी.
नच हत्या करि कवणाची, बघ दशा होय मम कशी ! १६

तूं नात जिची गे पणतू होउत तिला ।
रडणार कोण मजसाठीं ! नशिबास नर्क ठेविला ! १७

गुदरखेडा, मार्च, १९१० ]

## भयचकित नमावें तुज रमणी ! : : ३

( जाति – प्रणयप्रभा, राग – भूप )

भयचकित नमावें तुज रमणी !
जन कसे तुडविती तुज चरणीं ? ध्रु०

महाकवी, तत्त्वज्ञ, भूपति,
समरधुरंधर, वीर धीरगति,
स्थितप्रज्ञ हरि उरीं कोण्डिती,
प्रसव तयाचा तूं जननी. १

भूत निघाला तव उदरांतुन,
वर्तमान घे अंकीं लोळण,
भविष्य पाही मुली, रात्रंदिन
तव हांकेची वाट मनीं. २

तुझ्या कांतिनें चंद्र झळझळे,
फुला फूलपण मुली, तुजमुळें,
रत्नीं राग तुझा गे उजळे,
तुझ्यास्तवच ही प्रिय भगिनी ! ३

प्रतापगड, ता. ३० सप्टेंबर १९२० ]

अनुक्रम ७४२५० दि: ...
... ९६६६० नों दि. २०।८।०७

## नववधू प्रिया, मी—



(जाति – नववधू, राग – ललत)

नववधू प्रिया ! मी बावरतें,
लाजतें, पुढें सरतें, फिरतें. ध्रु०

कळे मला तूं प्राणसखा जरि,
कळे तूंच आधार सुखा जरि
तुजवांचुनि संसार फुका जरि,
मन जवळ यावया गांगरतें.

मला येथला लागला लळा,
सासरिं निघतां दाटतो गळा,
बागबगीचा, येथला मळा
सोडितां कसें मन चरचरतें !

जीव मनींच्या मनीं तळमळे
वाटे बंधन करुनि मोकळें
पळत निघावें तुजजवळ पळें
परि काय करूं ? उरिं भरभरतें. ३

चित्र तुझें घेऊनि उरावरि
हारतुरे घालितें परोपरि,
छायेवरि संतोष खुळी करि
तूं बोलवितां परि थरथरतें. ४

अतां तूंच भयलाज हरी रे !
धीर देउनी ने नवरी रे !
भरोत भरतिल नेत्र जरी रे !
कळ पळभर मात्र ! खरें घर तें ! ५

प्रतापगड, १२ ऑक्टोबर १९२० ]

ग्रंथ संग्रहालय
९६६६०
दा. क्र.
संदर्भ शाखा

## घन तमीं शुक्र बघ राज्य करी ! : : ५

( जाति – नववधू, राग – केदार )

घन तमीं शुक्र बघ राज्य करी,
रे खिन्न मना, बघ जरा तरी ! ध्रु०
ये बाहेरी अंडें फोडुनि
शुद्ध मोकळ्या वातावरणीं,
कां गुदमरशी आंतच कुढुनी ?
रे मार भरारी जरा वरी. १
प्रसवे अवस सुवर्णा अरुणा,
उषा प्रसवते अनंत किरणां,
पहा कशी ही वाहे करुणा
कां बांगुल तूं रचितोस घरीं ? २
फूल हंसे कांट्यांत बघ कसें,
काळ्या ढगीं बघ तेज रसरसे,
तीव्र हिमांतुनि वसंतहि हंसे,
रे, उघड नयन, कळ पळे दुरी. ३
फूल गळे, फळ गोड जाहलें,
बीज तुरे डौलांत तरु डुले;
तेल जळे, बघ ज्योत पाजळे;
का, मरणिं अमरता ही न खरी ? ४
मना, वृथा कां भीशी मरणा ?
दार सुखाचें तें हरि–करुणा !
आई पाही वाट रे मना,
पसरोनि बाहु कवळण्या उरीं. ५

इंदूर, ता. २९ ऑक्टोबर १९२० ]

## रुद्रास आवाहन : : ६

(जाति – वीरभद्र, राग – शंकरा)

डुमडुमत डमरु ये, खण्खणत शूल ये,
शंक फुङ्कीत ये, येइं रुद्रा !
प्रलयघनभैरवा, करित कर्कश रवा
क्रूर विक्राळ घे क्रुद्ध मुद्रा ! ध्रु०

कडकडा फोड नभ, उडव उडुमक्षिका,
खडबडवि दिग्गजां, तुडव रविमालिका,
मांड वादळ, उधळ गिरि जशी मृत्तिका—
खवळवीं चहुंकडे या समुद्रां. १

पाड सिंहासनें दुष्ट हीं पालथीं,
ओढ हत्तीवरुनि मत्त नृप खालती,
मुकुट रंकास दे, करटि भूपाप्रती—
झाड खट्खट तुझें खड्ग क्षुद्रां ! २

जळ तडागीं सडे, बुडबुडे, तडतडे—
'शांति ही !' बापुडे बडबडती जनकिडे !
धडधडा फोड तट ! रुद्र, ये चहुंकडे,
धगधगित अग्निमधिं उजळ भद्रा ! ३

पूर्वि नरसिंह तूं प्रगटुनी फाडिले
दुष्ट जयिं अन्य गृहिं दरवडे पाडिले,
बनुनि नृप, तापुनी चंड, जन नाडिले—
दे जयांचें तयां वीरभद्रा ! ४

इंदूर, ता. २६ नोव्हेंबर १९२० ]

## रुणुझुणु ये ! : : ७

(जाति – शुभवदना)

रुणुझुणु ये, रुणुझुणु ये, झणकारित वाळा !
लुटुलुटुलुटु दुडुदुडुदुडु ठुमकत ये बाळा ! ध्रु०

धुंदि अजुनि रजनिनयनिं,
सावरुनि पदर धरुनि
शुभवदना उडुरदना देई जांभयाला. १

दिग्ललना धौतमुखी
रत्नदीप कनकतबकिं
घेउनिया बाहति या बालभास्कराला. २

काकड-आरति करिती
देवगृहीं नवयुवती;
आळविती; जागविती नंद-नंदनाला. ३

रजनितनय मारुतगण
नृत्य करिति चपलचरण,
तोम तननन झूम् झननन करिति गायनाला ४

जागति बघ चिउकाऊ,
लागति घरट्यांत गाउं;
डोलति तरु, लागति करुं ते हरिभजनाला. ५

जागति गोठ्यांत गाइ,
पाजति वत्सांस पाहिं
ये, रांगे, कळ लागे माझिया स्तनांला ! ६

अजमेर, ता. २४ जानेवारी १९२३ ]

## सहज तुझी हालचाल-- ८

( जाति – अरुण, राग – भैरवी )

सहज तुझी हालचाल मंत्रें जणुं मोहिते. ध्रु०
सहज चालणेंहि तुझें,
सहज बोलणेंहि तुझें,
सहज पाहणेंहि तुझें,
मोहनि मज घालितें. १

संसृतिचा घोर भार
बघतां तूं एकवार
विलया सखि, जाय पार,
देहभान लोपतें. २

देवी, वनदेवी म्हणूं,
स्वप्न, भास काय म्हणूं?
प्रतिभा कीं भैरवि म्हणूं?
मति माझी कुंठते. ३

एकवार बघ हांसुन
डळमळेल सिंहासन !
तळमळतिल मनिं सुरगण
हास्यास्तव खास ते. ४

ही अपूर्व शक्ति सगुण
झाडितसे मम अंगण
हें माझें भाग्य बघुन
जळफळतिल देव ते. ५

लष्कर – ग्वाल्हेर, ता. ३ एप्रिल १९२७ ]

## रिकामे मधुघट : : ९

(जाति – नववधू, राग – बागेश्री)

मधु मागशिं माझ्या सख्या, परी
मधुघटाचि रिकामे पडति घरीं ! ध्रु०

आजवरी कमळाच्या द्रोणीं
मधू पाजिला तुला भरोनी,
सेवा ही पूर्विंची स्मरोनी,
करिं रोष न सखया, दया करीं. १

नैवेद्याची एकच वाटी
अतां दुधाची माझ्या गांठीं,
देवपुजेस्तव ही कोरांटी
बाळगीं अंगणीं कशी तरी. २

तरुण-तरुणिंची सलज्ज कुजबुज,
वृक्षझऱ्यांचें गूढ मधुर गुज,
संसाराचें मर्म हवें तुज,
मधु पिळण्या परि रे बळ न करीं ! ३

ढळला रे ढळला दिन सखया !
संध्याछाया भिवविति हृदया,
अतां मधूचें नांव कासया ?
लागले नेत्र रे पैलतिरीं. ४

लष्कर – ग्वाल्हेर, १९३३ ]

## वाटेच्या वाटसरा ! : : १०

(जाति – मुद्रिका)

या, या हो, या हो रसिका, येथें लपा,
जो शब्द बाळपणिं गेला त्याचा हा तोटानफा.
ती काय बोलते ऐका चोरुनि जरा,
त्या तिऱ्हाईत पांथस्था जो आला तीच्या घरा.

(ओवी)

" जिवाचे लागेबान्धे
ठाव नाहीं सख्या भावा;
वाटेच्या मुशाफरा
जाई जाई दुजा गांवा. १

जन्मोजन्मींचं तें
तळां गेलं आतां पाप,
गुहेच्या अंधारांत
लोपलं रे आपोआप. २

चाळवोनी आतां
ओढिशी कां वरवर ?
वाटेच्या वाटसरा
दृष्ट जादूची आवर. ३

बिळांत झोपे नाग,
नको घालूं रे फुंकर,
चाळवून त्याला
नको ओढूं वरवर. ४

असावधपणीं
शब्द गेला कधीं काळीं,
भरल्या संसारांत
नको फोडूं रे किंकाळी ! ५
झालं गेलं आतां !
नाहीं त्याचा मागमूस;
माझे आई गंगे,
कां रे उकरिशी कूस ? ६
सांज झाली तरी
जाईं जाईं दुजा गांवा;
वाटेच्या वाटसरा,
नको साधूं पुरा दावा. ७
कालवूं विष नको
भरलेल्या आतां ताटीं;
झालं गेलं त्याची
कशासाठीं आटाआटी ? ८
जन्मजन्मींच्या रे
तुझ्या ऋणानुबंधाची
गोष्ट लांब गेली,
वाट पुढील जन्माची. ९
पुढील जन्मीं आतां
तुझा हिशेब करीन;
गहाण जीव माझा,
मी या जन्मीं पराधीन—" १०

लष्कर – ग्वाल्हेर, ता. २८ फेब्रुवारी १९३५ ]

# शंकर केशव कानेटकर

आधुनिक काव्य-रसिकांच्या तोंडी ' गिरीश – यशवंत ', ' यशवंत– गिरीश ' अशी नेहमी जोडीने नावे येतात. आणि त्यात बराच अर्थही आहे. कारण आधुनिक काव्याकडे रसिकांचे मन वळविण्यास या कवींचे काव्य बरेच कारणीभूत झाले आहे.

गिरीशांचा जन्म सातारा जिल्ह्यातील फत्यापूर या गावी ( त्यांच्या आजोळी ) १८ ऑक्टोबर १८९३ रोजी झाला. त्याच जिल्ह्यातले रहिमतपूर हे त्यांचे मूळ गाव. साताराच्या इतिहाससंपन्न वातावरणात त्यांचे इंग्रजी ५ वीपर्यंतचे शिक्षण झाले. १९१० साली त्यांना पुण्याच्या वास्तव्याचा लाभ झाला. पुण्यास न्यू इंग्लिश स्कूलमधून ते १९११ साली मॅट्रिक झाले. तरुणपणीच विद्येच्या माहेरी येता आल्याबद्दल गिरीशांना अतिशय धन्यता वाटावी यात काहीच आश्चर्य नाही. पुढे पुढे अनेक कारणांनी पुणे आणि डे. एज्यु. सोसायटीच्या शिक्षणसंस्था यांच्याशी त्यांचा जास्त निकट संबंध येत गेला. आपल्या उत्कट भावगीतांतून त्यांनी या संबंधातील जिव्हाळा वारंवार व्यक्त केला आहे.

मॅट्रिक झाल्यावर महाविद्यालयात प्रवेश करण्यासाठी त्यांचे मन आतुर झाले होते. फर्ग्युसन कॉलेजात त्यांनी प्रवेशही केला होता. परंतु पहिल्या वर्षांत शिकत असतानाच ते परिस्थितीच्या भोवऱ्यात सापडले. त्या विपरीत परिस्थितीशी त्यांना एकोणीस वर्षे झगडावे लागले.

त्यांनी कॉलेजात प्रवेश केला आणि वडिलांवर काही तोहमत येऊन ते बंदीवान झाले ! कुटुंबाचा एकमेव आधार बंधनात अडकल्यामुळे सर्व कुटुंब निराधार झाले. गिरीशांच्या तरुण मनातील उमेदी जमिनीवर कोसळल्या आणि वयाच्या १९ व्या वर्षीच त्यांना कुटुंबपोषणाचा भार अंगावर घ्यावा लागला. परंतु जीवनाच्या पुष्पोद्यानात प्रवेश करीत असतानाच तेथे एकदम काट्याकुट्यांचे रान माजले तरी गिरीशांनी मोठ्या धैर्याने ते रान पायांखाली तुडवीत आपले मार्गक्रमण चालू ठेविले. परिस्थितीने त्यांची अतिशय कुचंबणा चालविली होती आणि प्रपंचभाराखाली मन खचून जात होते तरी त्यांनी आलटून पालटून नोकरी व अभ्यास करीत करीत शेवटी १९२२

साली बी. ए. पर्यंत मजल गाठली. आणखी दोनच वर्षांनी एम्. ए. होऊन अभ्यासक्रम पुरा व्हावयाचा. परंतु धाकट्या भावंडांच्या शिक्षणासाठी त्यांना पुन्हा थांबावे लागले आणि शेवटी १९३० साली ते एम्. ए. झाले.

१९११ ते १९३० ही एकोणीस वर्षे गिरीशांच्या जीवितातील खडतर तपश्चर्येची होती. परंतु त्या संकटकालाचाही त्यांनी जास्तीत जास्त लाभ करून घेतला. भोवतालच्या व्यवहारी जगात वावरत असता चांगला, वाईट, मित्र, शत्रू यांची त्यांना पदोपदी पारख करावी लागली. या विपरीत परिस्थितीत त्यांना प्रा. वि. ब. नाईक यांच्यासारखे थोर गुरू लाभले. माणुसकीच्या सामर्थ्याने जीवनात असह्य परिस्थितीतही टिकाव धरता येतो याचा त्यांना अनुभव आला.

या माणुसकीच्या आधारावरच ते महान संकटातून पार पडले आणि विद्याभ्यासाचे आपले आवडते ध्येय १९ वर्षांच्या दीर्घ संकटकालातूनही त्यांना गाठता आले. अशा दृष्टीने या संकटकालात गिरीशांच्या मनाची फारच चांगली घडण झाली. हेच त्या वाईटातून चांगले निघाले. त्या कालात त्यांनी दाखविलेली कर्तव्यनिष्ठा ही वैयक्तिक ध्येयनिष्ठेपेक्षाही थोर आहे. कौटुंबिक व वैयक्तिक अशा दोन्ही कर्तव्यांतून यशस्वीपणे उत्तीर्ण होणे हे जीवनातले मोठे यश आहे.

१९३० साली फलटणकरांनी डे. ए. सोसायटीकडे हायस्कूलच्या मुख्याध्यापकाच्या जागेसाठी एखाद्या योग्य माणसाची मागणी केली. सोसायटीने गिरीशांची त्या जागेसाठी निवड केली. चार वर्षांत त्यांनी फलटण येथे आपल्या सुजनत्वाने अतिशय मोठा लौकिक मिळविला. १९३४ साली ते फर्ग्युसन कॉलेजात मराठीचे प्राध्यापक झाले. १९३७ साली ते पुणे न्यू इंग्लिश स्कूलमध्ये असिस्टंट सुपरिंटेंडेंट म्हणून काम करू लागले. १९३९ साली सोसायटीने मुलींचे हायस्कूल काढण्याचे ठरविले. त्या नव्या शिक्षणसंस्थेच्या कामी गिरीशांची योजना करण्यात आली. ( आज त्या हायस्कूलला अहिल्यादेवीचे नाव लाभले आहे. ) त्या शाळेच्या स्थापनेपासून तो तिला अल्पावधीत नावारूपास आणण्यापर्यंत गिरीशांनी अतिशय यशस्वीपणे कार्य केले. आता ते डेक्कन एज्युकेशन सोसायटीतून निवृत्त झाले आहेत.

कोणत्याही कार्यात गिरीशांची योजना झाली तरी तेथे ते आपलेपणाचे वातावरण निर्माण करतात आणि अंगीकृत कार्यात अल्पावधीत रमून जातात असा त्यांचा लौकिक आहे. अनुभवाने संपादिलेल्या माणुसकीचे स्वरूप त्यांच्या कार्यात नेहमी प्रकट होते. त्यांच्याशी ज्यांचा ज्यांचा संबंध येतो ते सर्व लहान, थोर, विद्यार्थी, सहकारी शिक्षक आणि सहकारी प्राध्यापक, विविध क्षेत्रांतील कनिष्ठांपासून वरिष्ठांपर्यंत सर्व लोक गिरीश यांच्याबद्दल बोलताना जो जिव्हाळा दाखवितात तोच त्यांच्या व्यापक सहानुभूतीचा आणि कर्तव्यनिष्ठेचा चालता बोलता पुरावा आहे.

भोवतालची माणसे आपलीशी करण्यात ते जी व्यापक सहानुभूती आणि समरसता दाखवितात तीच त्यांच्या काव्यातही आढळते.

पुण्यात आल्यावर अनंततनय, बालकवी, रेंदाळकर, अरविंद, अत्रे, अज्ञातवासी इत्यादी साहित्यिकांचा स्नेह त्यांना लाभला. त्या वेळी लौकिकदृष्ट्या ते इतरांपेक्षा कोठे मागेपुढे असले तरी अभिजात काव्यशक्ती-मुळे कवी म्हणून त्या वेळच्या प्रथितयश कविमंडळात ते सहज मिळून गेले. गिरीशांनी आपल्या लहानथोर कविमित्रांची मैत्री चिरस्थायी करण्याच्या भावनेने १९२० साली अरविंद, अत्रे, अज्ञातवासी व अनंततनय यांच्या सहकार्याने श्रीमहाराष्ट्रशारदामंदिर ही संस्था स्थापन केली. या संस्थेतूनच १९२३ साली रविकिरणमंडळ हे शारदामंदिराचे जणू काय एक कार्यकारी मंडळ तयार झाले. समानधर्मी माणसांना एकत्र आणून त्यांची संघटना करण्याचे गिरीशांचे कौशल्य आणि अभिरुची रविकिरणमंडळाच्या कार्यात नेहमी व्यक्त होई. आदरातिथ्य, गुणी माणसांच्या परिचयाची अगदी तीव्र ओढ इत्यादी स्वभावविशेषांनी गिरीश रविकिरणमंडळाशी एकजीव झाले. रविकिरणमंडळ म्हणजे गिरीशांचे घर असे होऊन गेले. आज अडगळी-सारखे झालेले "४६१ शनिवार, पुणे" हे घर त्या वेळी महाराष्ट्रात पुढे ख्यातनाम झालेल्या कविवरांचे विश्रांतिस्थान होते.

यशवंत, माधव जूलियन, माडखोलकर, दिवाकर, रानडे दंपती, विठ्ठलराव घाटे हे पुढे आपापल्या स्वयंसिद्ध प्रतिभेने विख्यात झाले. त्यांच्या गुणांचा विकास होत होता त्या वेळी गिरीशांच्या घरी 'रविकिरणमंडळ' म्हणून हे प्रथितयश प्रतिभावंत दर रविवारी नियमाने आणि एरव्ही

अनियमितपणे किती तरी वेळा एकत्र बसत-उठत असत आणि एकमेकांच्या काव्यांचा आनंद लुटीत असत! विशेषतः यशवंत – गिरीश व गिरीश– माधव जूलियन या जोडींच्या बैठका विशेष होत. या दृष्टीने तो काळ त्या त्या व्यक्तींच्या जीवनात तर अविस्मरणीय आहेच, परंतु त्यांच्या कर्तृत्वाने त्या कालखंडास ( १९२० ते १९३५ ) मराठी काव्याच्या इतिहासातही आज एक विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. रविकिरणमंडळात गिरीश हे एक मोठे आकर्षण होते.

मराठी काव्याची आधुनिकता जास्त प्रभावी करण्यासाठी रविकिरण-मंडळातील सप्तर्षी एकत्र आले होते, आणि ते कार्य त्यांनी यशस्वीपणे केले आहे. त्यात गिरीशांनी भरीव कार्य केले आहे.

सामाजिक सुधारणेस अत्यावश्यक अशी विचारपरंपरा आणि तत्त्वज्ञान काव्यद्वारा प्रसृत करणे हे रविकिरणमंडळाच्या ध्येयांपैकी एक प्रमुख ध्येय होते. गिरीशांनी आपल्या काव्यातून याच ध्येयाची हेतुपुरस्सर जोपासना केली आहे.

त्यांचे काव्य हरिभाऊ आपटे त्यांच्या ' करमणुकी 'तून ( १९११, दिल्ली दरबार अंक ) प्रथम प्रकाशात आले. रविकिरणमंडळाच्या ध्येयाची दीक्षा घेण्यापूर्वी त्यांच्या कविता ' करमणूक ', ' चित्रमय जगत् ', ' काव्यरत्नावली ', ' मनोरंजन ' इत्यादी नियतकालिकांतून प्रसिद्ध होत होत्या. परंतु मंडळाचे प्रकाशन म्हणून प्रसिद्ध झालेले ' अभागी कमल ' ( १९२३ ) हे खंडकाव्य रसिकांच्या दृष्टीस पडले तेव्हा त्यातील निश्चित तत्त्वज्ञानाने गिरीशांचे वैशिष्ट्य प्रगट झाले. एका वाचक – भगिनीने ' पण लक्षात कोण घेतो ? " या कादंबरीबरोबर ' अभागी कमले 'चा उल्लेख करून त्या काव्याचा अनाहूत-पणे गौरव केला. त्या पहिल्या खंडकाव्याने गिरीशांनी रसिकांचे लक्ष वेधले. आणि त्या काव्यातील विधवेच्या करुण जीवनाने वाचकांची अंतःकरणे हालविली. त्या काव्यात त्यांच्या काव्यविशेषांचाही वाचकास परिचय झाला. घोटीव रचना व निर्दोष शब्दयोजना या गुणांनी प्रथमदर्शनीच त्यांची कविता वाचकाचे मन आकृष्ट करते आणि परिचयाने उत्तम कलाकृतीच्या आस्वादाचा आनंद देते. ' अभागी कमल ' मध्ये वैधव्याची करुण कहाणी त्यांनी रंगविली तर ' कला ' ( १९१६ ) या खंडकाव्यात त्यांनी मिश्र-

विवाहाचे मंडन केले. १९२८ साली त्यांची ‘ आंबराई ’ प्रसिद्ध झाली. ग्रामीण जीवनावरील ते पहिले खंडकाव्य आहे. त्या खंडकाव्यात त्यांनी आपल्या रसवंतीचे भरास आलेले सौंदर्य प्रगट केले. त्यानंतर ‘ कांचनगंगा ’, ‘ फलभार ’ आणि ‘ मानसमेघ ’ या स्फुट कवितासंग्रहांत त्यांच्या भावगीतांचे सौंदर्य व्यक्त झाले आहे.

त्यांच्या कवितांत भावनेच्या प्रक्षुब्ध स्वरूपापेक्षा त्यांचे संयत स्वरूप व विचारांचे गांभीर्य जास्त आढळते, आणि कलात्मक सौंदर्यामुळे त्या कविता दीर्घकालपर्यंत मनात निनादत राहतात. सहजासहजी मिळेल त्या प्राप्तीत, जमलेल्या साहित्यातून टापटिपीचे सौंदर्य उभे करून स्वतःच्या वृत्तीने सर्वत्र आनंदाचे वातावरण उत्पन्न करणाऱ्या सुगृहिणीसारखी त्यांची कविता आहे. ‘ आंबराई ’तील निसर्गवर्णने जितकी हुबेहूब डोळ्यांसमोर उभी राहतात, तितकेच ‘ कांचनगंगे ’तील ( १९३० ) सारंगीवाला, कृतज्ञता, शूर्पणखा इत्यादी प्रसिद्ध भावगीतांतील प्रसंगही वाचता वाचता मनात रंगू लागतात. ‘ काव्यशिल्पी ’ असे त्यांचे वर्णन एका टीकाकाराने केले आहे. ते शिल्प एखादे दृश्य, एखादा प्रसंग किंवा सूक्ष्म भावना ‘ घडविण्यात ’ स्पष्ट दिसते. नागर जीवनाइतकीच ग्रामीण जीवनाविषयीही त्यांना आपुलकी असल्याने त्यांनी विशेषतः महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या नि कामकऱ्यांच्या जीवनातील विविध प्रसंग वेळोवेळी रंगविले आहेत. १९३९ साली त्यांनी हिंदुस्थानची सफर केली. त्या प्रवासात रसिकपणे पाहिलेली हिमालयातील स्वर्गतुल्य आनंद देणारी अविस्मरणीय दृश्ये, ‘ मानसमेघ ’ ( १९४३ ) या नव्या कवितासंग्रहात काव्यरूपाने रसिकांपुढे प्रगट झाली आहेत. या नव्या कवितासंग्रहातही उत्तुंग शिखरावरील मानस-मेघांच्या भावचित्राबरोबरच सपाटीवरचे ‘ सुंदर हिरवे माळ ’ आहेत. दिवाळी डोळ्यांसमोर दिसत असता दुष्काळाच्या कल्पनेने भांबावलेले एका कष्टाळू शेतकऱ्याचे अंतःकरण ‘ दौल्याची दिवाळी ’ या कवितेत दिसते. १९४२–४५ सालांत जगभर जी रणधुमाळी माजली तिचीही परिणामकारक भावचित्रे त्या काव्यसंग्रहात आहेत.

भोवतालच्या जीवनाकडे पाहताना एखाद्या कवीचे मन संतापाने बेभान होते. जगातील अन्याय आणि अरेरावी पाहून, दुःखितांचे आक्रोश ऐकून

सत्तामदाने झिंगलेल्यांचा नंगा नाच पाहून कोणी ‘ रुद्रास आवाहन ’ करतो, कोणी ‘ क्रांतीचा जयजयकार ’ करतो, तर कोणी आवेशाने ‘ गुलामांची गाऱ्हाणी ’ जगाच्या वेशीवर टांगतो. कवीच्या वृत्तीप्रमाणे अनुभवाची प्रतिक्रिया होते. त्याच जीवनात, त्याच संसारवनात हिंडत असता गिरीशांच्यासारखा कवी त्या अरण्यातील छायेच्या जागी आपणास घेऊन जातो. आणि तेथे प्रभुकृपेचे स्तवन करीत रसिकांस रंजवितो. आपल्या ‘ संसारवन ’ या कवितेत ते म्हणतात :

कांटेकुटे रानीं, किती या माजले
फुलांचे साजले वृक्ष परी
दगडधोंड्याला, पाय ठेंचाळती
हिरवळ भोंतीं परी मऊ
हिंस्र आरोळ्यांनीं, जरी रान भरे
निर्झर, पांखरें, गाती इथें
प्रखर उन्हानें, तापे रानकाया
परी गार छाया, कुठें भारी
संसाराच्या रानीं, दुःखसुख ऐसें
ठेविलें आपैसें दयाळा तूं
कशासाठीं बोल, लावावा मी तूज
सांपडतें गूज, नीट जातां

या अभंगात व्यक्त झालेल्या वृत्तीनेच ते जीवनातील सुखदुःखांचा विचार करतात. आधुनिक कवींप्रमाणे त्यांनी प्रेमविषयक कविता लिहिली तरी प्रणयरसात त्यांचे मन धुंद होत नाही. विधवा, परित्यक्ता, पतिता अशा स्त्रियांच्या जीवनातील दुःखांची जाणीव त्यांना आहे. त्यांच्या जीवनातील दुःखे सामाजिक अरेरावीने निर्माण झालेली आहेत हेही त्यांना माहीत आहे. तरी त्यांच्या जीवनाची शब्दचित्रे रेखाटताना सामाजिक अन्यायाबद्दल चीड उत्पन्न करण्यापेक्षा वाचकाच्या मनात दुःखितांबद्दल सहानुभूती उत्पन्न करण्या-

वरच गिरीश भर देतात. तेथे कवीच्या अंतःकरणातील भूतदयेचाच आपणांस अनुभव येतो. ग्रामीण जीवनाचे चित्र रेखाटताना तेथील अज्ञान, दारिद्र्य इत्यादी गोष्टी पाहता पाहता शेवटी त्यांचे मन या जीवनातील साधेपणातच रमून जाते. तेथील निसर्गसौंदर्यात ते तल्लीन होतात आणि साध्याभोळ्या खेड्तांबरोबर त्या जीवनातील समाधानाचा अनुभव घेऊ लागतात.

वत्सल गाई पुच्छ उभारुनि उधळत गेल्या पुढती
रोधित होता गोपाळाचा पांवा परि संगीतीं
थांवुनि मार्गीं मुरडुनि मागें कान जरा फिरवोनी
लकेर ऐकुनि पुढें उधळल्या क्षणांत हुंबारोनी

अशी शब्दचित्रे गिरीशांच्या जानपद काव्यात आढळतात. त्यांचे विद्यार्थी कविमित्र श्री. गोपीनाथ तळवलकर यांनी आपल्या गुरूच्या काव्याचे स्वरूप सांगितले आहे, ते असे :—

" कला, शब्दमाधुर्य, संगीत, ताल, रसिकरंजन इत्यादी अनेक गोष्टींची अवधाने ठेवून ते आपली कविता लिहितात. त्यांची कविता पाहून बांधीव चिरेबंदी तटातून झुळझुळ वाहणाऱ्या सरितेची आठवण होते. कल्पकता आणि चमत्कृती यांचाही उपयोग ते वेताने करतात.

सन्मार्गानें कष्ट करूनी
भल्याबुऱ्यांचे शाप घेउनी
अल्पपणें भूमाता सेवुनि
एक दिनीं तरि जग विसरावें, होउनियां रममाण

या चार ओळींत शांतिसुखासाठी तळमळणाऱ्या पण कर्तव्यतत्पर अशा आपल्या मनाचे चित्रण त्यांनी केले आहे. "

वर्षानुवर्षे सन्मार्गाने कष्ट करीत राहून आता गिरीश कर्तव्यपूर्तीचे समाधान आपल्या यशस्वी संसारात अनुभवीत आहेत.

# भलरी : : १

[ ‘ भलरी घालणे ’ म्हणजे पीक काढणे व ते काढताना तोंडाने उत्साह-दायक गाणे म्हणणे. चांदण्या रात्री पीक काढणे, जोंधळा हा सर्व पिकांचा राजा मानणे, किंवा भलरी घालून झाल्यावर इर्जिक – श्रमभोजन – करणे हे शेतकरीसंप्रदाय आहेत. या गाण्यात शेतकरी पुढील गाणे म्हणत, एक-मेकांस उत्साह देत, पिकाची काढणी करीत आहेत असे कल्पिले आहे. ]

( जाति : कोकिळा )

भलरि घाला चला गड्यांनो भलरिचं गा गीत
गड्यांनो भलरिचं गा गीत ॥ ध्रु० ॥

पाझरला रस ह्यो चंदेरी
डोंगर झालं समदं रुपेरी
घुमूं लागलं आनंदाचं शेतांतुन संगीत
गड्यांनो, शेतांतुन संगीत ! भलरि०

पाचोळ्यांतुन सळसळणारा
झुळझुळुनी ह्यो शीतळ वारा
स्वच्छंदानं गात चालला आपुल्याच लहिरींत !
गड्यांनो, गाया खडकाळींत ॥ भलरि०

सूर लावुनी येड्यावाणी
वोढा गाई अपुलीं गाणीं
सजण लागला जणूं लावणी गाया खडकाळींत
गड्यांनो, आपुल्याच लहिरींत ॥ भलरि०

लवुन जुन्दळा देई डोल
राजा अपुला ह्यो बिनमोल
गाऊन त्येला, घाम जरासा गाळूं या मातींत ।
गड्यांनो, गाळूं या मातींत ॥ भलरि०

कणखर दावुन म्हराटबाणा
गोळा करुं या मोतीदाणा
इर्जिक खावूं आनंदानं, बसून मंग् काळींत
गड्यांनो बसून मंग् काळींत ॥ भलरि०

९ जुलै १९२३, पुणे ]

## शान्तिस्थान : : २

[ संसारतापाने तापलेल्याला विश्रांतिस्थान हे पाहिजेच असते. त्यातल्या-त्यात निसर्गाची शान्त व सुंदर एकान्तस्थळे मन लवकर निववितात. माझ्या गावच्या अशाच एका स्थळाला उद्देशून ही कविता लिहिलेली आहे.]

( जाति : कोकिळा )

एकच शान्तिस्थान मला तूं ! एकच शान्तिस्थान
रानें भंवतालीं हिरवळलीं
शेतें गंधानें दरवळलीं
जळें ओहळांतुनि खळखळलीं
विंझणवारे वंशतरूंतुन गाती मंजुळ गान. १

खडक बाजुला विशाल सुंदर
खालीं ओबडधोबड फत्तर
कपारींत हीं झुडपें वरवर
शुभ्र, लाल या तटीं कण्हेरी डुलती लववुनि मान. २

गवतुन गेल्या काळ्या डगरी
एक झोपडी ही उंचावरि
पलीकडे त्या माझी नगरी
फुले फुलोरा, मीच फुलारी हा माझा अभिमान ! ३

उत्तरेस डोंगर चंद्रागिरि
समोर पूर्वेला अंभेरी
दक्षिण बाजू विस्तृत भारी
पश्चिमझाडीमधून दिसती शुभ्र घुमट हे छान. ४

पलीकडे, कृष्णा खोऱ्यांतुन
अजिंक्यताऱ्याच्या शेजारुन
मुरडत जाते, वळसा घेउन
अंतर्लोचन इथून बघती प्रदेश पुढले सान. ५

नील क्षितिजीं अंधुक टोकें
किरणानें चमकतीं हीरकें
सह्याद्रीचीं म्हणती नाकें
मूर्तिमंत मज इतिहासाचें दिसतें पुढतीं पान ! ६

उंच जरंडा वायव्येला
धर्माच्या फडकवी ध्वजेला
जवळुन खालुन रस्ता गेला
प्रियमित्राच्या गांवा वळणें घेउन रानोरान. ७

दृष्टी सौंदर्यानें भरते
जीवनकलहाशा मग मरते
दिव्यांतुन अंतर गिरगिरतें
एकान्तीं या जरा बैसतां नुरे जिवाचें भान. ८

संसारांतिल भेसुर चिंता
जाळिति अंतर जातां येतां
इथेंच पावे मज तन्मयता
स्वर्ग आमुच्या तूं नगरीचा, केवळ तूं मत्प्राण ! ९

सन्मार्गानें कष्ट करूनी
भल्याबुऱ्यांचे शाप घेउनी
अल्पपणें भूमाता सेवुनि
एक दिनीं तरि जग विसरावें होउनिया रममाण. १०

आजवरी जीं लिहिलीं गाणीं
यावें येथें तींच घेउनी
ओहळासवे सूर धरूनी
श्रोता-गायक मींच होउनी एकच ध्यावें ध्यान. ११

किंवा माझ्या प्रिय सुहृदाला
किंवा माझ्या प्रिय ताईला
किंवा माझ्या जीवसखीला
घेउनि गोष्टी इथें कराव्या, करुनि सुखामृतपान ! १२

२५ ऑक्टोबर, १९२३, रहिमतपूर ]

## सारंगीवाला : : ३

[ एक सारंगीवाला याचक रात्रीं निजानीज झाल्यावर अंधारातून एकटाच सारंगी वाजवीत चालला असता शांत हवेतून येणारे त्याच्या सारंगीचे भावमधुर सूर ऐकून काय वाटले, हे ह्या कवितेत चित्रित केले आहे. ]

( जाति : मनमोहन )

मनमोहन वाजवुनी सारंगी, काढी मंजुळ सूर ध्रु०
विश्व निजलें, शांत झालें
एक धरणी मात्र डोले
गम्भीरपणानें अंधारांतुन छेडित जाई सूर. १

कम्प वाऱ्यांतून कानीं
तरल येती गोड गानीं
समरसती हृदयीं भाव, लागते गोड मना हुरहूर. २

नाचती हे वरति तारे
गात डुलती मंद वारे
बघ तालावरती नाचूं लागे हृदय, वाहुनी पूर. ३

अंगुलीची रागदारी
आंत उठते गुंजणारी
मग एकतान होऊन ऐकितें आंतुन कुणि आतूर. ४

जीव डोले दिव्यतेनें
रोमरंध्रीं भरुनि गाणें
मन तन्मय होउनि मधुर माधुरी सेवित झालें चूर. ५

रस कळा या एकवटुनी
बोलती कीं झङ्कृतींनीं
सौंदर्य नाचतें थय्थय्, वाजति शब्दांचे नूपुर. ६

काय कसलें गान गावें !
शान्त चित्तें व्याकुळावें !
तळमळुनी त्यांतच शोधित जावें पुढतीं दूर. ७

म्हणुनि वरुनी येथ येसी
सूर गन्धर्वींच घेसी
शांतवी लकेरी तप्त जिवा, तरि छेड छेड ते सूर. ८

१३ जानेवारी, १९२४, पुणे ]

## कृतज्ञता : : ४

(जाति : दिंडी)

पोर खाटेवर मृत्युच्याच दारां
कुणा गरिबाचा तळमळे बिचारा
दूर आई राहिली कोंकणांत
सेविकेचा आधार एक हात ! १

ताप त्यानें भरतांच तडफडावें
पांखरानें एकलें फडफडावें
हळू गोंजारी सेविका दयाळू
डाक्तराचे वच शांतवी कृपाळू. २

कधीं त्यानें घ्यावें न मुळीं अन्न
कुठें डोळे लावून बसे खिन्न
आणि डाक्तर येतांच गोंजराया
हाय ! लागे तो घळघळा रडाया ! ३

एक दिन तो व्याकूळ फार झाला
आणि त्यानें पुसिलेंच डाक्तराला--
‘ अतां दादा मरणार काय मी हो ? ’
तोंच लागे अश्रुची धार वाहों. ४

हृदय हलुनी डोळ्यांत उभें पाणी
तरी डाक्तरची वदे करुण वाणी
दोन गोष्टी सांगून धीर देई
पुन्हा गोंजारुन शान्तवून जाई. ५

रात्र अंधारी माजली भयाण
सोसवेना जीवास अतां ताण
हळुच बोलावी बाळ डाक्तराला
तोहि धर्मात्मा धावुनीच आला. ६

अतां बाळाला टोंचणार तोंच
वदे वांकुनि पांखरूं दीन चोंच—
' नको आतां....उपकार फार झाले !
तुम्हीं....मजला ....किति....गोड....वागवीलें ! ७

भीत....दादा....मरणास मुळीं....ना....हीं !
तुम्ही....आ........ई ' बोलला पुढें नाहीं
झणीं डोळे फिरवले बालकानें
आणि पुशिलीं लोचनें डाक्तरानें ! ८

२५ सप्टेंबर, १९२५, पुणे ]

## स्मृतिस्थळ ! : : ५

[ पूर्ववयात आपण एखाद्या स्थळी आयुष्याचे किल्ले उभारावेत व दुर्दैवाच्या एकाच फटकाऱ्याने ते पार ढासळून जाऊन आपणांस इतरत्र कुठे तरी आयुष्य कंठण्याचा प्रसंग यावा आणि कालांतराने पुन्हा त्याच स्थलास भेट देण्याचा आपणांस योग यावा; अशा मनःस्थितीत आपणास काय वाटते, ही या कवितेची भूमिका आहे. ]

( जाति : भूपतिवैभव )

येथेंच गाइलीं असतीं आपण गाणीं
ऊर्जस्वल भरुनी स्फूर्ती रानोरानीं ध्रु०

लाभली जिवाला येथें प्रेमळ जोड
लागले निघाया संवादी स्वर गोड
तरळली पुढें मधुसृष्टी, लावुन ओढ
परि कशी निमाली मोहनसुंदर वाणी ! १

म्हटलें कीं आपण फुलवूं येथिल गवतें
जोमांत भरूं सौंदर्य नवें लवथवतें
लागेल चराचर नाचायाला भंवतें
कां एकाएकीं शिशिर विकलता आणी ! २

म्हटलेंस मला चंडोला मार भरारी
फेंकून लकेरी जीवा मोहविणारी
घेतांच तान वर्षलीं स्मितें सोनेरी
घायाळ कुणीं कां तोंच करावें बाणीं ! ३

ओसाडित तेव्हां स्फुरले मंजुळ सूर
सौंदर्यहि इथलें आज गमे भेसूर
अज्ञानपणींही लाभे मधु हुर्हूर
कीर्तीनें होई हृदयीं आज निशाणी ! ४

हा फुलली सृष्टी परि वाटेच उदास
ही शीतळ वायू वाढवि उष्ण श्वास
वाढविती पोटीं आग पूर्विंचे भास
का जन्मभरी ही गाणें एक कहाणी ! ५

७ नोव्हेंबर, १९३१, बुधगाव-फलटण ]

## सुंदर हिरवें माळ ! : : ६

[ **भूमिका** : सपाट प्रदेशावरील उन्हाळ्यात धूसर दिसणाऱ्या माळांचे खरे सौंदर्य वर्षाकालाच्या सरींनी बहराला येते; त्यातच डोंगर पाहण्यासाठी आसावलेल्या मनाला दूर नुसता विस्तारच दिसतो, त्या वेळी काय वाटतं ? ]

( जाति : कोकिळा )

सुंदर हिरवें माळ ! चहुंकडे सुंदर हिरवें माळ ! ध्रु०
जमली काळी वर घनमाला,
झिम् झिम् पाउस खालीं आला,
ग्रीष्मर्तूचा ताप निवाला,
कोंभ येउनी दूर दूरवर पालवलें खडकाळ ! १

बोरवनाचीं सुकलीं पानें,
तरतरलीं या नवजलपानें;
विरळ बाभळी चैतन्यानें,
स्वानंदानें डुलूं लागल्या सकाळसायंकाळ. २

सुकलीं गवतें गोट्यांखालुन,—
हिरवळुनी बघती डोकावुन,
रसरसलेल्या तेजें न्हाउन—
मराठमोळा तरुण कुमारी लाजति कीं लडिवाळ ? ३

समोर इकडे तिकडे भंवतीं—
हलूं लागली हिरवी नवती,
ओलसरीनें पानें दंवतीं,
माळावरल्या वनराणीला नजराणाच सुढाळ. ४

सुकल्या ओळ्यांतुन ही खळखळ—
मुरमाडांतुन करी धावपळ;
गीतमोहिनी घालुन मंजुळ
हळुच नर्तनीं वाजवि अपुले पायांमधले चाळ ! ५

जोगवलेलीं गुरें कुणाचीं—
दूरावरुनी जात सांजचीं—
अडवित तेजें मावळतीचीं ?
काळ्या छाया सरती एकामागुन एक विशाळ— ६

क्षितिजीं निळसर वाफाऱ्यांचे—
तरंगती ढग नव रंगाचे;
शिखर न कोठें सह्याद्रीचें;
मात्र एकला जवळ उभा हा ऐटींत राजमहाल ! ७

निवलीं रानें, गुरें-वासरें;
निवलीं झाडें रानपांखरें;
धनी अंतरीं निवले सारे;
शेतकऱ्यांच्या पोटामधला निवेल कधिं पण जाळ ? ८

२६ जुलै १९३३, फलटण ]

## आईचा आशीर्वाद : : ७

[ **भूमिका** : वयाच्या चौथ्या वर्षी आई वारलेल्या नि तेव्हापासून आज बारा–तेरा वर्षेपर्यंत घरातील वडीलधाऱ्यांनी उत्तम संगोपन करून प्रेमाने वाढविलेल्या एका कन्येचे आज लग्न आहे. लग्नमंडपात आशीर्वाद देण्यासाठी अनेक आप्तेष्ट आले आहेत. तिचे वडीलही आपला आशीर्वाद देतात. पण, आपली मुलगी सुस्थळी पडून तिच्या जन्माचे कल्याण व्हावे म्हणून कन्येच्या भोवती भोवती आजवर वावरणारा आईचा आत्मा त्याच वेळी मंडपात आला आहे, नि तो तिला आशीर्वाद देत आहे. ]

( छंद : ओवी )

" शुभ मंगल ! मंगल ! सावधान ! सावधान !
बोलतें मी आई जाण.

झाला वियोग तपाचा, बाळ, भरावलें किती,
तुझ्या लीला आठवती.

होतीं कौतुक करीत किती तुझं सारींजणं,
शान्तवलं माझं मन.

पण आईचा हा जीव किती झालं तरी, बाई !
आशीर्वाद आज देई. १

नाहीं पुरतं मीं न्हाऊं माखूं घातलं तुजला,
मांडी दिली निजायला !

पाठीवरूनी ग बाळ नाहीं हात फिरविला,
घांस नाहीं भरवीला !

नाहीं अक्षर लिहून दिलं कधीं पाटीवर,
गाणं कुठलं ग तर !
नाहीं लाडकीला माझ्या कधीं अशी वाढविली,
भाग्य नव्हतं कपाळीं ! २

पण रागावूं तूं नको, बाळ, आजवरी कांहीं—
उणं पडलं ग नाहीं.
तुझे काका, तुझी आजी, तुझी माई, तुझे तात—
तुला पोटींशिं घेतात.
काय करील यापरीस, ग, आई आणिक तें
बाळ माझी माणीक तें !
जाणार तूं पण, बाई, आज तुझ्या खऱ्या घरीं,
बोलायास आलें तरी. ३

पण बोलवेना ! काय सांगूं तुला दोन गोष्टी ?
मायेपोटीं येती ओठीं !
जा जा हंसऱ्या मुखानं, मागं वळून पहात,
बाळ, आपुल्या घरांत.
माझ्या मायवडिलांचे, सासूबाई-मामंजींचे—
आणि तुझ्या वडिलांचे—
थोर पाठीशीं ठेवितें, बाळ, तुझ्या मी संस्कार,
रडूं नको, धीर धर. ४

चाल माझ्या तूं चालीनं बोल तातांच्या बोलानं,
आणि पतीच्या तोलानं.
झेल आजोळींची अंतरंगी, बाई भावगंगा,
तेज येईल ग अंगा.
आण गोडवा तूं संसाराला तुझ्या गोडव्यानं
गोड होवो तुझं जिणं.
उजळाया कुळं सारीं तुला लाभेल पुण्याई,
पतिघरची, ग बाई ! ५

कृष्णाबाई माझी आज मिळे गडे सागराला,
कमल वा वसंताला !
विकासतां कमल हें गंध दूर दर्वळेल,
नांवलौकीक होईल.
माझा अन्तरात्मा जाईल ग, भरूनिया त्यानं,
जीवा त्यानं समाधान !
ऊठ, घेई त्यांचा हात, भिऊं नको मुळीं, बाई !
पाठीशीं मी आहें आई !
शुभ मंगल ! मंगल ! सावधान ! सावधान !
बोलतें मी आई जाण. ” ६

१८ मे १९३८, पुणे ]

## मानसमेघ : : ८

[ **भूमिका** : नैनिताल येथील ' चायना पीक ' टोकावरून दूरवर दृष्टी फेकली असता मानस, नंदादेवी आदिकरून उंच शिखरे दिसतात. त्यांच्यावरून ढग जाऊ लागले की, सूर्यकिरणांनी त्यांची शोभा वाढते. समोर ही शुभ्रसुंदर शोभा पाहताना व आपण मायभूमीच्या एका टोकाला आलेले आहो ही जाणीव होत असताना काय वाटते याचेच भावचित्र खालील कवितेत आहे. ]

( वृत्त : सुमंदारमाला )

तुझी शुभ उत्तुंग शैलाग्रमाला
नभीं शोभते ही हिमानें किती !
किती दूर विस्तार हा पांगलेला
निळापांढरा सिंधु वा भोंवतीं !
अनंतावधी उंच लाटा नगांच्या
उधाणून कीं नाचती भूवरी ?
जलक्रीडना पातलेली गजांची
नवी झुंड वा पोहते अन्तरीं ? १

किती देवदारू उभारून शीर्षें
तुझीं वैभवें पाहतीं तिष्ठुनी !
उड्या झोत घेती तुला भेटण्याला
प्रपातींच जाती परी गोठुनी !
निवाऱ्यास बैसून शोभा तुझी ही
डहाळ्यांतुनी पाहतीं पांखरें !
नभांतून येऊन ही रश्मिमाला
कशी नाचते सप्तरंगीं त्वरें ! २

चकाकून बर्फाळलीं उंच टोंकें
किती दाविती व्योमरंगावली !
तुझें टोंक वेटाळुनी मेघमाला
महासिंधुफेसापरी चालली
किती शोभती हे नभःकार्मुकाचे
महामानसा ! रंग तूझ्यावरी !
तुझा ' आन्तरः कोऽपि हेतुः ' स्वभावें
उमाळून येई असा वा वरी ? ३

असे वोपिला यक्षसंदेश, त्याचे
मनोराग हे कोवळे सांडले ?
प्रभावी उमेच्या तपाचें असें वा
गिरीशापुढें तेज वोसंडलें ?
अडे दृष्टिची फेक वा उर्वशीची
पुरूदर्शनीं वेधुनी राहिली ?
तपस्वी तरंगून वा हंसचित्तें
अशीं मोक्षमार्गास कीं लागलीं ? ४

मनोहारिणी मेघमाला निघाल्या
कुठें उंच संचारुनी रंगुनी ?
तपस्वी शुका ! चाळवाया तुला कीं
सुवर्णांग आल्या कुणी कंचनी ?
तुझें बोधिसत्वा ! हरायास आल्या
कुणी सत्व वा राजदेवांगना;
पराभूत होऊन वेगें निघाल्या
घरा आपुल्या लाजुनी मोहना ? ५

“ स्वतंत्र ध्वजा नाचुनी अंतराळीं
स्वराष्ट्रास देती नवीं वैभवें !—”
वरी मान उंचावतांना तुला कीं
दिसे दृश्य हें भोंवताळीं नवें ?
तुझ्या अंतरीं आग पेटून, वाढे
तुझें आंतल्या आंत अंगारणें ?
ज्वलद्‌भाव अन् हे उफाळून येती
वरी मेघरूपें, कराया रणें ? ६

हिमानें तुझी कोंदली आंत वाणी
वदायास येई न कांहीं, कुठें,
स्फुरद्‌वैखरी मूकभाषी, म्हणूनी
तुझ्या आज कंठांतुनी ही फुटे ?
कधीं तापुनी गर्जती गूज सारें
तुझे बोलके, सांग, चिंतामणी ?
नव्या हिंदवी वैभवाची श्रवूं दे
तुझी, मानदंडा ! मला अश्रणी ! ७

१० नोव्हेंबर १९३९, नैनिताल ]

# दौल्याची दिवाळी : : ९

[ **भूमिका** : दुष्काळात भीती वाटणाऱ्या दौल्याने आपली दिवाळी सुखात साजरी करण्यासारखे काय घडले ? ]

( जाति : दयिता )

कोण उभा हा शाळुमधें, वरती लावुन दृष्टी,
गुडघाभर जग भंवतींचें, पाहुन होई कष्टी !
मुंडासें–मळक्या चिंध्या झिलमिळ डोईवरती,
दावि फाटकी पैरण ही पोटभकाळी पुरती !
किती ठिगळलें धोतर हें गांठुन ठायीं ठायीं,
खालुन काळीचे चटके हाय ! न कांहीं पायीं !
येई अरेरे ! कष्टदशा सकस हाडपेरांना !
काळवंडलें तोंड किती मळूल पाहुनि राना !
डोक्यावर तावुनि गेलें भर बाराचें ऊन !
रानीं तरि खपुनी दौल्या तण काढी खुरपून
झुंझुरकाची खाऊनी भाकर आणिक मिरची;
आग शमवि तो पोटाची न्याहरी गरिबीची !
भांगलतांना आणि पुन्हा आग पेटली पोटीं,
खरडुनि हेळामधिं नरटी, लावी दौल्या ओठीं.
आग भडकली आकाशीं जाळ लोटले खालीं,
' करपे शाळू ' बघुनि भरे हृदयी डोंबकहाली !
" कुटला दसरा अन् कुटली आतां घरीं दिवाळी !
राजापरदान्याला अन् आग अमां ही जाळी !
कारबारिनीला कुटलीं काम्बुरनं मी घ्येवूं ?
पोराबाळांना उगडं वरिसभरी का पाहूं

सावकार अन् त्यें सरकार    कुठली त्येना माया !
लिलावास काढितील त्ये    भांडीं, मडकीं, गाया ! ”
पाणी पाणी जीवाचें    तों भीतीनें झालें,
अंगांगांतुन घामाचे    लोट निथळुनी आले
थांबुन दौल्या आणि जरा    पुन्हा शिवार न्याहाळी
भविष्य दिसलें कीं त्याला ?    पुन्हा आंसवें गाळी ! !
तों धूसरुनी आकाशीं    जमले काळे मेघ,
गार हवेंतुन मातीचा    येई गंध सवेग.
तिरिप नभींची काजळली,    ढगाळलेली छाया;
धो धो हस्ताची वरसे    खालीं ओली माया;
लागे दौल्या नाचाया    आनंदानें भिजुनी,
लक्ताऱ्यांतुनि ओघळल्या    वरल्या धारा अजुनी,
कार्भारिण तों शेवन्ती    घेउन येइ शिदोरी
नाचत दौलतरावांची    झट्कन् धावे स्वारी.
घेऊन तिज मग सांगातीं    जरा ओढुनी जवळी,
घास मुखीं देऊन वदे    “ आतां, गडणि, दिवाळी !”

२ ऑक्टोबर १९४०, विश्रामबाग, सांगली ]

## माळावरील शिरीष ! : : १०

(मुक्तछंद)

निखारे फुलले !
कडकूं लागली फाल्गुनी आग !
खरखलीं तापून रानें,
वाफा उफाळल्या शेतांमधुनी
कढूं लागला मध्यान्हवारा तावतावूनी;
डबक्यांत पाणी चटचटलें !
खालींवर सारा डोंब जाहला,
पांखरें लपलीं कुठें झुडुपीं !
भयाण शून्यता !
आणि एकला उभा तूं त्यांत !
निष्पर्ण जीवन ! १

भोंवतालची अंतराळी,
आग पिऊनी कंठासी जीवन !
फांद्यांचे होऊन गेले खराटे,
अस्थिचर्मांचे सांपळे जणूं उरलेत हे;
वाळल्या शेंगा पिवळसर
मात्र लटकुनी भेसुर आवाजें खुळखुळती !
उध्वस्त ध्येयांचीं पिशाचेंच कीं ? २

जीवन मिळतें कोठून तुला ?
हिरवीं दाट सुंदर पानें,

हिरव्या पांढऱ्या मृदुल फुगीर परागांचीं तव मोहक फुलें,
सुगंध जयांचा घेई ओढुनी अंतर्भावना,
सौंदर्य ज्यांचें उपकारक,
वर्षाहेमंतांनीं वाढविलेला तेजस्वीपणा किती अभिजात !
नवीन वाऱ्यानें दिलेले सूर वितळवूनी—
सुगंधांतून दिला जयांनीं वृद्धयुवकां,
युवकांनीं जी हृदयावरी ठेविली भूषा,
आणि प्रमदांनीं शिरोधार्य तीं मस्तकीं धरिलीं,
शिशिरानें तीं धुळींत गाडलीं ! !
किंवा जाहला हृदयपालट फुलांनीं तुझ्या,
अन्यायें अथवा फिरलीं मस्तकें,
त्यांनीं पेटविलें जग म्हणुनी—
त्यांचीं लटकलीं मृत शरीरें फांदीफांदीवर ? ३
कुणासाठीं हें चाललें तपन ?
उराशीं कां तूं धरीलीं हीं शवें ?
भोंवतालींचे अन्याय, जुलूम, उपासमारी,
वाममार्गानीं संपदेची वा लूट होऊन,
धरणी पडली असहाय ही,
आणि पाहून हृदय तुझें तळमळलें,—
भाजून निघालें तडफडून,
उपाय हरले म्हणून विरक्त तुवां हा
संन्यास घेतला ? ४

प्रतिकाराची प्रेरणा फसली,
म्हणुन पुन्हा चालविली ही ध्यानधारणा,
त्यागिलीं पानें, त्यागिलीं फुलें, त्यागिलें जीवन ?

मात्र उराशीं हुतात्म्यांचीं हीं धरूनी शवें
भगीरथापरी गंगा आणाया,
नव्या तेजाची नवी संचणी चालविली का
जुन्यांतून ही ? ५

खुळखुळूनी चमकुनी तों हंसलीं शवें !
तापलेली येतां झळ नवीन;
विवळून एका फांदीमधून सूर निघाला—
" जीवन घेतो शोषून आंतून,
आणि कुंडलिनी जगविते मला अमृत देऊन, "
अमृत तेंच दिधलें बीजांना,
अमृत तेंच आंत सांठलें,
जातील शवें हीं गळून दूर माती होऊनी,
अमुतजीवनें कोंभ येतील नवीन परी,
कोंवळीं पानें चमकतील,
आणि त्यांवर मोहरेल गोड नवा फुलोरा,
बहरेल त्याच जीवनीं अंग,
हिरव्या, पांढऱ्या, मृदुल फुगीर परागाचीं मग मोहक फुलें
शांतिजीवनार्थ शांत आहुती द्याया सुगंधी दाहक होतील
हेंच जीवन ! हेंच जीवन !! हेंच जीवन !!! ६

नोव्हेंबर, १९४५ ]

# माधव त्र्यंबक पटवर्धन

'मराठी असे आमुची मायबोली' ही महाराष्ट्रात राष्ट्रगीताच्या खालोखाल लोकप्रिय झालेली कविता आहे. ही कविता लिहिणारे कवी 'माधव जूलियन' या टोपणनावाने कविता लिहीत असत. त्या कवितेत सांगितल्याप्रमाणे हे मराठीचे अतिशय निष्ठावंत सेवक होते. १९२० सालानंतर म्हणजे गोविंदाग्रज, टिळक व बालकवी यांच्या मृत्यूनंतर जे कवी उदयास आले, त्यांत तांबे आणि माधव जूलियन ही नावे आज अग्रभागी आहेत. माधवरावांचा एक विशेष म्हणजे काव्याप्रमाणे भाषेच्या काव्येतर क्षेत्रांतही त्यांनी भरीव कामगिरी केली, आणि कवी आणि पंडित असा दुहेरी लौकिक संपादन केला. आणि हे अवघ्या ४५ वर्षांच्या कालावधीत! काव्यलेखनास आरंभ केल्यापासून अव्याहत अखेरपर्यंत एकापेक्षा एक सरस काव्ये लिहिणारे माधवरावांसारखे प्रतिभावंत कवी फारच विरळा होत.

या पंडितकवींचा जन्म २१ जानेवारी १८९४ रोजी बडोदे येथे झाला. बालपणचा काही काळ त्याच प्रांतात गेला आणि नंतर पुणे जिल्ह्यात मुळशी पेट्यात आवळस येथे त्यांचे मराठीचे प्राथमिक शिक्षण झाले. आवळस हे माधवरावांचे मूळ गाव. १९०३ मध्ये पुन्हा बडोदे येथे त्यांचे वास्तव्य सुरू झाले. १९१६ साली बी. ए. होईपर्यंत ते बडोद्यासच होते. पदवीपरीक्षेसाठी त्यांनी फारशी आणि इंग्रजी हे विषय घेतले. १९१६ नंतर दोन वर्षे मुंबईस राहून एल्फिन्स्टन् कॉलेजातून १९१८ साली ते एम्. ए. झाले. आणि त्याच वर्षी डेक्कन एज्युकेशन सोसायटीच्या फर्ग्युसन कॉलेजात ते प्राध्यापक झाले. जवळजवळ ७ वर्षे ते फर्ग्युसन कॉलेजात प्राध्यापक होते. यशस्वी प्राध्यापक म्हणून येथे त्यांचा लौकिक झाला. परंतु १९२५ साली काही खाजगी कारणासाठी त्यांना प्राध्यापकाच्या जागेचा आणि सोसायटीच्या सभासदत्वाचा राजीनामा द्यावा लागला! त्यानंतर जवळजवळ तीन वर्षे ते अमळनेर आणि पुणे येथे हायस्कूलमध्ये शिक्षक होते. १९२८ मध्ये राजाराम कॉलेज, कोल्हापूर, येथे फार्सीचे प्राध्यापक म्हणून त्यांची नेमणूक झाली. त्या जागी असतानाच ते २९ नोव्हेंबर १९३९ रोजी पुणे येथे निधन पावले. वैयक्तिक जीवनात त्यांना व्यावहारिक जगामध्ये अनेक प्रकारच्या संकटांशी झगडावे लागले.

" तथापि त्यांची सौंदर्यदृष्टी आणि आशावाद हे कसे व किती अचल राहिले ! माधवरावांच्या मानसिक भुकेला लागणारे अन्नही तितक्याच उच्च दर्जाचे होते. अथपासून इतिपर्यंत त्यांची मानसिक भूक कधीही शमली नाही. " — गिरीश.

ही ' भूक ' शमवीत असता त्यांचे मानसिक ' बल ' वाढत होते आणि त्या बलाचे वैभव लौकिक जीवनात त्यांच्या काव्यरूपाने प्रकट होत होते. त्यांच्या काव्यात प्रकट होऊ लागलेले त्यांचे प्रतिभासामर्थ्य पाहून वैयक्तिक जीवनात त्यांची ' पारध ' करणारे त्यांचे अकारण वैरी मुकाट्याने बाजूस झाले, आणि रसिकांकडून माधवरावांचे एकसारखे स्वागतच होत गेले. १९३३ साली महाराष्ट्र कविसंमेलनाचे ( नाशिक ) अध्यक्ष, १९३४ साली महाराष्ट्र साहित्यसंमेलनाच्या बडोदे येथील अधिवेशनात काव्यविभागाचे अध्यक्ष, १९३५ मध्ये बडोदे दरबारकडून सत्कार, आणि १९३६ साली जळगाव महाराष्ट्र साहित्य-संमेलनाचे अध्यक्ष अशी मान्यता त्यांस मिळत गेली. १९३९ मध्ये मुंबई विश्वविद्यालयाची सर्वांत श्रेष्ठ पदवी डी. लिट्. ही त्यांनी मिळविली आणि फलटण दरबारकडून त्यांचा सत्कार झाला.

जनतेकडून झालेल्या सन्मानाने माधवरावांना आणखी कार्य करण्याची स्फूर्ती येई, आणि मातृभाषेच्या सेवेची नवी नवी कार्यक्षेत्रे ते आक्रमीत. वयाबरोबर वाढतच गेलेला त्यांचा कार्याचा उत्साह सर्वांना थक्क करीत होता आणि त्या अप्रतिहत उत्साहापुढे आपल्या प्रकृतीची ते जी हेळसांड करीत, आवश्यक तेवढ्याही स्वास्थ्याविषयी ते जी बेफिकीरी दाखवीत ती पाहून त्यांच्या आप्तेष्टांस नेहमी काळजी वाटे. पण त्यांना कोणी थांबवू शकले नाही ! आणि शेवटी त्यांना कालानेच थांबविले ( २९ नोव्हें. १९३९ ). तेव्हा

गेला तिमिरामधें अचानक

ही त्यांचीच ओळ कित्येकांना आठवली. त्यांच्या आकस्मिक निधनाने त्यांच्या काव्याचा रसास्वाद घेण्यात मग्न असलेल्या रसिकांना एकदम धक्का बसल्यासारखे झाले. त्या प्रसंगी त्यांच्याविषयी अनेक विद्वान समीक्षकांनी

त्यांच्या जीवितकार्याविषयीच्या आपल्या भावना प्रगट केल्या. सर्वांनी एकमुखाने निर्णय दिला—

" पटवर्धनांसारखा बुद्धीने तीव्र, भावनांनी सखोल, विद्वत्तेने प्रौढ, रसिकतेने विदग्ध, दृष्टीने आशावादी व वृत्तीने लढाऊ असा कवी दिवंगत झाल्याने महाराष्ट्रशारदेची फार हानी झाली आहे. "—प्रा. रा. श्री. जोग

त्यांच्या मृत्यूने, झालेल्या हानीने मन विषण्ण होत असताही त्यांनी मराठी भाषेची जी बहुमोल सेवा केली आणि रसिकांसाठी विविध भावनांचा आस्वाद देणारा जो काव्यसंभार ठेविला त्याबद्दल कृतज्ञतेने अंतःकरण भरून येते.

त्यांच्या वाङ्मयसेवेचे समालोचन करताना, अनेकांनी अनेक प्रकारे तिचे मोल दाखविले आहे. परंतु त्याबरोबरच ' व्यक्ती ' या नात्यानेही त्यांच्याविषयी अनेक चिकित्सक मित्रांनी जे लिहिले त्यावरून असे कळते की, माधवराव ही व्यक्ती, त्यांच्या वाङ्मयापेक्षाही श्रेष्ठ होती.

त्यांच्या वैयक्तिक जीवनाचे अतिशय हृदयस्पर्शी चित्र त्यांच्या पत्नी श्री. लीलाबाई पटवर्धन यांनी ' आमची अकरा वर्षे ' या स्मृतिग्रंथात रेखाटले आहे. त्यांच्या जीवनाची व काव्याची विविध दर्शने अनेक रसिक टीकाकारांनी वेळोवेळी व्यक्त केली आहेत. त्यांत ' सह्याद्रि ' (जाने. १९४०), ' लोकशिक्षण ' ( फेब्रु.–मार्च १९४० ), ' ज्योत्स्ना ' (मे १९४० ) हे खास अंक प्रत्येक अभ्यासकास वाचनीय वाटतील असे आहेत.

' कवी ' या दृष्टीने त्यांचा परिचय मराठी वाचकांस १९२२ सालापासून होऊ लागला. फार्सी भाषेचा त्यांनी रसिकपणे अभ्यास केला होता. तिच्यामधील वातावरणाचा पुष्कळच परिणाम मनावर झालेला असताना त्यांनी काव्यप्रांतात प्रवेश केला. परंतु त्यांनी फार्सी कवितांचा अनुवाद करण्यातच आपली लेखणी झिजवली नाही. त्यांच्या काव्यसंग्रहात मराठी कविताच विपुल आहेत. कारण फार्सी ही त्यांची परीक्षाविषयाची भाषा होती, तरी मराठी ही त्यांची मायबोली होती. फार्सी भाषेवर त्यांचे प्रभुत्व होते, परंतु आपल्या मायबोलीविषयी त्यांच्या अंतःकरणात अथांग भक्ती होती. त्या भक्तीने त्यांनी मायबोलीची फार उच्च दर्जाची सेवा केली.

१९२० साली पुण्यास नवोदित कवींनी श्रीमहाराष्ट्र-शारदा-मंदिर नावाची संस्था काढली होती. त्या संस्थेतून रविकिरणमंडळ नावाचे कवि-मित्रांचे कविमंडळ निघाले. माधवराव आरंभापासून त्या मंडळात होते. मंडळातील कवींचे ' किरण ' हे पहिले पुस्तक प्रसिद्ध झाले. त्या पुस्तकातील कवितांचे स्वरूप, विषय आणि भावना ही जुन्या मंडळास एकदम निराळी वाटल्यामुळे त्यावर टीकेची झोड उठली ! परंतु टीकाकारांच्या हल्ल्यामुळेच या नवकवींच्या काव्याकडे लोकांचे लक्ष वेधले. नवोदित कवी टीकेमुळे नाउमेद झाले नाहीत. त्यांनी आपले नव्या पद्धतीच्या काव्याचे कार्य अव्याहत चालू ठेविले आणि रसिकांची मने त्या काव्याचे लौकरच स्वागत करू लागली. टीकेचा मारा सहन करून नव्या काव्याला रसिकांची मान्यता मिळविण्यात माधवरावांनी आघाडीच्या वीरासारखे कार्य केले ! टीकेचा सर्वांत जबर हल्ला त्यांच्यावर झाला आणि शेवटी त्या कविमंडळात सर्वश्रेष्ठ मान्यता त्यांनीच मिळविली. माधवरावांनी पहिला ग्रंथ रचला तो ' फार्सी-मराठी कोश ' हा होय. तो वयाच्या ३१ व्या वर्षी १९२५ साली प्रसिद्ध झाला. त्यांची स्फुट कविता इतर कविमित्रांबरोबर कवितासंग्रहातून १९२३ सालापासून प्रसिद्ध होऊ लागली. त्यांचा स्वतंत्र प्रसिद्ध झालेला पहिला काव्यग्रंथ ' विरहतरंग ' हा १९२६ साली प्रसिद्ध झाला. तेव्हापासून १९३९ सालपर्यंत त्यांची कविता एकूण १० ग्रंथांत प्रसिद्ध झाली. काव्यलेखनाबरोबर छंदःशास्त्राचाही ते अभ्यास करीत होते, आणि त्या अभ्यासाचे सर्वोत्कृष्ट फळ म्हणजे ' छंदोरचना ' हा प्रचंड ग्रंथ. त्या ग्रंथा-वरच त्यांना ' डी. लिट्. ' ही पदवी मिळाली.

मराठी भाषेतील परकीय शब्दांमुळे भाषा अशुद्ध होत आहे हे पाहून लोकांचे त्या दोषाकडे लक्ष वेधावे म्हणून त्यांनी भाषाशुद्धीची चळवळ सुरू केली. स्वतःच्या फार्सीच्या अध्ययनामुळे यांच्याही काव्यात व लेखनात ' परकी ' शब्द सहज येत असत. परंतु तो दोष आहे असे पटल्यावर त्यांनी आपल्या लेखनापासून शुद्धीकरणास सुरुवात केली आणि एकही परकी शब्द न आणता उत्तम मराठी लिहिण्यात आणि बोलण्यात त्यांनी यश संपादन केले ! एखादी गोष्ट पटल्यावर आणि ती करावयाचे ठरविल्यावर कष्टांची पर्वा न बाळगता यश मिळवावयाचे हे माधवरावांचे वैशिष्ट्य होय ! या

गुणामुळेच त्यांचे विद्याव्यासंगाचे व्रत आजन्म चालू होते. त्यांना दीर्घायुष्य लाभते तर आपल्या मायबोलीस त्यांनी ' हिरे मोतियांचे उंची अलंकार ' घालून तिच्या वैभवात अपूर्व भर घातली असती.

कवी या दृष्टीने माधवरावांची योग्यता उच्च दर्जाची आहे. तरुण पिढीच्या तारुण्यसुलभ भावना अत्यंत रसपूर्ण काव्याच्या रूपाने त्यांनी चित्रित केल्या, त्यामुळे त्यांच्या काव्यातील ओळी तरुण पिढीच्या तोंडी ऐकू येऊ लागल्या. ' प्रेम ' हा विषय काव्यप्रांतातून हद्दपार करण्याचा व ' अस्पृश्य ' ठरविण्याचा अट्टाहास जुने टीकाकार करीत होते. माधवरावांनी या अट्टाहासाविरुद्ध बंड पुकारले आणि प्रेम या भावनेचे अत्यंत आकर्षक, प्रभावी आणि उदात्त स्वरूप त्यांनी आपल्या काव्यातून प्रकट केले आणि त्या विषयास ' इभ्रत ' प्राप्त करून दिली ! त्या कार्यात ' प्रणयपंढरीचा वारकरी ' अशी टीकाकारांनी त्याची निर्भर्त्सना केली, पण त्यांच्या काव्यातील ' प्रणयपंढरी ' टीकाकारांना आरंभी वाटली त्यापेक्षा फारच निराळी ठरली.

सौंदर्याची ओढ ही केवळ शरीरोपभोगासाठी तडफडणारी वासना नसून जीवनातील एक शक्ती आहे हे त्यांनी आपल्या प्रणयगीतांत दाखविले. ते ' विरहतरंगा 'च्या प्रस्तावनेत यासंबंधी म्हणतात :

" सौंदर्यदर्शनापासून जिवाला विश्रांती आणि मनाची उन्नती झालीच पाहिजे. दुसऱ्याला उपसर्ग न पोचविता स्वतःचे जीवन सर्वांगसुंदर करण्याचा प्रत्येकाला जन्मसिद्ध हक्क आहे. म्हणून सौंदर्याचे अन्वेषण करून ते इतरांस प्रतीत करून देणे कवीचे एक कर्तव्य आहे. "

कवीचे काव्य वाचताना कवीचा हेतू त्याच्याच शब्दांत समजणे जरूर आहे. म्हणून कवीने त्यासंबंधी केलेले विवेचन आधी अभ्यासिले पाहिजे. माधवरावांनी काव्यात सौंदर्य आणि प्रेम यांसंबंधी हीच भावना व्यक्त केली आहे. परंतु त्यांच्या प्रेमकाव्याविषयी मत बनविताना त्यांचे आणखी काही महत्त्वाचे उद्गार लक्षात ठेविले पाहिजेत. वरील काव्याच्याच प्रस्तावनेत ते म्हणतात : " प्रेमवाङ्मय हे आबालवृद्धांसाठी नाही...प्रेम हे पुण्य आहे की पाप आहे हे हेतूंवरूनच ठरविले पाहिजे. प्रेम हे दौर्बल्य आहे, का क्षोभ आहे, ते इष्ट आहे का अनिष्ट आहे हे केव्हाही त्यापासून घडणाऱ्या परिणामावरून ठरणार. "

प्रेमाचा हेतू आणि परिणाम यांची जाणीव त्यांनी आपल्या प्रेमकाव्यात व्यक्त केली आहे. प्रियेच्या सहवासासाठी प्रियकराची असह्य तळमळ त्यांनी ठिकठिकाणी व्यक्त केली आहे.

स्त्रीप्रेमाविण जन्म नीरस उणा

हे त्या भावनेचे महत्त्व त्यांना मान्य आहे; परंतु जन्माचे उणेपण घालविण्यासाठी स्त्रीप्रेमाची आराधना करताना खऱ्याखोट्याची पारख करण्याची जागरूकता ठेवण्याचाही इषारा त्यांनी दिला आहे. ही जागरूकता न ठेविल्याने प्रणयपिपासूची फसगत होते, जीवनाची माती होते आणि—

' भासे चंचलताच मूर्त मजला, स्त्रीजात ही तेवढी '

असे हळहळण्याची वेळ येते. ही फसवणूक टाळण्यासाठी प्रेमाची भावना स्वयंस्फूर्त आणि स्वयंसिद्ध असावी. त्यात वासनापूर्तीचा हव्यास नसावा.

ते आपल्या एका भावगीतात म्हणतात :

प्रीतीच्या धनसंपदेत भरुनी त्यागात्मता राहिली
—स्वार्थाची कुसुमांजलि प्रिय हिला ती पाहिजे वाहिली
कर्तव्याचरणीं मनास मग हो वा शांति वा काहिली

प्रियेची प्राप्ती झाली नाही तरी त्यामुळे प्रेम दुबळे होत नाही. प्रिय व्यक्तीवर प्रेमिकांचे प्रेम स्वयंसिद्ध असते.

होता सूख तुला, मला परतुनी पावेल तें अंतरीं

अशी जातिवंत प्रेमिकाची वृत्ती असते.

असे ना मूर्ति पाषाणीं । तिला देवत्व जो आणी
न त्याला कोण वाखाणी । न वंदी तन्मनोभावा

असा भक्तीचा दर्जा नि सामर्थ्य प्रेम या भावनेत असावे. अशा एकनिष्ठ भक्तीला प्रेमपूर्तीचे फळ लाभले तरी त्या सौख्यातसुद्धा जीवनाची आकांक्षा थांबत नाही. आपल्या डोळ्यांसमोर कवीने कोणते जग रंगविले आहे पहा—

स्वातंत्र्य जिथें, शांति जिथें, प्रेम इमानी
ध्येयास पुरा वाव मिळे होय न हानी

कर्तव्य आणि प्रेम यांच्यात तेढ उत्पन्न झाली तर प्रेमविव्हल अंतःकरण एका हाताने दाबून ठेवून कर्तव्यासाठी, एखाद्या पतितेच्या रक्षणासाठी सिद्ध होणारा वासू राजे त्यांनी 'सुधारक' काव्यात निर्माण केला आहे. बोलक्या सुधारकांचे ढोंग प्रगट करून तत्त्वनिष्ठ कृतिप्रधान सुधारणेचे चित्र त्यांनी त्या काव्यात रंगविले आहे. समाजातील विविध क्षेत्रांतील ढोंगीपणावर प्रखर हल्ले करण्यासाठी त्यांनी 'नकुलालंकार' हे विडंबनकाव्य लिहिले. जीवनाच्या फक्त तारुण्यक्षेत्रातच त्यांचे मन रमले नाही. प्रेमाचे विश्वव्यापी स्वरूप जीविताच्या विविध अवस्थांमधून व्यक्त होत असते, या जाणिवेने पोरक्या पोराचा धावाही त्यांना ऐकू येत होता ('आई'). मानवतेचे पुनरुत्थान करण्यासाठी टाहो फोडणाऱ्या आणि आपला देह अक्षरशः झिजविणाऱ्या महात्म्यांच्या उपदेशातील विश्वप्रेम ओळखून 'महात्मा काय करिल एकला?' अशा तळमळीने त्या शांतिप्रधान तत्त्वज्ञानाचा त्यांनी पुरस्कार केला, आणि त्या शांततेने, अहिंसावृत्तीने, दुबळेपणाचे समर्थन होत नसते हेही त्यांनी सांगितले. जातिवंत सामर्थ्याचा कोंडमारा व्हावा असा या शांततेचा अर्थ नाही. ते सामर्थ्य साधनांवर अवलंबून नसते; तो मर्दाचा स्वभावच आहे.

त्यास सिंहबळ येई घेई जो शिर तळहातीं.

दैन्याचा तीव्र तिरस्कार करून त्यांनी सामर्थ्याचा आविष्कार करण्यासाठी 'महाराष्ट्रगीत' लिहिले आणि 'खऱ्या शूरा' चे लक्षण सांगितले.

येतां निर्वाणींचा क्षण ।
पाही कोण परिणाम ?
विसरावें देहभान । हाच धर्म.

हे शौर्य स्वभाषाप्रेमातही व्यक्त होते.

मराठीस अन्याय कोठेंहि झाला
स्वदेशीं विदेशीं कुणीं गांजिलें
मराठी कसा मी न संताप माझा
धडाडे जरी तीव्र दुःखानलें ?

त्यांच्या मातृभाषाभिमानाचे आवेशपूर्ण स्वरूप ‘ मराठी असे आमुची मायबोली ’ या कवितेत व्यक्त झाले आहे. ते गीत आज सर्वतोमुखी झाले आहे.

लौकिक जीवनातील तत्त्वनिष्ठा, ध्येयनिष्ठा, शौर्य यांची उदात्त चित्रे रंगविणारे माधवराव फक्त प्रणयपंढरीच्याच वाऱ्या करीत होते हे त्यांच्या टीकाकारांचे म्हणणे त्यांच्या काव्यानेच असे फोल ठरविले आहे.

आधिभौतिक जीवनाच्या कर्तव्याबरोबर माणसाला आध्यात्मिक जीवनाची तळमळ असते. जीविताचा विचार करता करता शेवटी माणसाचे मन मूळ ठिकाणी पोहोचते आणि जगत्कारणाचा – ईश्वराचा - तो शोध करू लागतो. माधवरावांच्या कविमनाने येथपर्यंत मजल मारली होती आणि

असो देव किंवा नसो, कां वरें
तयावांचुनी चित्त हो घाबरें ?

अशी तळमळ त्यांनीं अनुभविली.

जसें सांडलें मूल चोहींकडे
बघे होउनी कावरेंबावरें

तसे त्यांचे प्रौढ मन ईश्वराचा शोध करू लागले होते. त्या भाविक हुरहुरीने व्याकुळ होऊन ते लिहितात

स्फुरे प्रार्थना “ ईश्वरा, धाव रे ! ”

परंतु ईश्वराकडे धाव घेतानासुद्धा ते म्हणतात :

तुझ्या महात्म्याचा, आषाढीचा दिन
तथापि वंदीन दुरून मी

कारण,

माझ्या एकट्याचा कशाला उद्धार ?
राहिला संसार करोडांचा

त्या करोडांची क्षिती न करता स्वतःपुरता मोक्ष साधणारे भक्त साधू नसून स्वार्थीच नाहीत का ? अशा स्वार्थी वृत्तीचा आणि कर्तव्यचुकारूंचा धिक्कार करून हा भक्त देवालाही इशारा देत आहे,

रक्षितील काय दुबळे भगत ?
सोमनाथगत नाठवे का ?
भक्त आटपतां तूंच जगतांत
होशील अनाथ जगन्नाथ !

आणि ते आजच्या भगवद्भक्तांना सांगतात—

विठोबारखमाई पहा कोट्यवधी
महाराष्ट्रामधीं त्यांना भजा
क्षितिजा भिडवा कर्तृत्वाची सीमा !
पंढरीमहिमा त्यांत आला

या ‘ फटकळ अभंगात ’ त्यांनी ज्या भक्तीची आठवण करून दिली आहे ती भक्ती म्हणजे समाजसेवा हीच ईश्वरसेवा हे आजच्या युगाच्या मानवधर्माचे मुख्य सूत्र होय. या भक्तीचे सामर्थ्य त्यांनी महात्मा गांधी-सारख्या विभूतीच्या ठिकाणी ओळखले. ईश्वराची प्रचीती स्वतःच्याच ठिकाणी व्हावी लागते. ‘ देवावरी भार टाकोनिया ’ निष्क्रिय जीवन जगण्याच्या पंथाचा त्यांनी ‘ देवाची समाधि ’ या अभंगात विषेध केला आहे.

भवितव्यतेचा आपुल्याला जो तो
शिल्पकार होतो स्वकष्टानें.
नको तो प्रसाद, नको अपकार
देवावरी भार आतां नाहीं.
—लोकांच्याच यत्नें, लोकांची उन्नति
हीच कर्मगति न दुसरी.

—जेथें जातों तेथें तो माझा सांगाती
न धरीच हातीं; चाल म्हणे.
तो न पंढरीचा, तो न अंबरींचा
धनी अंतरींचा सर्वत्र तो.

या अंतरींच्या परमेश्वराचीच ते आमरण उपासना करीत होते. कवी या भूमिकेवरून त्यांनी आपली भूमिका सांगताना ते ' रसिकास ' या कवितेत म्हणतात,

ही गड्या न माझी मुळीं काव्यसंपदा
ही कृपा गूढ शक्तीची
म्हण तीस " धन्य शारदा "

महाराष्ट्रशारदेला धन्यत्व प्राप्त करून देणारे असे त्यांचे काव्य होते. त्या काव्याने त्यांची स्मृती अमर झाली आहे.

ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
०७२१० दि: ...
१०८... नों दि २०/३/०९
ग्रंथ संग्रहालय ठाणे
क्र. १८११०

# चांदण्यातील हुरहूर

( जाति : मनमोहन )

या वेड्या वेळ्या मनीं माझिया कहर करी हुरहूर ॥ ० ॥

शान्त किति या उंच जागीं
तगमगें मी परि अभागी——
कां व्यर्थ पडावें असें चांदणें सुंदर गार टिपूर ? १

अमृतानें सृष्टि न्हाली
चंद्रिकेचें क्षौम ल्याली
हा हिजवर उधळे चूर रुप्याचा की हिम की कापूर ? २

इन्दु आनंदाश्रु गाळी
श्यामलेच्या चारुभाळीं
मधु खिन्न फांकतो नव नवरीच्या आनंदाचा नूर. ३

दुग्धगंगा गुप्त गगनीं
उत्सवीं या येइ भुवनीं—
ये अधांतरीं हा सरितेवरुनी लोटत पाण्डुर पूर. ४

शैलशिखरीं शुक्र न लपे
कृत्तिकांचा पुंज हरपे
हो ब्रह्महृदय तो फिकट, होउनी जाई व्याध चुकूर. ५

अंधुके ती गर्द झाडी
जींत नगरी झोंप काढी
परि दिवे फिकट ते, खडा पहारा करणें त्यांस जरूर. ६

शुक्र टाकी नजर मागें
अस्तगिरि अन् उतरुं लागे
हिंडतों टेकडीवर रेंगाळत मीच चिंतनीं चूर. ७

सृष्टि अगदी शांत होई
जाय झोपीं वायु तोही
वेताळ मनींचा न निजे — छे, पण रात्रिचाच हा शूर ! ८

कातळाच्या वर पडावें
चांदणें हें पांघरावें
आणखी करावें काय हराया हृदयींचें काहूर ? ९

सूर तों हे कुठुनि येती ?
अंतरींचा ठाव घेती—
छेडितें कोण हें सारंगीवर वागीश्वरिचे सूर ? १०

जवळ आले, स्पष्ट झाले
दूर गेले, लुप्त झाले
जीवास लावुनी अधिकच चटका गेले — गेले दूर ! ११

हाय ! माझें ध्येय का तें
गूढ दुरुनी गीत गातें ?
निर्भरालिंगनाविण न भरे पण माझें मन दुष्पूर १२

२० जानेवारी १९२४ ]

## रसिकास : : २

(जाति : मुद्रिका)

हें साधें भोळें गीत आवडे तुला,
संकोच, भीति कां येथें ?
घे पुरवुनि तव हेतुला. १

ये आंत, बैसुनी जवळ हृदय कर खुलें,
नच उपचाराची बाधा,
सर्व हें समज आपुलें. २

ही गड्या, न माझी मुळीं काव्यसंपदा,
ही कृपा गूढ शक्तीची,
म्हण तीस, “ धन्य शारदा ! ” ३

सहकंप पावतां हृदय तुझें पारखी
मज जोड पावली सारी,
देणगी न यासारखी. ४

अनुभूति, कल्पना क्षणिक तरल वायवी,
गुंगवून तिजला नादीं
अडकवून ठेवी कवी. ५

शब्दाच्या अवगुंठनीं हंसे सुंदरी
ही तिचीच बघ पडछाया,
जी वसे तुझ्या अंतरीं. ६

म्हणुनीच ऐकशी गीत गुंग होउनी,
ठेविशी उलट करुनी तूं
मज तुझाच रसिका, ऋणी. ७

हें तन्मयतेचें मौन असें बोलतां
स्तुतिशब्द कशाला वाया
हृदयास हृदय बोलतां ? ८

माजला स्तुतीचा तरी क्षणिक गल्बला !
कीर्तिचा स्वर्ग कोणाला
रे मेल्याविण लाभला ? ९

मीं माझ्यास्तव गायनें जरी गुंफिलीं
भेटतां रसिक तुज ऐसा
स्नेहाळ तुला वाहिलीं १०

२६ सप्टेंबर १९२४ ]

## संगमोत्सुक डोह : : ३

(छंद : परिलीना)

एकत्र गुंफून जीवित–धागे
प्रीतीचें नर्तन नाचलों मागें

एकटा उभा मी तेथें
भोंवतीं शोधीं प्रियेतें;

न दिसे कोठें; का सोडून गेली ?
लोपते का कधीं प्रीति उदेली ! १

दृष्टीस पडे हें भयाण मात्र
रेताड कोरडें उथळ पात्र !

प्रिया न जरी संगतीं
तर हो कुण्ठित गति.

प्रीति या हृदयीं अथांग खोल
तुडुंब भरली, परंतु फोल. २

कोणी ये, हिणवी, " भावना मेली
हांसेना बोलेना करीना केलि ! "

खट्याळ वादळी वारा
दौडत येतां भरारा

उठती चंचल बाह्य तरंग,
अंतरीं जडता न पावे भंग. ३

जीवनज्योत न माझिया गेहीं
म्हणून हें कृष्ण वसन देहीं;

एकली कौमुदी हांसे,
दगांत खिन्नच भासे.

स्तिमित नजर लाविती तारा,
मावळे उत्साह नाचाचा सारा ४

खाऊन रवीचा प्रखर ताप,
कष्टून, लागून जीवांस धाप,

प्रदोषसमयीं येतीं
क्षणैक विसावा घेतीं,

घरास वळतीं माणसें गुरें;
अन् माझें अंतर निःशब्द झुरे. ५

अंबरीं इंद्राची दुंदुभि वाजे,
भीषण सुवर्ण—सुंदरी साजे,

मेघांत हांसत खेळे,
लवत नाचे ते वेळे

देवांचा भरून येऊन ऊर,
सहस्र नयनीं ओसंडे पूर ! ६

नाचेल मयूर अवनीतळीं,
मंडूक ते द्विज गातील जळीं,

होऊन धुंद त्या क्षणीं
धावून प्रिय साजणी

देशील ना मज कसुन खेंव ?
बांधितील वर तोरण देव ७

म्हणत मंगल जंगलगान,
कड्याहून खालीं लोटून प्राण,
होऊन काषायरंग
संगांत पूर्ण निस्संग
पावूं गे समाधिसागरीं अंत !
—अजून संपेना वैशाख हंत ! ८

११ ऑक्टोबर १९२४ ]

## सर्वा खल्वियं माया ! : : ४

( जाति : परिलीना )

नादावुनि केलें मीं भ्रमण किति अहो तें !
विश्रान्तिस्थळ अन्तीं हेंच हाय होतें ! ध्रु०

हमरस्त्याहूनि दूर चिमुकलाच गांव,
डाकघराचाहि जिथें नेणवे अभाव,
कष्टकरी दीनांचा मूठभर जमाव,—
जीवन अज्ञात तिथें वाटे मज कोतें ! १

ते तिकडे पीत माळ पसरती अफाट
हा इकडे रम्य गार हरित नदीकांठ,
ल्वणातुनि ऊंसगहूंशाळुचाहि थाट !
स्वगृहांत परि गवसें सौंदर्य न कोठें ! २

हृद्वीणा अननुभूत सहजकंप पावे,
सहकंपें अतिकांक्षा स्फुरित हो स्वभावें,
गमे रूढि भंगुनि मीं ध्येय नवें गावें
कीं सीमोल्लंघनींच पौरुष तें मोठें ! ३

होतां वश वाग्देवी निघे प्रेमबोल,
हृदय हेंच मोल जया, न हो हेम मोल,
भावसिंधुवर होती रसिक किति विलोल,
रिक्त—हस्त मी, जनता वेंची मणिमोत्यें. ४

तों मीनाबाजार न, हंसे रंग-रात,
ज्योतीवर किति पतंग झेंप टाकितात !
मीहि मग्न मुक्तमधुपभावगुंजनांत—
मोहनलहरींत आणि जीव खाय गोते ! ५

भरतवाक्य संपुनि हो शांत गानवीची
काव्यदीप विझतां हो स्मृति खऱ्या भवींची,
तों न दिसे लोचनास शुक्र वा मरीची,
रंगसौध कोसळुनी उरे भग्न जोतें ! ६

दैव करी गुप्त पाठलाग, जीव धावे
सावज हें मी धरीन, तो म्हणे प्रभावें,
टाकित धापाच पुन्हा प्रथम पदीं पावे,
अंत्य क्षणिं वेडावी स्वप्न गत,—नको तें ! ७

६ जानेवारी १९२९ ]

## चंद्राराणी　　　　　　: : ५

(ओवी)

कोठें ती चंद्राराणी　　राजस रूपखाणी,
गातात गोड गाणीं,　　कवि जिचीं ! १

श्यामल पटावरी　　हिऱ्यांचा सडा पडे,
टपोर त्यांत खडे　　गुरु शुक्र. २

असोत तेजोगिरी　　परंतु चंद्रेपुढें
पडति ते वापुडे　　मोलहीन. ३

सांडतें तिचें तेज;　　सुधेची होई वृष्टि,
रंजवी स्वप्नसृष्टि　　चंद्राराणी. ४

ती का ही चंद्राराणी　　फिकट दीनवाणी ?
जीवाचें होई पाणी　　दिसतां ही. ५

ढगाची पांढुरक्या　　फाटली दिसे चिंधी,
नभःश्री लेई बिंदी　　ही का भाळीं ? ६

पेठेंत दिनभर　　सुवर्णव्यवहार
ढुंकून पाहणार　　कोण हिला ? ७

सौभाग्यच्युत होतां　　कोठून ती प्रतिष्ठा ?
अश्रूंनीं माझी निष्ठा　　हीस न्हाणी. ८

बोले तों चंद्राराणी　　" गाशी तूं योग–गाणीं,
अजाण परी प्राणी　　दिसशी तूं. ९

अशोकवनामध्यें लंकेचीं वैभवें तीं
जीवाला शांति देती किमपि न. १०

त्याहून गोदातटीं शीणल्या कष्टें देहीं
रुचतीं वल्कलेंहीं सौभाग्याचीं. ११

हृदयीं एक ज्योति भ्रमण दुजाभोंतीं;
आपत्ति हीच मोठी दैव आणी. १२

आमुची चंदाराणी म्हणून गातां गाणीं
स्वार्थच बघे वाणी तुमची ही. १३

भ्रमतां अंतराळीं निस्तेज होतें तेव्हां
असतें माझ्या देवा— जवळ मी. १४

चुकून कधीं काळीं मित्राशीं तोंडभेट
होतां तो काळ थेट अशुभ का ? १५

कणव नका करूं ! नादांत फिरतें मी
मिलीन मित्रप्रेमीं चंदाराणी.—" १६

५ ऑगस्ट १९३३ ]

# तेथे चल राणी : : ६

( वृत्त : रात्रिवितान )

कोठें तरि जाऊं बसुनी शीघ्र विमानीं
अज्ञात ठिकाणीं.
स्वातंत्र्य जिथें, शान्ति जिथें, प्रेम इमानी
तेथें चल राणी ! १

सामाजिक संबंध सखे, हे न टिकाऊ;
हे स्नेह दिखाऊ !
मी तूज, मला तूं, प्रभु दोघांस निदानीं. तेथें० २

भाळे न इथें प्रीति धनावीण कुणाला,
ना मोल गुणाला;
लावण्य नसे जेथ जणूं चीज किराणी. तेथें० ३

व्हा बद्ध इथें, प्रेम करा वा न कराही,
नातें दृढ राही;
गे लग्नविधि जेथ न जीवैक्य-निशाणी. तेथें० ४

नातें पुरुषस्त्रीमधिं तें एकच वाटे,
ऐसें उफराटें,
ज्यांचें मत त्यांचें वच यावें नच कानीं. तेथें० ५

डोळ्यांत इथें लाडिक जादू परि खोटी,
अन् संशय पोटीं.
साधेपण जेथें न गमे गूण अडाणी. तेथें० ६

कांहींहि करा ही जनता मारिल नांगी
हांसूनि अपांगीं
ध्येयास पुरा वाव मिळे, होय न हानी, तेथें० ७

स्वातंत्र्य न सत्तेविण, संभावितताही
दंभाविण नाहीं,
स्वार्थापुरतें सत्य न जेथें कुणि मानी, तेथें० ८

अन्याय इथें जोंवर अन्यास जहाला
तों त्रास कशाला ?
जेथें न शिणे केवळ लाभास्तव वाणी, तेथें० ९

ही चैन अविश्रान्त, बडेजाव विकाऊ
टाकूनिच जाऊं;
स्वाभाविक कष्टाळु जिथें रम्य रहाणी, तेथें० १०

ये कोठुनि कष्टाविण विश्रांति दिनान्तीं,
धर्माविण शांती ?
स्वादिष्ट सुधेहूनि जिथें भाकरपाणी, तेथें० ११

काव्यें नकलीं नीरस वाचूनि जिवाला
वाटे न जिव्हाळा;
फेंसाळत गाईल जिथें ओहळ गाणीं, तेथें० १२

कोठूनि गरीबी असतां रानफुलांहीं
शृंगारित राई ?
बेमोल जवाहीर खुले रात्रिवितानीं, तेथें० १३

कोठें तरि रानांत बसूं या नि हंसूं या,
जेथें न असूया !
संतोष पडूं दे न कुठें न्यून निधानीं, तेथें० १४

बांधूं चिमणें खोपट कीं ऊब जयाची
दैवी प्रणयाची !
आल्या अनिकेतास खुलें स्वागत रानीं, तेथें० १५

अंकावर खेळूनि शिकूं सृष्टिसतीच्या
आत्मप्रगतीच्या
त्या गूढ कथा ज्या न कुराणीं न पुराणीं, तेथें० १६

१९३३ ]

## आई : : ७

( वृत्त : वैखरी )

नाहीं तुझ्या मी पोटचा गोळा परी
  ' आई ! ' म्हणूनी हांक मारी वैखरी.
  नाहीं तुझ्या दुग्धावरीही पोसलों,
कोठूनि लागे ओढ ऐशी अंतरीं ?
  स्वप्नींहि नाहीं पाहिलें बाल्यीं तुला,
कां भाव बाल्यांतील हा येई वरी ?
  गेली तिशी लोटूनि अन् मी बाल का ?
कां ऐन वैशाखीं नवी वाहे झरी ?
  माझे न केले लाड तूं केव्हां, तशी
केली तुझीही मीं न केव्हां, चाकरी.
  आश्चर्य कीं तूं दृक्पथीं येतां क्षणीं
निःशब्द पूजा मी तुझी चित्तीं करीं.
  संतुष्ट मीं दृष्टिप्रसादें तूझिया
तत्काल औदासीन्य माझें तो हरी.
  माझें तुझें नातें कधींचें कोठलें ?
ही काय माया, योजना वा ईश्वरी ?
  माझी मला कांहीं कळेना पात्रता
तैशीच तूझ्या थोरवीची पायरी.

१९३३ ]

## दुबळ्यांचा न्याय : : ८

( जाति : पंचकल्याणी )

होई खेड्यांतुनि बोभाटा,
सर्जेराव मारितो वाटा
बंदुका बाळगी, काडतुसांचा सांठा. १
कोणी बेरड हा न अडाणी
याचा वेष फांकड्यावाणी.
तोंडावर खेळे किती शहरचें पाणी. २
त्याला भीत सर्वही कां कीं
पटका, कोट, चोळणा, खाकी,
ऐटीनें नियमितपणें पाउल टाकी. ३
लागे कुणी न त्या सांगातीं
जाउनि तडक गुऱ्हाळें गांठी
पैक्याच्यासाठीं करी कडक दमदाटी. ४
भरती हाट न आठवड्याचे
बसती बैल घरीं छकड्याचे
दुर्दैव सदाचे या कष्टाळु गड्यांचें ! ५
वार्ता जाय मुख्य नगराला,
चर्चाविषय नवीन जहाला,
स्वस्थताच अजुनी, कीं पेठेंत न घाला. ६
चाले राउळांत जयघोष,
पोंचें आंत न तो आक्रोश
जरि शेतकऱ्यांच्या पडे घशाला शोष. ७

अमुचे निःशस्त्रांचे राजे
यांचें वैभव काय विराजे !
आसेतुहिमाचल यांचा महिमा गाजे. ८
म्हणती शेषशायि भगवंत
न करी कलिकलहाची खंत,
जो दुर्बल जन विश्वसे तयाचा अंत ! ९
येतां दुष्ट लहर माजाची
सर्जेराव सतींना जाची;
अबलाच कामनापूर्ति जगीं प्रबलांची ! १०
घेतां लज्जा अशि लक्ष्मींची
दीनहि कुठवर करितिल चीची ?
नररक्त उसळतें, ऐकवे न ती छी छी ! ११
मारूं अथवा मरुनी जाऊं,
आला तोहि कुठून लढाऊ ?
ही धार विळ्याची बंदुकीस त्या दावूं १२
पडला एक गडी घायाळ,
उठला तोंच दूसरा काळ,
घालुनी पेंच मोडिला हात तत्काळ. १३
आंत हाड हाड मोडा रे !
मागुनी जिवानिशीं सोडा रे,
अन् खेड्यापाड्यांतुनी यास ओढा रे. १४
परि ही चीड ओसरुनि जातां,
होतिल झणिं मेंढ्यांपरि आतां,
सोसाया पुनरपि कष्टुनि नमवुनि माथा. १५

७ मार्च १९३५ ]

# ताजमहाल : : ९

( जाति : प्रणयप्रभा )

जें स्वप्न आजवर मनिं तरळें,
त्याहून रम्य हें आज कळे ॥ ध्रु० ॥

यमुना काळी, काळें अंबर,
वातावरणहि होई धूसर,
तटीं शान्त हें पांडुर सुंदर
जगत्किल्मिषें हें न मळे १

अस्पष्टच हें तिमिरामधुनी
पिसे, दिसे ज्यापरी सुरधुनी
ध्येयवादिजननयनापुढुनी
भविष्य मोहक जें न ढळे. २

ढगाआडचा पूर्ण चंद्रमा
न दिसे, फांके परि तत्सुषमा
पतिव्रतेची प्रीति निरुपमा
स्मृतीमधें जैशी उजळे. ३

प्रेमाशेचें–प्रभातवैभव
पवित्रतेचें निधान अभिनव
काळ–सागरीं बुडे, विरे तंव
फेसमिषें वर कीं उसळे. ४

कालिदासकवितेंतुनि विलसे
अजविलाप तो मधु करुणरसें,
वास्तुरूप घे अमर का असें,
उदात्त सुंदर गूढ वळें. ५

प्रेमाश्रु तुझा वा जगदीश्वर
पडतां पडतां थिजला सत्वर,
विभवहिमाचल झाला भूवर
—का मरणोत्तर हें सगळें ? ६

सुधांशु आतां नभीं अनावृत
कुमुद यशाचें तुझिया प्रसृत,
करी वरुनि अभिषेकुनि अमृत.
मरणाचें मरणत्व गळे. ७

हें का लोकोत्तर जनमानस,
का मृत्युंजय मूर्त शांतरस,
प्रेम अनिर्वचनीय अलालस
काळ पळे पण जें न पळे ! ८

दिसे दिशीं हें सुमनोवेधक,
काय बरें हें ? हाय काळनख !
शाश्वति पुण्यस्मृतीसहि न मग
शल्य हेंच हृदयांत सले. ९

१८ मे १९३५ ]

## फटकळ अभंग : : १०

( छंद : देवद्वार )

१

चालला असेल आज नामघोष– काय कंठशोष देवासाठीं !
माणूसपुराचा राउळाला वेढा, विठ्ठलाचा वेडा भक्तगण.
चंद्रभागेकांठीं वालुकेचे कण, त्याहूनहि जन उदंड ते.
विठ्ठल ! विठ्ठल ! तुंबळ गजर, कोंदलें अंबर टाहोनें त्या.
चौदा चौकड्यांचें राज्य मूल्यहीन, देवपदीं लीन भागवत.
प्राण गेला जावो देवाचिये द्वारीं, मोक्षाची पायरी भेटली ना ?
कासया हें जिणें ? दे गा देवा मुक्ति; कांहीं तरी युक्ति कर राया,
विटेवरी पाय कटीवर हात, तटस्थ पहात उभा कां तूं ?

२

तुझ्या माहात्म्याचा आषाढीचा दिन, तथापि वंदीन दुरून मी.
या लोकांसारखा कसा घेऊं धांव ? मोक्षाची त्या हांव नाहीं मला
कशी मागूं देवा ! कैवल्याची भीक, हवी मोकळीक प्रपंचाची.
माझ्या एकट्याचा कशाला उद्धार ? राहिला संसार करोडांचा.
फार झाला देवा स्वार्थाचा संकोच, आतां तो नकोच परमार्थ.
प्रपंचीं मंगल सावधान नीट राहूं द्या, का झीट भक्तीची ती ?
अफूच्या गुंगींत विस्मृतीचें सुख, तयाचें कौतुक मी न करीं,
तूं पण सांभाळ, वेड्यांची या सेवा, विपरीत देवा फळायची.

३

तुझे भक्तगण तुझें देवपण, घेती हिरावून पांडुरंगा.
तुला स्वतापरी मानूनि साचार, सारे सोपस्कार करिती ते.
चुकूनि ये तुझें नाम जिव्हेवर, पापाचे डोंगर भस्म होती.
तुझ्या नामाचा हा विचित्र महिमा, केवीं न्यायसीमा ओलांडी रे ?
जनांत जाणूनी स्तुतीचा प्रभाव, देवाचा ते भाव ठरविती.
दागिन्यांनीं तुझें करिती कौतुक, कीं शृंगारसुख जाणती ते.
मोकळे कराया वाटेल तो छंद. तुझें तोंड बंद नैवेद्यानें.
अशा भगतांचा होशी देवा राणा---आहेस शहाणा, काय सांगूं ?

४

कटीवर हात ठेवूनि तिष्ठत, पुढें काय गत पांडुरंगा ?
भक्तांनीं घातले तुला हे दागिने, पराक्रमाविणें टिकती न.
आपुलिया बळें राही न सदाचें, तुझें पाषाणाचें राऊळही
रहाया अभंग सुंदर हें ध्यान, हवें अधिष्ठान कशाचें रे ?
रक्षितील काय दुबळे भगत ? सोमनाथ–गत नाठवे का ?
भक्त आटपतां तूंच जगतांत, होशील अनाथ जगन्नाथा !
इहलोकीं कर भक्तांना समर्थ, आज काय अर्थ परलोकीं ?
टाक योगनिद्रा, ऐक शब्द माझा, पंढरीच्या राजा विठ्ला रे !

५

पुरे झाली देवा, आजवर शोभा, मार आतां तोबा भक्तांना या.
युगें अठ्ठावीस परवश जिणें जणूं मिरवणें प्रेतयात्रा.

कोणींही कोठूनि यावें झोडपावें, त्यांस निष्ठाभावें सेवितोंच !
एकमेकांवर खातों दांतओठ, भरितों हें पोट उच्छिष्टानें.
सहस्र वर्षांचें साचलें हें काळें, त्यानेंच सांवळें तुझें रूप.
तुझ्या समाजाची हीच का धारणा ? देवा, विचारणा करितों मी.
कांहींच का नाहीं दैन्याची या लाज ? पुरें योगिराज काळझोंप !
जेणे हेलावेल चैतन्यसागर, असें कांहीं कर तांतडीनें.

## ६

अनायासें लाखों भक्त भोळसट, झालें एकवट तुझे दारीं,
त्यांना पटवुनी देई कटु सत्य, तुलाच अगत्य माझ्याहून.
आपुलालें पोट सारें टीचभर, त्यांत विश्वंभर नाहीं नाहीं.
जनतेच्या कामीं निथळूं द्या धर्म, हेंच धर्मकर्म नीट जाणा.
विठोबा रखुमाई पहा कोट्यवधि, महाराष्ट्रामधीं त्यांना भजा.
त्यांचिया सेवेनें प्रसन्न तो होई, प्रत्येकांत राही जो देव तो.
सहकारयत्नीं मर्त्यांचें सामर्थ्य, हें न जाणा मर्त्य — अमर हें.
क्षितिजा भिडवा कर्तृत्वाची सीमा, पंढरी — महिमा त्यांत आला !

१२ जुलै १९३५ ]

# यशवंत दिनकर पेंढरकर

आजच्या तरुण पिढीला ‘ यशवंत ’ कवींची ओळख करून देण्याची जरूरी नाही. आजचे तरुण विद्यार्थी, म्हातारपणी त्या वेळच्या तरुण पिढीस आपल्या तरुणपणाच्या ज्या आठवणी सांगतील त्यांत, ‘ यशवंतांचे काव्य आम्ही ऐकले आहे, यशवंतांना आम्ही पाहिले आहे, ’ असे मोठ्या अभिमानाने सांगतील. कवीच्या तोंडून त्याचे काव्य ऐकणे हे एक मोठे भाग्यच आहे !

यशवंतांच्या एखाद-दुसऱ्या कवितेच्या श्रवणाने त्यांची आठवण नेहमी मनात राहावी हे त्या काव्याच्या सामर्थ्याचे एक लक्षण आहे. त्यांच्या काव्याच्या दीर्घ परिचयाने हे सामर्थ्य जास्त जास्त कळत जाते.

‘ काव्याचे सामर्थ्य ’ म्हटल्याबरोबर कदाचित रणगीतांची किंवा संग्रामगीतांची आपणांस आठवण होईल. एखादे इतिहासप्रसिद्ध युद्ध हाच काव्याचा विषय असला की, मग त्या काव्यातही त्या समरप्रसंगाचा आवेश उतरतो हे खरे आहे. परंतु जीवनातील सामर्थ्य फक्त रणांगणावरच व्यक्त होते असे नाही. रणांगणाबाहेर अफाट दुनियेत जीवनाचा जो पसारा सर्वत्र दिसतो त्या जीवनातही अनेक समरप्रसंग येतात. यशवंतांच्या जीवनात अशा समरप्रसंगांची जणू काय एक मालिकाच लागली आहे. त्यांचे जिवलग स्नेही प्रा. श्री. बा. रानडे यांनी त्यांच्या जीवनातील समरप्रसंगांचा थोडक्यात सारांश दिला आहे. तो असा :

“ मनुष्याने पुष्कळ मनोरथांचे डोलारे उभारावेत, प्रेमपूर्ण वृत्तीने काव्यपूर्ण आयुष्य कंठण्याची आशा धरावी आणि प्रत्यक्ष सृष्टीत नीरस, प्रेमहीन कष्टाचे जिणे कंठण्याची पाळी यावी हे शेंकडा नव्याण्णव लोकांच्या कपाळी लिहिलेले असते, तेच यशवंतांचे विधिलिखित होते. ”

—‘ मनोहर ’ ( जानेवारी १९४१ )

यशवंतांनीही आपल्या या जीवितयुद्धाचे शब्दचित्र रेखाटले आहे. ते म्हणतात :

“ इंग्रजी सात यत्तांचे शिक्षण— शिक्षण कसले नुसती ओझरती विषय-ओळखच ती ! शारदेच्या दरबारातील कोणत्याही एका मानवंताच्या

दौलतीचे पुसटही दर्शन घडलेले नव्हते. तेवढे शिक्षण होताच पोटाचा प्रश्न ! ते प्रश्नचिन्ह म्हणजे विश्वभक्षक काळजबडाच तो ! कारकुनीशिवाय काय पडायचे चौपदरीत ! कारकुनी म्हणजे असेल नसेल त्या अभिरुचीची राखरांगोळीच ! अशा परिस्थितीत कवितेच्या आवडीचे कोवळे मुगारे करपून जायचे; पण वावटळीत पदराआड दिव्याची ज्योत सांभाळून ठेवावी त्याप्रमाणे अंतर्यामींची असलेली कवितेची आवड मी जोपासली. सारस्वताच्या अफाट महासागरातून अनेक सुसज्ज पाणबुड्ये हिरीरीने मोत्यांच्या राशीच्या राशी वर आणीत आहेत. अनेक दर्यासारंग जहाजे भरभरून घनराशी किनाऱ्यावर ओतीत आहेत. त्यात माझ्यासारख्या क्षुद्र मीनाचा काय पाड लागणार ! शारदेला कसला नजराणा मी अर्पण करणार ! "

अशी परिस्थिती आणि मनःस्थिती असतानाही यशवंतांनी त्या सागराचे निरीक्षण केले. कोठून कसे प्रवाह वहात आहेत ते हेरून अंतर कापायचे असे मनाने घेरले आणि सारस्वताच्या अफाट सागरात पोहण्यासाठी उडी घेतली. त्यांच्या मनाची ओढ अनावर होती; प्रतिभेची ऊर्मी दुर्दम्य होती. म्हणूनच परिस्थितीच्या असह्य दडपणाखाली त्यांनी मन पिचू दिले नाही. ते सांगतात :

" लहानपणी कीर्तनात ऐकले होते—

' छंद लागला टिटवीला
तिने समुद्रहि आटविला '

हे पद्य मला उमेद देत असे. "

या प्रतिकूल परिस्थितीत त्यांच्या प्रतिभेचे सामर्थ्य टिकले याचे कारण त्यांच्या ठिकाणी " विविध सौंदर्यदर्शनाने उचंबळून येणारी वृत्ती आणि नियतीने लगावलेल्या प्रखर फटकाऱ्यांनी आलेला तल्लखपणा " उत्पन्न झाला. एवढ्या सामुग्रीवर यशवंत आज लोककवी आणि राजकवी झाले आहेत ! काव्य ही एक उपासना आहे; ते एक व्रत आहे अशी त्यांची भूमिका आहे.

' उपासक ' या कवितेत ते म्हणतात :

" चालवितों व्रत तव भक्तीचें "

या व्रताविषयी आणि उपासनेविषयी अत्यंत उत्कट श्रद्धा असल्यामुळे त्यांनी आपल्या व्रतासिद्धीचे 'यशोधन' आता संपादन केले आहे.

त्यांच्या ठिकाणचे हे सामर्थ्य त्यांच्या जन्मभूमीनेच त्यांना दिले असावे. चाफळखोऱ्यालगतच्या तारळे गावी ९ मार्च १८९९ रोजी त्यांचा जन्म झाला आणि नोकरी करण्याइतके वय होईपर्यंत शिवसमर्थांच्या त्या कर्मे-भूमीत कृष्णाबाईच्या परिसरातच त्यांचे पूर्वायुष्य गेले. तो प्रदेश उज्ज्वल पराक्रमांच्या इतिहासाने भारून गेलेला असल्यामुळे, यशवंतांच्या मनास त्याची विलक्षण ओढ आहे. ते स्वतःस मोठ्या अभिमानाने 'दऱ्या-खोऱ्यातला कवी' म्हणवितात. आपल्या काव्यातून शिवाजी आणि रामदास यांच्या सामर्थ्योत्पादक कर्तबगारीचा संदेश त्यांनी वारंवार महाराष्ट्रास ऐकविला आहे. त्या विचारांचे आणि भावनांचे स्फूर्तिस्थान म्हणजे त्यांच्या जन्म-भूमीचे मनात ठसलेले भावचित्र हे होय.

चाफळखोऱ्यातील मांडवी नदीला उद्देशून ते म्हणतात :

'संचरतांना तीरावरती
अर्घ्य कितीदां समर्थहातीं
पडले असतिल तुझिया पात्रीं
समर्थदूती तूंच होउनी फिरवियला आदेश'

तोच आदेश आजही त्या समर्थदूतीच्या पाण्याच्या खळखळीत, आणि झुळझुळीत ऐकू येत आहे. कवि त्यासाठी प्रार्थना करतो—

'तुझिया गानीं मला ऐकु दे दासांचा उपदेश.'

आपल्याला ऐकू आला आणि समजला तसा समर्थांचा संदेश यशवंत आपल्या काव्यातून सांगत आहेत.

चाफळखोऱ्यात वावरणाऱ्या त्यांच्या स्वयंभू प्रतिभेस पुण्यास नोकरी-साठी आल्यावर गिरीशांच्या सहवासाचा आणि पुण्याच्या सुसंस्कृत नागर वातारणाचा लाभ झाला. त्यांत प्रा. श्री. बा. रानडे यांच्यासारख्या

स्नेहाळ मित्राची सावली मिळाली आणि यशवंतांची प्रतिभा मानवी जीवनाचे नवे नवे प्रांत सूक्ष्मपणे न्याहाळू लागली. पुण्यास असलेल्या नवोदित कवींनी ' रविकिरणमंडळ ' काढले होते. यशवंत त्या मंडळात वावरू लागले. मंडळाच्या माध्यमाने त्यांना गिरीश आणि प्रा. श्री. बा. रानडे यांच्याबरोबर माधव ज्यूलियन या कविवर्यांचा सहवास लाभला.

रविकिरणमंडळातील कवी काव्याचे एक नवे जग निर्माण करू लागले होते. केशवसुतांच्या युगाचा एक कालखंड टिळक, गडकरी व बालकवी यांच्या मृत्यूनंतर ( १९२० ) संपल्यासारखा वाटत होता. रविकिरण-मंडळाने १९२३ सालापासून आधुनिक काव्याच्या दुसऱ्या कालखंडास आरंभ केला. त्या कालात यशवंतांचा विकास झाला. परंतु इतर कवींच्या सहवासात आणि एकाच वातावरणात वावरत असताही यशवंतांचे वैशिष्ट्य अबाधित राहिले. त्यांनी आपल्या काव्याने एक स्वयंसिद्ध प्रांत फुलविला आहे. ' यशवंती ' या त्यांच्या पहिल्या काव्यासंग्रहापासून तो ' ओजस्विनी या काव्यसंग्रहापर्यंत यशवंतांचे वैशिष्ट्य कायम राहिले आहे. त्यांच्या काव्यावर त्यांच्या पूर्वकालीन किंवा समकालीन कवींची छाया पडली नाही. कारण ' माझ्या कविता हा माझ्या सुखदु:खांचा परिपाक आहे ' असे त्यांनी स्वतःच सांगितले आहे. आपल्या वैयक्तिक जीवनातील परिस्थितीशी झगडत असतानाच कवी स्वतःच्या भोवती वावरणाऱ्या समदु:खी व्यक्तींना विसरला नाही. उलट ते सहप्रवासी हीच त्याच्या अंतःकरणाची सोबत होती. शिक्षक म्हणून किंवा कारकून म्हणून त्यांना जी नोकरी मिळाली ती सुद्धा येरवड्याच्या बंदिशाळेत ! परंतु तेथेही कवीच्या अंत:करणास प्रवेश करता आला आणि जगाच्या विकृत न्यायपद्धतीने ज्यांच्या जीवनाची लहानपणीच मुस्कटदाबी होऊ लागते त्या बालगुन्हेगारांची दुःखे त्यांनी रेखाटली. समाजाने आपल्या गुन्हेगारीवर पांघरूण घालण्यासाठी बालकांनाच बळी द्यावे, ही भयंकर गुन्हेगारी त्यांनी बंदिशाळेत उघड केली. स्त्रीपुरुषांच्या सहवासाच्या बाबतीत काही व्यावहारिक बंधने लादणारा समाज, पुष्कळ वेळा तरुण मनांचा असह्य कोंडमारा करतो. तरुण स्त्री-पुरुषांच्या सहवासाच्या आणि सान्निध्याच्या प्रत्येक प्रसंगी अनाचार नि अनीतीच बळावते असा दंडक होऊ शकत नाही. उलट त्या सहवासाचे पर्यवसान हृदयमीलनातही

होऊ शकते हे त्यांनी ‘ जयमंगला ’ काव्यात एका प्राचीन कथेच्या आधारे दाखविले आहे. भोवतालच्या जीवनात खोटेपणा, दांभिकता, अरेरावी ही जेथे जेथे दिसतील तेथे तेथे कवीची धाव पोहोचते हे त्यांच्या काव्यावरून दिसून येईल, ही मनाची व्यापकता त्यांच्या जीवनातील अतिशय कष्टमय परिस्थितीतही व्यक्त होत होती. परिस्थितीने थोडीशी उसंत दिल्यावर त्यांनी आपली इच्छा जास्त मुक्तकंठाने परमेश्वराजवळ व्यक्त केली आहे.

‘ अन्य नको वरदान ’ या कवितेत ते म्हणतात :

‘ अन्य नको वरदान ।
प्रभो मज । अन्य नको वरदान ।

कोणी अवतीं-भवतीं माझ्या
जमले किंवा जमवियले ज्यां
पुरवायातें त्यांच्या गरजा
द्या सामर्थ्य निदान ! ’

हे वरदान त्यांना मिळाले आहे असे त्यांच्या कवितांवरून रसिकांच्या प्रत्ययास येऊ लागले आहे. त्यांनी आपली ‘ पाणपोई ’ ही कविता १९२७ साली लिहिली. तीत ते आपल्या रसिकवृंदास म्हणतात :

‘ येई भाई येथ पाही घातली ही पाणपोई
धर्म—जाती कोणती ती भेद ऐसा येथ नाहीं
—श्रांत पांथा ! बांधली ही तूझियासाठीं सराई.
—ओंजळी, दो ओंजळी, आकंठ किंवा घे पिऊनी
हो जरा ताजातवाना, येउं दे सामर्थ्य पायीं.
पावतां तृप्ती मना, संचारतां अंगीं उमेदी
जो दुवा देशील पांथा तेवढी माझी कमाई. ’

त्यांच्या काव्याचा रसास्वाद घेतल्याखेरीज हा दुवा कसा देता येणार आणि कवीला त्याची कमाई कशी मिळणार ?

पण कवी मात्र कमाईसाठी थांबला नाही. त्याची समर्थांचे व्रत चालविण्याची तपश्चर्या अखंड चालली आहे. ते परमेश्वराजवळ अदम्य उत्साहाने सांगतात—

'—परोपरीच्या दैन्यांचाहि न केवा
कोठेंहि आपली प्रभो चालविन सेवा '

त्यांच्या काव्यात त्यांच्या वैयक्तिक जीवनात दीर्घ काल थैमान घालणारे नैराश्य पदोपदी आढळून येते. त्यांचे मित्र श्री. माडखोलकर म्हणतात :

" निराशेने त्यांच्या जीवनाला शोष लागल्यासारखा होऊन त्यांची प्रतिभा आत्मपर बनली. या आत्मसमाधीतून त्यांची सारी भावकविता उत्स्फूर्त झाली आहे. "

दारुण परिस्थितीच्या वनवासात जवळजवळ पंचवीस वर्षे घालवीत असता काव्य हीच त्यांच्या अंतःकरणाची विश्रांती होती. आपल्या काव्यलेखनाच्या पाणपोईवर ते आपल्या तृषार्त मनाची तृषा भागवीत होते.

परंतु त्यांच्या काव्यात त्यांच्या नैराश्यमय जीवनाचे जे पडसाद जागोजाग घुमत आहेत, त्यांतही झुंजारवृत्ती दिसते. मनाचे दुःख प्रकट करताना स्वाभिमानी, आकांक्षी मनाचा संताप त्यात व्यक्त झाला आहे. ती रडगाणी नाहीत. त्यांच्या झुंजारवृत्तीचे वर्णन करताना श्री. माडखोलकर लिहितात :

" नाजुक जागी घुसून रुतून बसलेल्या गोळीचे दुःख सतत डाचत असता चेहेऱ्यावर ते यत्किंचितही उमटू न देता धीराने दिवस कंठणाऱ्या झुंजार माणसासारखी त्यांची वृत्ती आहे."

आयुष्यातील अतिशय प्रतिकूल परिस्थितीतच ' भावमंथन ', ' जयमंगला', ' बंदिशाळा ' हे काव्यसंग्रह प्रसिद्ध झाले आहेत.

बरेच दिसत स्वतःच्या नाठाळ दुर्दैवाशी झगडत राहिल्यावर हळूहळू त्यांच्या परिस्थितीचे फास सुटत चालले आणि त्यांचे मनही भोवतालच्या जीवनाशी जास्त समरस होऊ लागले ' जगरहाटी 'चे रौद्र स्वरूप ते

धीराने पाहू लागले. वैयक्तिक जीवनातील शृंखलांपेक्षा 'जगाच्या कल्याणासाठी' जीविताचा होम करणाऱ्या पुण्यश्लोकांच्या पायांतील शृंखलांचे त्यांना दर्शन झाले. असंख्य जीवितांवर आपला सैतानी अंमल गर्जविणारे प्रचंड सत्ताधीश पाहून त्यांना ते दलितांच्या आणि दीनांच्या वतीने आव्हान देऊ लागले आणि त्यांचा गुप्तपणे होणारा उपहास आवेशाने जगास ऐकवू लागले. दुःखाचे आणि दुर्दैवाचे सर्व अवतार त्यांनी नीट पाहिलेले आणि बरेचसे अनुभवले असल्याने ते कृतिशून्य गर्जनातील फोलपणा ओळखतात!

दुःखितांचा आणि वंचितांचा आवेशाने कैवार घेत यशवंत लोकहृदयाशी एकरूप होत आहेत. त्यांनी वंचित प्रेमिकांचीं दुःखे जितक्या तन्मयतेने रंगविली, तितक्याच तन्मयतेने गुलामांची गाऱ्हाणी जगाच्या वेशीवर टांगली! भोवतालच्या देशव्यापी परिस्थितीची जाणीव झाल्यावर ते देशभक्तांच्याबरोबर 'तुरुंगाच्या दारात' जाऊन उभे राहिले आणि त्यांच्या हृदयात शिरून तेथील दुर्दमनीय धैर्य त्यांनी इतरांस आपल्या कणखर वाणीने ऐकविले. तुरुंगाच्या आवारात व्रतस्थ देशसेवकाप्रमाणेच जीवनाच्या धडपडीत गोत्यात आलेले पामर कैदीही त्यांनी पाहिले आणि एखाद्या प्रजावत्सल राजाच्या कृपाकटाक्षाने त्यांची मुक्तता झाल्यावर, त्या पामरांच्या जीवनात आनंदाचा जो कल्लोळ होतो तोही त्यांनी आपल्या काव्यात नमूद केला आहे. आपल्या वैयक्तिक जीवनात बसलेले अन्यायाचे तडाखे पचवून आता ते कैद्यांचा कैवार घेऊन माणुसकीच्या भूमिकेवर न्यायाचा सवाल करीत 'प्रताप'शाली राजसिंहासनासमोर उभे राहात आहेत. त्या दरबारात सिंहासनाधीश त्यांना 'राजकवी' म्हणत आहेत; परंतु दरबाराच्या आसमंतात पसरलेली जनता त्यांना 'लोककवी' म्हणून गौरवीत आहे. जनतेच्या मूक मनात कोंडलेले भाव मानवतेच्या न्यायमंदिरात परमोच्च न्यायाधिशास ऐकविणे हे लोककवीचे कार्य यशवंतराव आज करीत आहेत.

त्यांच्या काव्यात आलेली ही विशालता त्यांनी आपल्या मानसिक सामर्थ्याने मिळविली आहे. स्वातंत्र्यसेनेतील सैनिकांच्या आवेशाशी एकरूप होऊन 'द्या आम्हांला सुळीं' अशी गर्जना, त्या वीरांच्या सुरात सूर मिळवून, यशवंत करू लागले आहेत. याचे कारण ते मोठे धनाढ्य होऊन स्वतंत्र झाले आहेत असे नाही. पूर्वीच्या परिस्थितीच्या कृष्णपार्श्वभूमीवर त्यांची

आजची स्थिती जरा उठून दिसते एवढेच. वस्तुतः ते शरीराने काहीसे पंगू झाले आहेत; कर्तव्यबुद्धीचे समाधान करण्याइतका पैसा मिळत नसल्याने निर्धनतेच्या पराण्या आहेतच आणि नोकरीची शृंखला तोडून टाकणे भाग पडल्याने, एक प्रकारे परिस्थितीने लादलेले स्वातंत्र्य त्यांच्या भावनाप्रधान मनास साहसासारखे दचकवीत आहे. बडोदे सरकारने दिलेल्या राजाश्रयाचा गवगवा बराच झाला, तरी त्या आश्रयाचे पांघरूण त्यांच्या कौटुंबिक जीवनात पुष्कळ वेळा थिटेच पडते. परंतु त्यांच्या मनाला आता विकसित अवस्थेत लाभणारे प्रौढपण आले आहे आणि त्या प्रौढत्वाला साजेशी व्यापकता त्यांच्या काव्यात प्रगट होत आहे.

काव्यशिखराच्या रोखाने चढू लागलेली त्यांची ' यशवंती ' लवकरच एका महाकाव्याचे शिखर गाठणार आहे.

काव्यप्रांतात यशवंतांनी शिशुगीतांचेही दालन सुशोभित केले आहे. त्यांच्या कवितासंग्रहातील शिशुगीतांखेरीज ' मोतीबाग ' हा त्यांच्या बालगाण्यांचा वैभवशाली संग्रह प्रसिद्ध आहे.

यशवंतांनी ' कवी ' म्हणून मान्यता आणि यश संपादन केल्यावर गद्यलेखनाकडे आपली लेखणी वळविली. ' प्रापंचिक पत्रां 'तून त्यांनी संसाराच्या वास्तवतेचे रम्योत्कट चित्रण केले आहे. ' कातणीचे घर ' हा लघुनिबंधसंग्रह आणि ' घायाळ ' हा एका प्रसिद्ध आंग्लकथेचा मुळाइतका हृदयस्पर्शी अनुवाद, या ग्रंथांनी यशवंतरावांच्या गद्यलेखनाकडेही रसिक आकर्षित झाले आहेत. पद्य आणि गद्य या दोन्ही विभागांत यशवंतांचा सहवास वाचकांस आता लाभू लागला आहे.

## आई : : १

(जाति : रसना)

‘ आई ’ म्हणोनि कोणी आईस हांक मारी
ती हांक येइ कानीं मज होय शोककारी
नोहेच हांक, माते मारी कुणी कुठारी.
आई कुणा म्हणूं मी ? आई घरीं न दारीं !
ही न्यूनता सुखाची चित्ता सदा विदारी
स्वामी तिन्ही जगांचा आईविना भिकारी १

चारा मुखीं पिलांच्या चिमणी हळूच देई.
गोठ्यांत वासरांना ह्या चाटतात गाई.
वात्सल्य हें पशूंचें मी रोज रोज पाहीं
पाहून अंतरात्मा व्याकूळ मात्र होई.
वात्सल्य माउलीचें आम्हां जगांत नाहीं.
दुर्भाग्य याविना का आम्हांस नाहिं आई. २

शाळेंतुनी घराला येतां धरील पोटीं,
काढून ठेविलेला घालील घांस ओठीं.
उष्ट्या तशा मुखाच्या धावेल चुंबना ती
कोणी तुझ्याविना गे का ह्या करील गोष्टी ?
तूझ्याविना न कोणी लावील सांजवाती
सांगेल ना म्हणाया आम्हां ‘ शुभं करोति ’. ३

ताईस या कशाची जाणीव कांहिं नाहीं.
त्या सान बालिकेला समजे न यांत कांहीं.
पाणी तरारतांना नेत्रांत बावरे ही
ऐकूनि घे परंतु “ आम्हांस नाहिं आई.”

सांगे तसें मुलींना "आम्हांस नाहिं आई"
ते बोल येति कानीं "आम्हांस नाहिं आई !" ४

आई ! तुझ्याच ठायीं सामर्थ्य नंदिनीचें,
माहेर मंगलाचें अद्वैत तापसांचें,
गांभीर्य सागराचें औदार्य या धरेचें,
नेत्रांत तेज नाचे त्या शांत चंद्रिकेचें,
वात्सल्य गाढ पोटीं त्या मेघमंडळाचें,
वास्तव्य या गुणांचें आई तुझ्यांत साचें. ५

गुंफून पूर्वजांच्या मीं गाइलें गुणांला;
साऱ्या सभाजनांनीं या वानिलें कृतीला.
आई, करावया तूं नाहींस कौतुकाला.
या न्यूनतेमुळें ही मज त्याज्य पुष्पमाला.
पंचारती जनांची ना तोषवी मनाला,
परि जीव बालकाचा तव कौतुका भुकेला. ६

येशील तूं घराला परतून केधवां गे ?
दवडूं नको घडीला ये ! ये ! निघून वेगें !
हे गुंतले जिवाचे पायीं तुझ्याच धागे;
कर्तव्य माउलीचें करण्यास येइं वेगें.
रुसणार मी न आतां जरि बोलशील रागें.
ये रागवावयाही परि येइं येइं वेगें ! ७

पुणे, २२ जानेवारी १९२२ ]

## तुरुंगाच्या दारात : : २

( वृत्त : पांडव दिडकी )

वाढुं दे कारागृहाच्या भिंतिची उंची किती
मन्मना नाहीं क्षिती
भिंतिच्या उंचींत आत्मा राहतो का कोंडुनी ?
मुक्त तो रात्रंदिनीं !

भक्तिला जो पूर आला वाढुं दे तो अंतरीं
पायरीनें पायरी;
फत्तरांच्या या तटांनीं ओसरावा काय तो ?
सारखा फोंफावतो !

अंजनीच्या बाळकानें सूर्यबिंबा ग्रासिलें
मन्मनीं तें बिंबलें,
घालिती सैतानसे शत्रू इथें थैमान जें
तें गिळाया मी सजें.

अग्निकुंडीं पाय केव्हां कंटकींही, केधवां
बंदिखान्याची हवा.
या विलासांमाजि होई आमुची जोपासना
तेज नाहीं यांविना.

हिंददेवी, गोंधळी मी वाजवीतां संबळ
घालसी हातीं बळ

पेटलेला पोत हातीं स्वार्थतैलें तेवतां,
नाचवूनी नाचतां,

या दऱ्याखोऱ्यांतुनी स्वातंत्र्यगीतें गाउनी
दावितां मी हिंडुनी,
आज आलों निर्भयें या मंदिरीं विश्रांतिला.
मान्य झालें हें तुला.

त्वत्कृपेचा सिंधु माझ्या मस्तकीं हेलावतां
काय दुःखाची कथा ?
अग्निही वाटेल मातें चंदनाचें लेपन,
कीं सुधेचें सिंचन.

शृंखला पायांत माझ्या चालतांना रुमझुमे,
घोष मंत्रांचा गमे.
लौकरी स्वातंत्र्यभानो ! भारतीं दे दर्शन.
होउं तेव्हां पावन.

मिरज – बेळगाव रेल्वे
३० जुलै १९२२ ]

# मांडवी

: ३

(जाति : कोकिळा)

[ समर्थकाळी 'मांडवी' या नावाने विख्यात असलेली ही चाफळ-खोऱ्यातील नदी भूगोलाच्या पुस्तकात आज 'मांड' या नावाने ओळखिली जात आहे. सौंदर्याला विकृती येणे हा काळाचा प्रभावच आहे. ].

सांग तुझा संदेश मांडवी, सांग तुझा संदेश.
कालचक्र हें गरगर फिरवी
किति दिवसांनीं दर्शन घडवी.
हृदय उमलतें आज मांडवी !
तव आचमनीं क्षणीं हरपलें कितीक माझे क्लेश. १

समर्थगुरुची कर्मभूमि ही
पिढ्यापिढ्यांची जन्मभूमि ही
दर्शनदुर्लभ परि मज होई
पोटासाठीं पेहरतां हा गुलामगिरिचा वेश. २

पात्रीं तुझिया खेळ मांडिले;
किल्ले रचिले, झरे खोदिले;
वाद तयास्तव तुंबळ केले;
उमेदिच्या परि वठे न पात्रीं कृतिचा त्या लवलेश. ३

कुठें तुझें जळ गिरक्या घेतें,
कुठें शिळेच्या कवेत घुसतें;
खडकासंगें धडका देतें;
शक्तियोग तो आजहि पढवी ब्रळी व्हावया देश. ४

कहर गुदरला देशावरती,
तैं घेउनि शिर हातावरती,
देह ठेविले धारातीर्थीं
वीर कुठें—खळमारमुक्त हा ज्यांनीं केला शेष ? ५

आज मावळे योद्धे गेले;
धुळीस वैभवशिखर मिळालें;
काळोखीचा सिंधु उफाळे.
देशभक्तिच्या अनन्यतेचा पिकवि पुन्हा आवेश. ६

संचरतांना तीरावरती
अर्घ्य कितीदां समर्थहातीं
पडले असतिल तुझिया पात्रीं,
समर्थदूती तूंच होउनी फिरवियला आदेश. ७

खनाळांतुनी वाहे खळखळ
पूर्वींपरि हे तव जळ झुळझुळ;
मुक्या मनाची दारुण तळमळ
तुझिया गानीं मला ऐकुं दे दासांचा उपदेश. ८

आनंदाचे या वनभुवनीं
स्वधर्ममंदिर भव्य उभवुनी
प्राण वेंचिले ज्यांनीं ज्यांनीं,
अंतकाळच्या आशा त्यांच्या ठाउक तुजला क्लेश. ९

आज घोकतों इतिहासाचीं
पानें पोकळ पोपटपंची !
मिरास झालों उपहासाची.
नसानसांतुनि पुन्हा सळसळो त्या शौर्याचा त्वेष. १०

चीड अंतरीं सदा भडकते,
जिव्हेवरि परि वाणी अडते,
लगाम कांटेरी ही नडते,
या दंष्ट्रांना पाणि पाज तव, तुटेल ती निःशेष. ११

हताश मृत वीरांची वाणी
खणखणते या तुझिया गानीं.
अखण्ड घुमुनी राहो कानीं;
तरीच कांहीं हातुन अमुच्या धुवुन निघेल अपेश. १२

येरवडा, १७ नोव्हेंबर १९२४ ]

## अखेरचे मागणे : : ४

( जाति : मुद्रिका )

राबलों वृथा संसारसौख्यविभ्रमीं
ने प्रभो आपुल्या धामीं, जाहलों सर्वथा श्रमी !

चाललों जरी सत्पथें,
तरि तुफान उलटें सुटे
सैराट तारुं भडकतें, विफल रुस्तुमी ! १

जे विकार उठले बळें,
ते तसेच उठुनी दिले;
आवरुनि तयां आणिलें कधिं न संयमीं ! २

मधुबिंदु लाभले जिथें;
ते मोहळ पडलें रितें;
मग विगुन्तलें परि तिथें निराशातमीं ! ३

लाभेल सुधा वाटलें,
मन म्हणून नादावलें,
परि अनुभव कीं विषफळें अधरविद्रुमीं ! ४

हे कितीक जन वेढिती,
मम जीवनरस शोषिती,
जैं बांडगुळें प्रगटतीं वाढतीं द्रुमीं. ५

अश्रूंत न्हाणुनी उशा,
आक्रमिल्या दु:सह निशा,
तैशाच उगवल्या उषा खिन्न नेहमीं. ६

व्यापिते निशा पोकळी,
लागली चढूं काजळी,
ह्या दिगंत भरल्या जळीं तरूं केविं मी ? ७

दाविले बहाणे कुणा;
वंचिलें दुखविलें कुणा;
तोडिती स्मृती त्या मना तीक्ष्ण कीं कृमी. ८

अनुताप चढे अनुदिनीं
तव दयांबुकादंबिनीं
कां टाकि न ही विझवुनी पेटली धुमी ? ९

धृतिमतिश्रुती पांगल्या.
ह्या नसा क्षीण जाहल्या.
एकेक तुटूं लागल्या न त्यांची हमी,
ने प्रभो आपुल्या धामीं; जाहलों सर्वथा श्रमी ! १०

येरवडा, ७ मे १९२७ ]

## विहिरीचें गाणें : : ५

( जाति : शुभवदना )

[ नदी नसलेल्या गावी पाणोठ्याचा सर्व कार्यभाग एखाद्या प्रशस्त विहिरीकडे येतो. अशा प्रकारची निळीने पृष्ठभागावर तरंगणाऱ्या रेणुमय शैवालाने आच्छादलेली विहीर सूर्योदयी म्हणत आहे— ]

हळु हळु हळु दिनमणि हा उदयाचलिं आला
पुलवाया जणुं माझ्या भाग्यपङ्कजाला धृ०
येइल तो शेतकरी
लाविल मग मोट वरी
नेइल मम जीवनांश पिकविण्या पिकाला. १
येतिलही किति गृहिणी
नेतिल जल घट भरुनी
निज चरणीं वाहुनिया देहिं वलयमाला. २
घेइल कुणि वरुनि उडी
देइल कुणि पोटिं दडी
लाडानें झटतिं मुलें जेविं माउलीला. ३
कलशातें वसनातें
क्षाळतील जन येथें
भाग्य थोर !—करुं शकतें विमल मलिनतेला. ४
सकलांच्या व्यापारी
ही सरेल नील दुरी.
प्रतिबिम्बें आणतील भरति वैभवाला.
हळु हळु हळु दिनमणि हा उदयाचलिं आला ५

२७ फेब्रुवारी १९३३ ]

[ लोकांचे व्यवहार थांबत आल्यावर तीच विहीर अस्तमानी म्हणत आहे— ]

( जाति : स्नेहसागर )

शैवालानें मला टाकिलें व्यापुन पुरतेपणीं
गुदमरे जीवहि त्या दडपणीं ध्रु०
बाहेर वाहते वाऱ्याची झुळझुळ.
लागतां तयाची पुसट कधीं चाहुल,
चलविचल अंतरीं करि मजला व्याकुल
परी सुटेना मिठी तयाची बसली जी जखडुनी.
गुदमरे जीवहि त्या दडपणीं ! १
कुणि घरा सखे जन येतां प्रेमादरें,
फुटतात अंतरीं उकळ्या, स्मित मोहरे;
हें तितुक्यापुरतें पटल बाजुला सरे.
वळतां त्यांची पाठ पुन्हां हें येई सरसावुनी.
गुदमरे जीवहि त्या दडपणीं ! २
जें जया हवें तें जातो तो साधुनी,
सेवेस सज्ज मी सकलांच्या खिदळुनी;
खिदळतोंहि आपण हें मज अनुकारुनी;
परि तयाची घोर उपाधी जाची मज निशिदिनीं,
गुदमरे जीवहि त्या दडपणीं ! ३
मी स्वतांच असुनी विमल जलाचा झरा,
आमरण राहणें तृषाक्रान्त घाबरा;
ही नीति निष्ठुरा तुझी दयासागरा.
कां न निखंदूं तुला जोंवरी नरक असा जीवनीं,
गुदमरे जीवहि त्या दडपणीं ! ४

५ जुलै १९३३ ]

## जग-रहाटी : : ६

( छंद : स्मर )

जगा ! तुझी सारी तऱ्हा सदा उफराटी !
एक तरी बागेंतील
फूल कौतुकें देशील
वाळगिली आशा फोल
अतां पुष्पराशीमाजीं बुडे मात्र ताटी ! १

आपुल्याच जातां पायीं
पाडियलें ठायीं ठायीं;
केव्हढी ही आतां घाई
चालविती द्याया खांदा; मिरवितीं हाटीं. २

फुकटचा शब्द गोड
बोलला न कोणी धड,
उठविली निन्दा—झोड;
स्मशान हें निनादतें अतां स्तुति—पाठीं. ३

साद कुठें येईल का,
ह्याच अपेक्षेनें एका
तुडविले तिन्ही लोकां.
मिठ्या कलेवरा द्यावा अतां आप्तदाटी. ४

हयातीत आगडोंब
विझविण्या एक थेंब
मिळाला न; आतां कुंभ—
किती रिकामे हे होती तिलांजलीसाठीं. ५

उभविला स्नेह—गाथां
पाचोळाच आला हातां,
खिळेठोक झाली माथां;
अस्थिवरी देवालयें आतां नदीकांठीं. ६

मिळावया ऊब कोठें
झिजवितां उंबरठे
बंद दार जेथें तेथें
धूपारती शेजारती अतां दिनरातीं. ७

सतावून यावज्जीव
ओलांडतां आतां शीव,
दाखविती प्रेमभाव
परिमार्जनाची धन्य तुझी ही रहाटी ! ८

२४ जून १९३३ ]

## शृंखलेस शाप आणि उःशाप : : ७

( जाति : मुद्रिका )

निर्माता :—

ही खळखळ करिसी काय म्हणुनि शृंखले ?
हें गीत काय हर्षाचें ? कीं हृदय विषादें उले ?
हा इसम खुनी त्वां करीं पदीं जखडिला
ह्याविना जीविता व्हावा तुज हेतु कोणता भला ?
धामांतुनि निपजे दाम तया जो हरी
अंगार ठेवि जो किंवा अबलांच्या शीलावरी
पाशांत तुझ्या करकचुनि तया फिरवितां
मिरवणुक सामर्थ्याची का तुझ्या न ती तत्त्वतां ?
पखवाज नि चिपळ्या टाळ भागल्यावरी
ती प्रभावशाली होई तव सुरांतली माधुरी.
मग खेद कशाला धर्मनीतिपालिके ?
करुं नकोस खळखळ; मानी सार्थक हें जन्मीं निकें !

शृंखला :—

समजूत महाराज ही घालितां जरी
हें महद्भाग्य मीं माझें मानणें केंवि अन्तरीं ?
ह्या धर्मनीति–रक्षणीं सर्वदा घडे
मज संग असंगांचा; हें दुर्भाग्य तरी केवढें !
आजन्म लागतें मला रिझविणें खला
कीं शापच सर्वस्वीं हा मानिते मनीं शृंखला.

**निर्माताः—**

शृंखले, ऐक, भूतलीं तुझे जे धनी
　　होतील धुंद पाहोनी सामर्थ्य तुझें शासनीं.
अधिकारमदें बेबंद आणि वागुनी
　　योजितील तुज सुजनींही विधिनिषेध गुंडाळुनी
रंजल्या गांजल्या गणुनि आप्त, जे कुणी
　　डिवचतील सत्तांधांना ते येतिल तव बंधनीं.
त्या पुण्यश्लोकांचिया पदीं लागुनी
　　उद्धार करुनि घे; देऊं उःशाप काय ह्याहुनी ?

५ नोव्हेंबर १९३८ ]

## वंदन तुज मायभूमी : : ८

( जाति : धवलचंद्रिका )

वंदन तुज मायभूमि ! हें अखेरचें !
न कळे तव दर्शन कधिं फिरून व्हायचें !
विसकटली बसवावी फिरुन ती घडी
तव काजीं झिजवावी शक्य तों कुडी,
आशेची फोल परि भ्रमुनि वावडी
देशोधडि लागे ही आज बापुडी.
आंचवलों जननीच्या सौख्यकारणा
आंचवलों तेविं तुझ्या क्लेशवारणा.
काय म्हणूं परि समाप्ति ही तुला रुचे ?
वंदन तुज मायभूमि ! हें अखेरचें ! १

यश मळलें उजळाया फिरुन त्याप्रती,
तळमळलों धडपडलों निशिदिनीं किती;
परि भूवरि पाय कुणी टेकुं ना दिला,
काकांचे जेविं थवे भ्रष्टल्या पिला.
काडीचा आधारहि मानिला महा;
झाली परि फसवणूक नित्य दुस्सहा.
मान उंच करुं पाहे कोंवळी कळी,
धडगत लागेल तिची केविं वादळीं ?
झिडकारुनि दिधलें जें लेंकरूं तुवां,
टाकलास ज्याच्या तूं तोडुनी दुवा,

तरि त्याच्या नच खळती अश्रु नेत्रिंचे !
वंदन तुज मायभूमि ! हें अखेरचें ! २

मरणाच्या दाढेमधिं चाललों जरी,
मरणाच्या भीतिचा न लेशही उरीं.
मरणाच्या खाईमधिं आयु कंठलें,
मरणाचें काय तया बुजगवाहुलें ?
ग्रीष्माचा दाह काय वाळल्या तृणा ?
राखेला जाळिल का अग्नि तो पुन्हां ?
परि तुझी न भेट मला व्हायची पुढें,
ह्या शल्यें हें तुटतें मात्र आंतडें.
मिळणार न अंत्यशयन गे त्वदंकिंचें
वंदन तुज मायभूमि ! हें अखेरचें ! ३

१९३९ ]

## युगंधरांचे पालुपद : : ९

जमेच ना, घडेच ना,
बनेच ना, पटेच ना. ध्रु०

ध्या तर हातीं आतां बंदुक,
चढवा पट्टे उभे आडवे

पिंड्र्यांभंवतीं
कमरेभंवतीं
छातीवरतीं

शिका, चला व्हा कडवे शूर !
घडी बसाया हवी जगाची
नवीन सुंदर शांत निरामय.
उरस्फोड कां थोडी केली ?
सिंधु आटले किति शाईचे !
बोरू मेरू-मंदाराचे
झिजले, गेले तासुन चिंबुन !
फेंसहि आला ओठांभंवतीं !

पण—

जमेच ना, घडेचना
बनेच ना, पटेच ना.

उपाय एकच उरला— बंदुक
काडतुसांची तुडुंब संदुक

खांद्यावरती
पाठीवरती
छातीवरती

चढवुन, निधड्या छातीचे व्हा.
निधडी छाती ?—
—भ्याडपणा हा !

अहो, बंदुका रोखुन धरणें
हुकुमासरशीं चाप ओढणें
किंवा वरुनी आग ओतणें
ही ?—
नामर्दांची जमवाजमवी !
भ्याडपणाची लपवालपवी !
स्वतां पराजित, दुजांस शिकवी—
" शस्त्रें म्हणजे वीरभूषणें

रणांत मरणें म्हणजे जगणें,
आवेशाचें गा हें गाणें
आणि ठरूं या जंगबहादुर ! "
—शुद्ध ढोंग हें
एकच यामधिं खरा अर्थ पण—

शूर व्हायचें जमेच ना !
जमेच ना, घडेच ना
कळेच ना, पटेच ना.

हतबुद्धांना गतीच कांहीं
मरण्यावांचुनि उरली नाहीं !
चुकांमागुनी चुका जाहल्या
एक एक त्या पुसून टाकत
हवें जावया उगमापाशीं.
' अगा सुईच्या अग्रावरती
बसणें जितुकी शक्य धरित्री
मिळेल तुज तितुकीहि न परती
—याहि चुकीच्या

चला शक्य तर जाऊं मागें.
जो तो अगदीं हेंच सांगतों, हेंच घोकते
चुका परंतू भुतांसारख्या

भेवडाविती
दांत विचकती
प्रत्येकाप्रति

चुकाच त्या कीं दाहक गोळे
धरावया चिमटींत तयांना
उचलुन बुडवायास सागरीं
कुणास छाती ? कुठें तयारी ?
उभे फिरवुनी पाठी सारे !

अहो, निघाला शिष्टाईला
अवतारी परमात्मा साक्षात्.
फलश्रुती पण ?—

जमेच ना,—घडेच ना
बनेच ना, कळेच ना.
म्हणुनि निघाले जाहिरनामे—
" पायावर जे उभे राहती
कवायतीला ते या पुढती "
कवायतींतिल परी बुटांच्या
एकमुखानें वदती टांचा
त्यांची वाचा,
ऐका, ऐका, लिहा नि वाचा—
नव्या जगाची घडी मनोहर
बसेच ना, जमेच ना
घडेच ना, पटेच ना.
निरोप देतांना मातांचीं
विदीर्ण हृदयें ठिबकठिबकतीं
थारोळीं रक्तांचीं जमतीं
घरीं नि समरीं नद्या वाहती
वाहुनि सुकती, फिरुन वाहती
आणि वाहतां गाणें गाती
ताल जयाला पडघम धरती.
शतकें गेलीं !
युगेंहि गेलीं ! !
परंतु त्यांचें एक पालुपद—
जमेचि ना, बनेच ना,
घडेच ना, पटेच ना.

सातारा, २ नोव्हेंबर १९४४ ]

# द्या आम्हांला सुळी : : १०

[ सतीचे वाण घेतलेल्या देशभक्तांची फाशी जाता वेळची मनःस्थिती ]

( जाति : समुदितमदना )

द्या आम्हांला सुळीं, जाहलों आम्ही तुमचे बळी
जगीं चिरंतन नांदतील परि अमुच्या शाण्णव कुळी
खुडून टाका अम्हांस — आम्ही दुर्वांकुर भूतळीं
पाताळापर्यंत आमुची परंतु रुजली मुळी.
काय हटवुनी हटतो सागर ? हटेल एकीकडे
उफाळेल तो दुसरीकडुनी गिळून डोंगरकडे.
ज्वालामुखिला बघतां लिंपूं ? काय कल्पना खुळी !
तोंच अनावर उद्यांस होइल जागृत शाण्णव कुळीं.
भाऊराया ! देवकिचीं हीं वधा सात अर्भकें
किती तोकडे उपाय ? त्यांनीं होणारें का चुके ?
बांधुनिया अंधारकोठड्या, वधस्तंभ रोवुनी
बलोद्धतांनो ! धराल का अवतारकार्य रोधुनी ?
शिळेवरी आपटा आमुचीं अहो शिरें कोंवळीं
सुटून तुमच्या मुठींतुनी परि शक्ति जगीं मोकळी.
द्या आम्हांला सुळीं ! जाहलों आम्ही तुमचे बळी.
अमर तत्त्व; अवतार तयाचा वाढतसे गोकुळीं.
द्या आम्हांला सुळीं आणि व्हा कलेवरांचे धनी
फोडुनि पणत्या ज्योतितत्त्व का जाई जगतांतुनी ?

द्या आम्हांला सुळीं आणखी मूठ–मूठ घ्या धुळी
रुंडमालिका अमुची त्या तर ज्योतीवर काजळी.
मरणीं अमुच्या अनेक फुलतिल लोकीं दीपावली
जेत्यांनो व्हा पराभूत हो देउनि आम्हां सुळीं.
खुशाल ह्या फांसांत गुंतवा एकेकाचा गळा.
पुरा साजरा करा आमुच्या विजयाचा सोहळा.
आजवरी जुळविली यथामति जी जीवितपुस्तिका
फांशीविण तिज नसे समुचिता भरतवाक्यगीतिका.
द्या आम्हांला सुळीं; होउं द्या कृतार्थ जन्मुनि कुळीं
पितर मुक्तिच्या मोदें म्हणतिल, " धन्य पुत्र हे बळी ! "
भावि पिढ्यांना मिरवायास्तव अपुल्या वक्षःस्थळीं
तजेल अक्षय चिन्ह द्यावया द्या आम्हांला सुळीं.

जव्हार १४।१५ मे १९४५ ]

# विष्णू वामन शिरवाडकर

१९३९ साली डमडम येथील तुरुंगातील राजबंद्यांनी अन्नत्याग केला आणि प्राणांतिक उपोषणाच्या त्यांच्या भयंकर निश्चयाने सर्व देशाचे लक्ष डमडमच्या तुरुंगाकडे वळले. त्या राजबंद्यांचे क्रांतिमय जीवन, त्यांची अचल ध्येयनिष्ठा आणि जीवन्मृतांनाही चैतन्य देणारी देशभक्ती, ही आठवून सर्वांची अंतःकरणे आदराने भरून आली.

त्या प्रसंगी लोकांना खालील काव्यपंक्ती ऐकू आल्या :

गर्जा जयजयकार क्रांतिचा गर्जा जयजयकार !
अन् वज्रांचे छातीवरती घ्या झेलून प्रहार !

हां हां म्हणता ही कविता सर्वतोमुखी झाली. त्या कवितेने लोकांच्या मनाची एकदम पकड घेतली. लोकमनाशी इतका समरस होणारा हा कवी आहे तरी कोण, अशी जिज्ञासा जागृत झाली. तेव्हा आढळून आले की, हे काव्य लिहिणारा कवी पुण्यास असतो. त्याचे नाव कुसुमाग्रज. त्या वेळी त्याचे वय २७ वर्षांचे होते. त्या कवितेपासून कुसुमाग्रजांच्याकडे रसिकांचे लक्ष जाऊ लागले. आणि त्या कवितेने व्यक्त केलेल्या अपेक्षा त्यांच्या काव्यात पूर्ण होत असल्याचे आढळून आले. आज यशवंत–गिरीशांच्या पुढील पिढीत कुसुमाग्रजांचे नाव पहिल्या रांगेत आहे असे म्हणण्यात मुळीच अतिशयोक्ती नाही.

अल्पवयात, अल्पावधीत कुसुमाग्रजांची जी काव्यवैशिष्ट्ये व्यक्त झाली आहेत, त्यामुळे त्यांच्या भावी काव्यलेखनाकडे आपण अतिशय थोर अपेक्षेने पाहू लागलो आहोत.

कुसुमाग्रजांचा जन्म १९१२ साली झाला. नाशिक येथेच त्यांचे बी. ए. पर्यंतचे शिक्षण झाले. बी. ए. झाल्यावर ते वृत्तपत्रव्यवसायात शिरले. पुण्यास व नंतर मुंबईस निरनिराळ्या वृत्तपत्रांतून व्यवसायाच्या निमित्ताने लेखन करीत असतानाच कवी म्हणून त्यांना लोक ओळखू लागले. वयाच्या २० व्या वर्षापासून त्यांनी काव्यलेखनास सुरवात केली. गेल्या तीस-पस्तीस वर्षांच्या जीवनकालात लौकिकदृष्ट्या त्यांच्यात तशी फारशी स्थित्यंतरे झाली नाहीत.

त्यात पुन्हा कुसुमाग्रजांची वृत्ती बरीचशी अंतर्मुख आहे. जाहिरातबाजीच्या या युगात तर त्यांच्यासारखा माणूस धकाधकीच्या मामल्यापासून आपणहूनच दोन हात दूर सरकून राहतो. परंतु ते शरीराने थोडे बाजूस राहत असले तरी त्यांचे कविमन भोवतालच्या जीवनातील आंदोलनातच वावरत असते. जीवनाभिमुख वृत्तीमुळेच वयाच्या मानाने त्यांच्या काव्यात व्यक्त झालेले जीवन बरेच व्यापक आणि प्रभावी आहे.

कुसुमाग्रजांनी काव्यलेखनास सुरुवात केली त्या वेळी भोवताली नामवंत कविवर काव्यलेखन करीत होते. काव्याची नवी परंपरा तांबे, माधव जूलियन, यशवंत व गिरीश यांच्या काव्यांतून प्रस्थापित झाली होती. अनेक उदयोन्मुख आणि उदित कवी या ज्येष्ठ कवींच्या पावलावर पाऊल टाकून काव्यलेखन करू लागले होते. समकालीन कविबांधवांप्रमाणे कुसुमाग्रजांनीही प्रणयभावनेच्या विविध लीला उत्कटपणे वर्णन केल्या.

एक करीं मधुगीतें
हात तुझा अन्य करीं
शीळ निशा वाजविते
चंद्रकला डोइवरी.

अशी मधुर धुंदीची चित्रेही ते रंगवीत होते. प्रणयपूर्ती हेच जीवनाचे सारसर्वस्व आहे असे कविमन सांगत होते. प्रणयपूर्तीबद्दल निराशा झाली तरी,

आठवें तुझ्या तें
प्रीतीचें मोहळ
आणि हो बिछाना
आगीचा ओहळ !

अशा स्थितीतच हळहळत बसलेले ते दिसत असत. या वृत्तीची छाया त्यांच्या ' जीवनलहरी ' या काव्यसंग्रहात पडलेली दिसते. परंतु वैयक्तिक जीवनाच्या मर्यादेपलीकडचे अथांग जीवन त्यांना हळूहळू कळू लागले आणि द्राक्षकन्येच्या मोहाने रंगविलेली स्वप्ने कोलमडून पडली.

# विष्णू वामन शिरवाडकर

१९३९ साली डमडम येथील तुरुंगातील राजबंद्यांनी अन्नत्याग केला आणि प्राणांतिक उपोषणाच्या त्यांच्या भयंकर निश्चयाने सर्व देशाचे लक्ष डमडमच्या तुरुंगाकडे वळले. त्या राजबंद्यांचे क्रांतिमय जीवन, त्यांची अचल ध्येयनिष्ठा आणि जीवन्मृतांनाही चैतन्य देणारी देशभक्ती, ही आठवून सर्वांची अंत:करणे आदराने भरून आली.

त्या प्रसंगी लोकांना खालील काव्यपंक्ती ऐकू आल्या :

गर्जा जयजयकार क्रांतिचा गर्जा जयजयकार !
अन् वज्रांचे छातीवरती घ्या झेलून प्रहार !

हां हां म्हणता ही कविता सर्वतोमुखी झाली. त्या कवितेने लोकांच्या मनाची एकदम पकड घेतली. लोकमनाशी इतका समरस होणारा हा कवी आहे तरी कोण, अशी जिज्ञासा जागृत झाली. तेव्हा आढळून आले की, हे काव्य लिहिणारा कवी पुण्यास असतो. त्याचे नाव कुसुमाग्रज. त्या वेळी त्याचे वय २७ वर्षांचे होते. त्या कवितेपासून कुसुमाग्रजांच्याकडे रसिकांचे लक्ष जाऊ लागले. आणि त्या कवितेने व्यक्त केलेल्या अपेक्षा त्यांच्या काव्यात पूर्ण होत असल्याचे आढळून आले. आज यशवंत–गिरीशांच्या पुढील पिढीत कुसुमाग्रजांचे नाव पहिल्या रांगेत आहे असे म्हणण्यात मुळीच अतिशयोक्ती नाही.

अल्पवयात, अल्पावधीत कुसुमाग्रजांची जी काव्यवैशिष्ट्ये व्यक्त झाली आहेत, त्यामुळे त्यांच्या भावी काव्यलेखनाकडे आपण अतिशय थोर अपेक्षेने पाहू लागलो आहोत.

कुसुमाग्रजांचा जन्म १९१२ साली झाला. नाशिक येथेच त्यांचे बी. ए. पर्यंतचे शिक्षण झाले. बी. ए. झाल्यावर ते वृत्तपत्रव्यवसायात शिरले. पुण्यास व नंतर मुंबईस निरनिराळ्या वृत्तपत्रांतून व्यवसायाच्या निमित्ताने लेखन करीत असतानाच कवी म्हणून त्यांना लोक ओळखू लागले. वयाच्या २० व्या वर्षापासून त्यांनी काव्यलेखनास सुरुवात केली. गेल्या तीस-पस्तीस वर्षांच्या जीवनकालात लौकिकदृष्ट्या त्यांच्यात तशी फारशी स्थित्यंतरे झाली नाहीत.

त्यात पुन्हा कुसुमाग्रजांची वृत्ती बरीचशी अंतर्मुख आहे. जाहिरातबाजीच्या या युगात तर त्यांच्यासारखा माणूस धकाधकीच्या मामल्यापासून आपणहूनच दोन हात दूर सरकून राहतो. परंतु ते शरीराने थोडे बाजूस राहत असले तरी त्यांचे कविमन भोवतालच्या जीवनातील आंदोलनातच वावरत असते. जीवनाभिमुख वृत्तीमुळेच वयाच्या मानाने त्यांच्या काव्यात व्यक्त झालेले जीवन बरेच व्यापक आणि प्रभावी आहे.

कुसुमाग्रजांनी काव्यलेखनास सुरुवात केली त्या वेळी भोवताली नामवंत कविवर काव्यलेखन करीत होते. काव्याची नवी परंपरा तांबे, माधव जूलियन, यशवंत व गिरीश यांच्या काव्यांतून प्रस्थापित झाली होती. अनेक उदयोन्मुख आणि उदित कवी या ज्येष्ठ कवींच्या पावलावर पाऊल टाकून काव्यलेखन करू लागले होते. समकालीन कविबांधवांप्रमाणे कुसुमाग्रजांनीही प्रणयभावनेच्या विविध लीला उत्कटपणे वर्णन केल्या.

एक करीं मधुगीतें
हात तुझा अन्य करीं
शीळ निशा वाजविते
चंद्रकला डोइवरी.

अशी मधुर धुंदीची चित्रेही ते रंगवीत होते. प्रणयपूर्ती हेच जीवनाचे सारसर्वस्व आहे असे कविमन सांगत होते. प्रणयपूर्तीबद्दल निराशा झाली तरी,

आठवें तुझ्या तें
प्रीतीचें मोहळ
आणि हो बिछाना
आगीचा ओहळ !

अशा स्थितीतच हळहळत बसलेले ते दिसत असत. या वृत्तीची छाया त्यांच्या 'जीवनलहरी' या काव्यसंग्रहात पडलेली दिसते. परंतु वैयक्तिक जीवनाच्या मर्यादेपलीकडचे अथांग जीवन त्यांना हळूहळू कळू लागले आणि द्राक्षकन्येच्या मोहाने रंगविलेली स्वप्ने कोलमडून पडली.

'जीवनलहरी'तील कुसुमाग्रज नव्या जाणिवेने 'विशाखे'त प्रगट झालेले दिसतात. आज कुसुमाग्रजांना 'विशाखे'च्या द्वारेच आपण ओळखतो. कुसुमाग्रजांनीही आपल्या पिढीतील ज्येष्ठ व श्रेष्ठ कवींच्या काव्याचे अध्ययन केले, परंतु अनुकरणाचा मोह त्यांना कधी झाला नाही. त्यांचे व्यक्तित्व लोकांच्या लक्षात येण्यास काहीसा विलंब लागला त्याचे हे एक कारण आहे. भोवतालच्या जीवनाचा रसास्वाद घेत असता आणि त्या रसानुभवाचा आविष्कार करीत असता कुसुमाग्रजांनी आपल्या विचारपद्धतीचे आणि प्रतिभेचे निराळेपण स्पष्टपणे व्यक्त केले आहे. त्यांचे काव्य वाचीत असता प्रा. जोग यांनी म्हटल्याप्रमाणे "–आपण काही निराळे काव्य वाचीत आहो या भावनेनेच वाचक अर्धा अधिक जिंकला जातो."

भोवतालच्या काव्यसंभारातून कुसुमाग्रजांची कविता निराळी दिसते याचे पहिले कारण कुसुमाग्रजांचे काव्यप्रांतातील बहुतेक सहप्रवासी तारुण्य-सुलभ अशी कमजास्त उत्तान प्रणयाचित्रेच अद्याप रंगवीत आहेत. शरीरनिष्ठ सौंदर्याच्या प्रथमदर्शनाने येणारी धुंदी, त्या धुंदीचाच एक परिणाम म्हणजे प्रेममूर्ती हेच जीवनसर्वस्व वाटणे, आणि अद्भुतरम्य स्वप्नाळू ध्येयवादाची चित्रे रंगविणे, सर्वस्व पणाला लावून आराधना आणि याचना करणे या भावनांनीच काव्यप्रांत दुमदुमत असता हा तरुण कवी आपल्या प्रियेचे गळ्यातले हात बाजूस करून सांगतो :

काढ सखे, गळ्यातील
तुझे चांदण्याचे हात
क्षितिजाच्या पलीकडे
उभे दिवसाचे दूत !

वैयक्तिक सुखाशांच्या स्वप्नांची अशी समाप्ती होणे अपरिहार्य झाले आहे. भोवतालच्या जीवनाचे स्पष्ट दर्शन झाले की मग त्याकडे डोळेझाक करून आपल्या वैयक्तिक स्वप्नसृष्टीत मन रंगून जाऊ शकत नाही, याची कवीला किती स्पष्ट जाणीव आहे हे त्यांच्या काव्यात जागोजाग दिसते. परंतु याचा अर्थ जीवन म्हणजे एक शोककथा असा नाही. आपल्यापुरता विचार करताना आपणांस वाटते तितके किंवा तसे ते केवळ फुलामुलांचे नंदनवन नाही एवढेच. जीवन म्हणजे :

पुढें पसरला अथांग दरिया
सखे, किनाऱ्यावरती आपण
—जीवित दर्यापरी,
नसें तें.—

कवी स्पष्टच सांगतो :

केवळ सुंदर, केवळ भीषण

जीवनसागरातून आपली नाव हाकारावयाची आहे. तेथे भरती–ओहोटी वारंवार अनुभवास येणारच. अशा प्रवासात—

जपलीं ध्येयें जीं हृदयाशीं
गमलीं मजला जीं अविनाशी

ती सर्व स्वप्ने ठरतात आणि

रवि येतां क्षितिजावर वरती
दंवापरी विरल्या आकांक्षा
जगींच जिरल्या मनीं जिगीषा

सामाजिक जीवनाची जाणीव न ठेवता रचलेले वैयक्तिक जीवनाचे मनोरे असे ढासळले तरी त्यामुळे हताश होण्याचे कारण नाही.

मृत आशांच्या चितांवरुनिया
पिशाच माझें भटकत राहे
शांति नसेचि तया

असे कुसुमाग्रजांस वाटत नाही. कारण ते सांगतात, संकुचित जीवितातील सुखस्वप्ने वितळली तरी :

हांसत झांकुनि त्या अवशेषा
करणें आहे प्रवास पुढती.

समस्थिजीवनाच्या मैदानात उतरल्यावर जीवनाचे जे सत्यस्वरूप कळते त्याची चित्रे त्यांनी आपल्या कवनातून अतिशय उत्कटपणे रंगविली आहेत.

त्यांच्या काव्यात आपल्या सामाजिक जीवनाची स्पष्ट ओळख होऊ लागल्यामुळे एका टीकाकाराने कुसुमाग्रजांना ‘ लोककवी ’ म्हटले आहे.

आपल्या सामाजिक जीवनात अरेरावी माजली आहे. विविध प्रकारे माणुसकीचा छळ होत आहे आणि दुर्बलांची पायमल्ली होत आहे. परंतु आता त्या अरेरावीतूनच असंतोषाचे आक्रोश ऐकू येऊ लागले आहेत.

ओतीत विखारी वातावरणीं आग

अस सत्तामदे झिंगलेले नाग इतक्या दिवस फणा वर करून हिंडत होते. त्यांच्या दराऱ्यामुळें

पर्णांवर सुमनें मोडुनि माना पडतीं
थरथरतीं झुडुपें हादरती नववेली
जणुं गुलाम सारे या सम्राटापुढती !

पण त्या नागाला आता कोणी तरी बजावून सांगू लागले आहे :

हां थांब ! कुणाची जाळिमधें चाहूल,
—रे नकूल आला ! आला देख नकूल !

आजपर्यंत दास्यशृंखलात जखडलेले बळी आता बळवन्तांना आव्हान देत आहेत. कारण जुलमाच्या अतिरेकातूनच क्रांतीचे सामर्थ्य उत्पन्न झाले आहे. आता विजयोन्मत्तांच्या विजयोन्मादाऐवजीं क्रांतीचा जयजयकार ऐकू येईल अशी कवीला खात्री वाटत आहे. त्यामुळे कुसुमाग्रजांच्या कवितेत दलितांची दुःखे रंगविलेली दिसली तरी त्या दुःखांत मुक्ततेची सिद्धता आणि आवेश आहे. ते प्रभाकरास प्रार्थना करतात :

हा कांठोकांठ कटाह भरा !
ज्वाळांत जळूं द्या तम सारा.
—वेताळांचे उठोनिया गण
चितेभोंवतीं धरून रंगण
स्मशानभूवर करिती नर्तन,
द्या मुक्ति महंता, निशाचरां
हा कांठोकांठ कटाह भरा !

कुसुमाग्रजांची ही प्रार्थना वाचली, क्रांतीचा जयजयकार ऐकला की, तांबे यांनी केलेले आव्हान रुद्राने स्वीकारल्याची खात्री पटू लागते. रुद्र क्रांतिकारकाच्या रूपाने अवतरला आहे.

बलशाली मरणाहुन आहे अमुचा अभिमान

असे मृत्युंजय मातृभूमीस आत्मविश्वासाने सांगत आहेत—

कशास आई, भिजविसि डोळे उजळ तुझें भाल,
रात्रीच्या गर्भात उद्यांचा असे उष:काल

विनायकांनी असे निक्षून सांगितले नव्हते का की,

पूर्व दिव्य ज्यांचें त्यांचा रम्य भाविकाळ

तो रम्य भाविकाळ क्षितिजावर दिसू लागला आहे. कुसुमाग्रजांची दृष्टी त्या भावी काळावर खिळलेली दिसते. नव्या जगासाठी अथांग आणि अज्ञात दरियात जहाज लोटणाऱ्या कोलंबसाच्या डोलकाठीवर पाखरे बसू लागली आहेत. किनाऱ्याची अस्फुट रेषा त्याला दिसू लागली आहे. आता तो सागराला आवाज चढवून सांगत आहे :—

" हजार जिव्हा तुझ्या गर्जु दे प्रतिध्वनीनें त्या
समुद्रा, डळमळु दे तारे !
—अनंत अमुची ध्येयासक्ती अनंत अन् आशा
किनारा तुला पामराला ! "

या तरुण कवीबद्दल श्री. खांडेकर यांनी म्हटले आहे :

" त्यांची प्रतिभा जीवनाच्या आकाशाचा कोपरान् कोपरा उद्या उजळू शकेल. आपली कविता ही मुरली नाही, ती तलवार आहे याची योग्य जाणीवही त्यांना आहे. या तलवारीला कल्पकतेच्या सुंदर आणि बळकट मुठीची जोडही सुदैवाने मिळाली आहे.

ज्या समाजरचनेत गरिबाच्या जगण्याच्या हक्काचा 'लिलाव' मांडला जातो ती समाजरचना शक्य तितक्या लवकर नष्ट झाली पाहिजे असा आवेश वाचकांच्या मनात उत्पन्न करण्याची शक्ती या कवीत निःसंशय आहे.

♠ ♠ ♠

# स्वप्नाची समाप्ती : : १

( छंद : पादाकुलक )

स्नेहहीन ज्योतीपरी मंद होई शुक्रतारा,
काळ्या मेघखंडास त्या किनारती निळ्या धारा
स्वप्नासम एक एक तारा विरे आकाशांत
खिरे रात्र कणकण प्रकाशाच्या सागरांत !
काढ सखे, गळ्यांतील तुझे चांदण्याचे हात
क्षितिजाच्या पलीकडे उभे दिवसाचे दूत ! १

रानपांखरांचा आर्त नाद नच कानीं पडे
संपवुनी भावगीत झोंपलेत रातकिडे !
पहांटचे गार वारे चोरट्यानें जगावर
येती, पाय वाजतात वाळलेल्या पानांवर.
शांति आणि विषण्णता दाटलेली दिशांतुन
गजबज गर्जवील जग घटकेनें दोन !
जमूं लागलेलें दंव गवताच्या पातीवर
भासते भू तारकांच्या आसवांनीं ओलसर !
काढ सखे, गळ्यांतील तुझे चांदण्याचे हात
क्षितिजाच्या पलीकडे उभे दिवसाचे दूत ! २

प्राजक्ताच्या पावलाशीं पडे दूर पुष्प-रास
वाऱ्यावर वाहती हे त्याचे दाटलेले श्वास !
ध्येय, प्रेम, आशा यांची होतसे का कधीं पूर्ति
वेड्यापरी पूजतों या आम्ही भंगणाऱ्या मूर्ति !
खळ्यामध्यें बांधलेले बैल होवोनिया जागे
गळ्यांतील घुंगुरांचा ध्वनि कानीं येऊं लागे
आकृतींना दूरच्या त्या येऊं लागे रूप-रंग
हालचाल कुजबूज होऊं लागे जागोजाग.
काढ सखे, गळ्यांतील तुझे चांदण्याचे हात
क्षितिजाच्या पलीकडे उभे दिवसाचे दूत ! ३

होतें म्हणूं स्वप्न एक एक रात्र पाहिलेलें
होतें म्हणूं वेड एक एक रात्र राहिलेलें !
प्रकाशाच्या पावलांची चाहूल ये कानांवर
ध्वज त्याचे कनकाचे लागतील गडावर.
ओततील आग जगीं दूत त्याचे लक्षावधी
उजेडांत दिसूं वेडे ! आणि ठरूं अपराधी ४

नाशिक, १३–४–३६ ]

# कोलंबसाचे गर्वगीत : : २

(जाति : माधवकरणी)

हजार जिव्हा तुझ्या गर्जु दे प्रतिध्वनीनें त्या
समुद्रा, डळमळुं दे तारे !
विराट वादळ हेलकावुं दे पर्वत पाण्याचे
ढळूं दे दिशाकोन सारे ! १

ताम्रसुरा प्राशून मातुं दे दैत्य नभामधले
दडूं द्या पाताळीं सविता
आणि तयांची ही अधिराणी दुभंग धरणीला
कराया पाजळुं दे पलिता ! २

कीं स्वर्गातुन कोसळलेला, सूड—समाधान
मिळाया प्रमत्त सैतान
जमवुनि मेळा वेताळांचा या दर्यावरती
करी हें तांडव थैमान ! ३

पदच्युता, तव भीषण नर्तन असेंच चालूं दे
फुटूं दे नभ माथ्यावरती
आणि तुटूं दे अखंड उल्का वर्षावत अग्नी
नाविकां ना भय वा भीती ! ४

सहकाऱ्यांनो, कां ही खंती ? जन्म खलाशांचा
झुंजण्या अखंड संग्राम
नक्षत्रापरि असीम नीलामधें संचरावें
दिशांचें आम्हांला धाम ! ५

काय सागरीं तारुं लोटलें परताया मागें ?
असे का हा अपुला बाणा ?
त्याहुन घेऊं जळीं समाधी सुखें, कशासाठीं
जपावें पराभूत प्राणा ! ६

कोट्यवधी जगतांत जिवाणूं जगती अन् मरती
जशीं तीं गवताचीं पातीं,
नाविक आम्ही परंतु फिरतों सात नभाखालीं
निर्मितों नव क्षितिजें पुढतीं ! ७

मार्ग आमुचा रोधूं शकती ना धन, ना दारा
घराची वा वितभर कारा !
मानवतेचें निशाण मिरवूं महासागरांत
जिंकुनी खंड खंड सारा ! ८

चला उभारा शुभ्र शिडें तीं गर्वानें वरती
कथा या खुळ्या सागराला
" अनंत अमुची ध्येयासक्ती अनंत अन् आशा
किनारा तुला पामराला ! " ९

नाशिक, १९३६ ]

## टिळकांच्या पुतळ्याजवळ— : : ३

( जाति : द्राक्षकन्या )

पुळणींत टेकलें माथें श्रांत अधीर,
दर्यावर होता वाहत मंद समीर,
काजळले होते गगनाचे कंगोरे,
कल्लोळत अन्तरिं कांहिंतरी काहूर ! १

उद्दाम निराशा करि तांडव हृदयांत,
घोंगावें वादळ जेवीं जीर्ण गडांत
सांदींत बसूनी रातकिड्यांची सेना
निज आक्रोशानें निनादवी घन रात ! २

तों वळले डोळे न कळत बाजुस वरती,
दृष्टींत डोंगरापरी भरे ती मूर्ती,
क्षण एक आंतला शांत गल्बला झाला,
ओसरतां वारा जशी स्थिरावी ज्योती. ३

ती कणखर मूर्ती धीट मराठी थाट
आदळतो जीवर अजून पश्चिम–वात
ती अजिंक्य छाती ताठर अन् रणशील
जी पाहुनि सागर थबके; परते आंत ! ४

कंगाल खोपटी कोळ्यांचीं पायाशीं
वर असीम गगनीं नक्षत्रांच्या राशी,
तमलांछित सागर पसरे या बाजूस,
उन्मत्त गोपुरें दूर टेकडीपाशीं ! ५

तें होतें जीवित—हातीं धरुनि हताश
खळखळती ज्यांवर दृढ पोलादी पाश,
ध्वज चढवायांची एक अदम्य मनीषा
तें होतें जीवित—अन् हा जीवितभास ! ६

कण क्षुद्र घेउनी सुखदु:खांचे हातीं,
बेहोष धावतों जीवनमार्गावरती,
पर्णापरी वाऱ्यावरती हलतो, डुलतो
जों धूळींत लाभे अखेरची विश्रांती ! ७

हें जीवन कसलें, ही मरणांची माला,
मासोळी झटते तोडायास गळाला,
दर्यावर आहे दुभंगलेली नाव
क्षण खालीं, वरती, क्षणांत आणि तळाला ! ८

मुंबई, १९३६ ]

# हिमलाट : : ४

( जाति : द्राक्षकन्या )

हिमलाट पहांटे पहा जगावर आली !
मुखिं पिळून मद्यास्तव द्राक्षांचे घोस
पाडीत मळे मोत्यांचे चरणीं ओस
उद्दाम धावते करित दुभंग धरेस
कराकरां पांखरें रगडी दांताखालीं
हिमलाट पहांटें पहा जगावर आली ! १

श्रीमंत महालीं तिथें हिला ना थारा
मखमाली दुलया देती मधुर उबारा
डोकावुन पळते कांपत हीच थरारा
हो काय दरारा कनकाचा भयशाली
हिमलाट पहांटे पहा जगावर आली ! २

पाहून परंतु कुठें कुडाचीं खोपीं
कंगाल कांबळी टाकुन गेले झोपीं
शेंकडों कवाडें ! वाट जावया सोपी
कडकडून पडते तेथें लांब भुकेली
हिमलाट पहांटे पहा जगावर आली ! ३

ज्योतींतुन धावत या तेजःकण सारे
या यज्ञांतिल अन् सरणांतील निखारे
रे ढाळ नभा, तव ते ज्वालामय तारे
पेटवुं द्या वणवा कणाकणांत मशाली
हिमलाट पहांटे पहा नभावर आली ! ४

नाशिक, १९३६ ]

## बळी : : ५

(गझल : देवप्रिया)

दूर देशीं राहिलेलें दीन त्याचें झोपडें !
बापुडा अन् आज येथें पायवाटेला पडे !
शोधण्याला भाकरीचा घांस आला योजनें
आणि अंतीं मृत्युच्या घांसांत वेडा सांपडे ! १

लाज झांकाया कटीला लावलेलीं लक्तरें
अन् धुळीनें माखलेलें तापलेलें कातडें !
आर्त डोळ्यांतून सारीं आटलेलीं आसवें
आंत दावाग्नीच पेटे ओढ घेई आंतडें ! २

झांकल्या डोळ्यांस होती भास, दोहीं लेंकरें
हात घालोनी गळ्याला ओढती खोप्याकडे—
नादला झंकार कानीं कंकणाचा कोठुनी
काळजाला तो ध्वनी भिंगापरी पाडी तडे ! ३

भोंवतींचे उंच वाडे, क्रूरतेनें हांसती
मत्त शेजारून कोठें आगगाडी ओरडे !
आणि चक्रें चाललीं तीं—हो महालीं गल्बला
चाललाही प्राण याचा पापणी खालीं पडे ! ४

थांबल्या त्या हालचाली, थांबलें काळीज हो
आणि माशांचा थवा मुद्रेवरोनी बागडे !
ना भुकेचा यापुढें आक्रोश पोटीं चालणें
याचनेचे दीन डोळे बंद झाले यापुढें ! ५

यापुढें ना स्वाभिमाना लागणें आतां चुडा
अंतराला आसुडाचे घाव माथीं जोखडें !
मानवाच्या संस्कृतीची काय लागे ही ध्वजा
तीस कोटी दैवतांच्या कीं दयेचें हें मढें ? ६

मूक झालेल्या मुखानें गर्जतें का प्रेत हें ?
घालिती हे बंद डोळे का निखाऱ्याचे सडे ?
अन् अजूनी हांसती उन्मत्त हो प्रासाद ते ?
वेग–वेड्या वाहनांचा घोष ये चोहींकडे ! ७

भेकडांनो, या इथें ही साधण्याला पर्वणी
पेटवा येथें मशाली अन् झडूं द्या चौघडे !

मुंबई, १९३७ ]

# पृथ्वीचे प्रेमगीत

: : ६

( वृत्त : सुमंदारमाला )

युगामागुनी चाललीं रे युगें हीं
करावी किती भास्करा ! वंचना
किती काळ कक्षेंत धावूं तुझ्या मी
कितीदां करूं प्रीतिची याचना !

न्हाळींतले ना उमाळे, उसासे
न ती आग अंगांत आतां उरे
विझूनी अतां यौवनाच्या मशाली
उरीं राहिले काजळी कोपरे ! –

परी अंतरीं प्रीतिची ज्योत जागे
अविश्रांत राहील अन् जागती;
न जाणें, न नेणें कुठें चाललें मी
कळे तूं पुढें आणि मी मागुती ! ≡

दिमाखांत तारे नटोनी थटोनी
शिरीं टाकिती दिव्य उल्का–फुलें
परंतू तुझ्या मूर्तिवांचून देवा,
मला वाटतें विश्व अंधारलें ! ४

तुवां सांडलेले कुठें अंतराळीं
वेंचूनिया दिव्य तेजःकण
मला मोहवाया बघे हा सुधांशू
तपाचार स्त्रीकारुनी दारुण. ५

पिसारा प्रभेचा उभारून दारीं
पहांटे उभा शुक्र हा प्रेमळ
करी याचना प्रीतिची लाजुनी लाल
होऊनिया लाजरा मंगळ. ६

निराशेंत संन्यस्त होऊन बैसे
ऋषींच्या कुळीं उत्तरेला ध्रुव
पिसाटापरी केस पिंजारुनी हा
करी धूमकेतू कधीं आर्जव ! ७

परी भव्य तें तेज पाहून पूजून
घेऊं गळ्यांशीं कसे काजवे !
नको क्षुद्र शृंगार तो दुर्बळांचा
तुझी दूरता त्याहुनी साहवे ! ८

तळीं जागणारा निखारा उफाळून
येतो कधीं आठवोन वर
शहारून येतें कधीं अंग, तूझ्या—
स्मृतीनें उले अन् सले अंतर ! ९

गमे कीं तुझ्या रुद्र रूपांत जावें
मिळोनी गळां घालुनीया गळा
तुझ्या लाल ओठांतली आग प्यावी
मिठीनें तुझ्या तीव्र व्हाव्या कळा ! १०

अमर्याद मित्रा, तुझी थोरवी अन्
मला ज्ञात मी एक धूलीकण
अलंकारण्याला परी पाय तूझे
धुळीचेंच आहे मला भूषण ! ११

१९३७ ]

## अहि-नकुल : : ७

(जाति : द्राक्षकन्या)

ओतीत विखारी वातावरणीं आग
हा वळसे घालित आला मंथर नाग
मधुनीच उभारी फणा करी फूत्कार
ये ज्वालामुखिला जणूं अचानक जाग ! १

कधिं लवचिक पातें खड्गाचें लवलवतें,
कधिं वज्र धरेवर गगनांतुन कडकडतें,
कधिं गर्भरेशमी पोत मधें जरतार,
प्रमदेचें मादक वस्त्र जणूं सळसळतें ! २

मार्गावर याच्या लवत तृणाचीं पातीं
पर्णांवर सुमनें मोडुनि माना पडतीं
थरथरतीं झुडुपें हादरती नववेली
जणुं गुलाम सारे या सम्राटापुढतीं ! ३

चालला पुढें तो—काय ऐट ! आनंद !
अग्नीचा ओघळ ओहळतो जणुं मंद,
टाकली यमानें कट्यार वा कनकाची
चालली बळीचा वेध घेत ही धुंद ! ४

वा तांडव करितां सोम प्राशुनी काली—
रक्तांत नाहली, शिरमुंडावळ भालीं,
थयथया नाचतां नरड्यांवर प्रेमांच्या,
हें कंकण निखळुनि पडलें भूवर खालीं ! ५

चालला पुढें तो लचकत मुरडत मान,
अवतरे मूर्तिमान् मल्हारांतिल तान !
चांचल्य विजेचें, दर्याचें गांभीर्य
चालला मृत्युचा मानकरीच महान ! ६

हां थांब ! कुणाची जाळिमधें चाहूल,
अंगार-कणापरि नयन कुणाचे लाल,
आरक्त ओठ ते ध्वजा जणूं रक्ताच्या
रे नकूल आला ! आला देख, नकूल ! ७

थबकलाच जागीं सर्प घालुनी वळसा,
रिपु समोर येतां सोडुनि अन् आडोसा,
भूमीस मारुनी मागें तीव्र तडाखा,
घे फणा उभारुन मरणाचा कानोसा ! ८

पडलीच उडी ! कीं तडितेचा आघात !
उल्केपरि तळपत कण्यांत घुसले दांत,
विळख्यांवर विळखे कसून चढवी सर्प,
फुंफाट करी अन् पिशापरी त्वेषांत ! ९

रण काय भयानक, लोळे आग जळांत !
आदळती, वळती, आवळती क्रोधांत;
  जणुं जिंकायासी गगनाचें स्वामित्व
आषाढघनांशीं झुंजे वादळवात ! १०

क्षणिं धुळींत गेली वहात ती विषधार,
शतखंडित झालें तें गर्वोन्नत ऊर,
  विच्छिन्न तनूंतुनि उपसुनि काढुनि दांत
वाऱ्यापरि गेला नकुल वनांतुनि दूर ! ११

संग्राम सरे, रक्तांचे ओघळ जाती
आनंदें न्हातीं त्यांत तृणाचीं पातीं
  पिंजून कापसापरी पडे तो नाग,
ते खंड गिळाया जमले कीटक भोंतीं ! १२

पुणे, १९३८ ]

# क्रांतीचा जयजयकार : : ८

(अन्नत्याग करून मृत्यूच्या दारात पाऊल टाकताना राजबंद्यांच्या ओठावर असले गाणे स्फुरले नसेल काय?)

(जाती : मिश्र चंद्रकान्त)

गर्जा जयजयकार क्रांतिचा गर्जा जयजयकार
अन् वज्रांचे छातीवरती घ्या झेलून प्रहार!
खळखळुं द्या या अदय शृंखला हातापायांत
पोलादाची काय तमा मरणाच्या दारांत?
सर्पांनो, उद्दाम आवळा कसूनिया पाश
पिचेल मनगट परी उरांतिल अभंग आवेश
तडिताघातें कोसळेल का तारांचा संभार

कधींही तारांचा संभार

गर्जा जयजयकार क्रांतिचा गर्जा जयजयकार! १

क्रुद्ध भूक पोटांत घालुं द्या खुशाल थैमान
कुरतडुं द्या आंतडी, करूं द्या रक्ताचें पान
संहारक काली, तुज देती बळीच आव्हान
बलशाली मरणाहुन आहे अमुचा अभिमान?
मृत्युंजय आम्ही! अम्हांला कसलें कारागार?

अहो, हें कसलें कारागार?

गर्जा जयजयकार क्रांतिचा गर्जा जयजयकार! २

पदोपदीं पसरून निखारे अपुल्याच हातीं
होउनिया बेहोष धावलों ध्येयपथावरती
कधिं न थांबलों विश्रांतीस्तव, पाहिलें न मागें
बांधुं न शकले प्रीतीचे वा कीर्तीचे धागे
एकच तारा समोर आणिक पायतळीं अंगार

होता पायतळीं अंगार

गर्जा जयजयकार क्रांतिचा गर्जा जयजयकार ! ३

श्वासांनो, जा वायूसंगें ओलांडुन भिंत
अन् आईला कळवा अमुच्या हृदयांतिल खंत
सांगा " वेडीं तुझीं मुलें हीं या अंधारांत
बद्धकरांनीं अखेरचा तुज करिती प्रणिपात
तुझ्या मुक्तिचें एकच होतें वेड परी अनिवार

तयांना वेड परी अनिवार—"

गर्जा जयजयकार क्रांतिचा गर्जा जयजयकार ! ४

नाचवितां ध्वज तुझा गुंतले शृंखलेंत हात
तुझ्या यशाचे पवाड गानां गळ्यांत येतात
चरणांचें तव पूजन केलें म्हणुनि गुन्हेगार
देतां जीवन–अर्घ्य तुला ठरलों वेडपीर
देशिल ना पण तुझ्या कुशीचा वेड्यांना आधार

आई, वेड्यांना आधार

गर्जा जयजयकार क्रांतिचा गर्जा जयजयकार ! ५

कशास आई, भिजविसि डोळे उजळ तुझें भाल
रात्रीच्या गर्भांत उद्यांचा असे उष:काल
सरणावरतीं आज आमुचीं पेटतांच प्रेतें
उठतिल त्या ज्वालांतुन भावी क्रांतीचे नेते
लोहदंड तव पायांमधले खळाखळा तुटणार
आई खळाखळा तुटणार
गर्जा जयजयकार क्रांतिचा गर्जा जयजयकार ! ६

आतां कर ओंकारा ! तांडव गिळावया घांस
नाचत गर्जत टाक बळींच्या गळ्यावरील फांस
रक्तमांस लुटण्यास गिधाडें येउं देत क्रूर
पहा मोकळें केलें आतां त्यासाठीं ऊर
शरिरांचा कर सुखेनैव या सुखेनैव संहार
मरणा, सुखेनैव संहार
गर्जा जयजयकार क्रांतिचा गर्जा जयजयकार ७

पुणे, १२-७-३९ ]

# मूर्ति-भंजक : : ९

( छंद : जीवनलहरी )

जगाचा गल्बला जगांत सोडून
प्रेमाचीं मृणाल– बंधनें तोडून—
होता तो भ्रमिष्ट भ्रमत एकला
नादांत अगम्य टाकीत पावलां !
वर्तलें नवल डोंगरकपारीं !
गवसे प्रतिमा संगमरवरी !
हर्षाचा उन्माद आला त्या वेड्याला
घेऊन मूर्ति ती बेहोष चालला,
आढळे पुढती पहाड उभार
वेड्याच्या मनांत कांहीं ये विचार.
थांबवी आपुला निरर्थ प्रवास,
दिवसामागून उलटे दिवस—
आणिक अखेरीं राबुन अखंड
वेड्यानें खोदलें मंदिर प्रचंड.
चढवी कळस घडवी आसन,
जाहली मंदिरीं मूर्त ती स्थापन !
नंतर सुरू हो वेड्याचें पूजन !
घुमतें कड्यांत नर्तन गायन !
रान अन् भोंतींचें स्फुंदतें सकाळीं.
ठेवी हा वेलाना ना फूल ना कळी !

विचारी आश्चर्यें तृणाला ओहोळ
' कोण हा हिरावी रोजला ओंजळ ? '
परंतु मूर्त ती बोलेना हलेना
वेड्याचें कौतुक कांहींही करीना !
सरलें गायन सरलें नर्तन.
चाललें अखेरीं भीषण क्रंदन !
पडून तिच्या त्या सुंदर पायाशीं
ओरडे रडे तो उपाशीतापाशी !
खुळाच ! कळे न पाषाणापासून
अपेक्षा कशाची उपेक्षेवांचून !
वैतागे, संतापे, अखेरीं क्रोधानें
मूर्तीच्या ठिकऱ्या केल्या त्या भक्तानें !
रित्या त्या मंदिरीं आतां तो दाराशीं.
बसतो शोधत कांहींसें आकाशीं.
वाटेचे प्रवासी मंदिरीं येतात
आणिक शिल्पाची थोरवी गातात.
पाहून परंतु मोकळा गाभारा
पाषाणखंडांचा आंतला पसारा—
त्वेषानें बोलतो जातांना रसिक
'—असेल चांडाळ हा मूर्तिभंजक !—'

१९४१ ]

## ताजमहाल : : १०

( जाति : भूपतिवैभव )

वर पूर्ण चंद्रमा पसरी माया-जाल
वसुधेच्या वदनीं लहरे हास्य सलील
  तें समूर्त होउन तीरावर यमुनेच्या
हिमशुभ्र उभा हा संगमरवर विशाल ! १

कुणि देवदूत वा फुलवुनि पंख फुलांचे
तीरावर वसला मोजित कण शतकांचे
  दे सुवर्ण-पूजक जनतेला संदेश
'—धन एकच आहे—जगतीं अमर कलेचें—' २

कीं कालिंदीवर करण्याला जल-केली
कुणि यक्षलोकिंची रूपगर्विता आली
  ती नितळ दर्पणीं विवस्त्र होउनि पाही
निज लावण्याची उसासलेली वेली ! ३

वा काव्य मनोहर, हो रचनेंत बहार
यमकांपरि गमती भव्य समान मिनार
  वर विहग कल्पना कलानंद बेहोष
तळिं समाधिस्थ हो पण कारुण्य अपार ! ४

पुनवेच्या अथवा सुधाशयावर शान्त
जल-विहार करुनी राजहंस विश्रान्त !
  चंद्रिका-मधूनें भरे धरेचा पेला
हा तरंग मोत्यापरी तरारे त्यांत ५

जें घुमलें स्फुरलें असंख्यशा हृदयांत
प्रीतीचें उज्ज्वल उन्मादक संगीत
मधुगीतांची त्या कीं मंजूळ लकेर
चालली युगांतुन एका अन्य युगांत ! ६
कीं ब्रह्मांडाच्या अथांग या कासारीं
ग्रह-नक्षत्रांचीं फुललीं कमलें सारीं
भू-पद्माच्या या एक पाकळीवरती
हा थेंब दंवाचा विलसे विमल रुपेरी ! ७
हा अमर मानवी प्रतिभेचा शृंगार !
तो उन्मन होता अथवा रचनाकार
स्वप्नांत पाहिला इंद्र-महाल उठोनी
या धवल शिलेंतुन करी स्वप्न साकार ! ८
कीं असत्य केवळ प्रणयाचें प्राचीन !
नसलेलें दैवत, मंदिर मात्र महान
वर उदात्ततेचे हे स्वर्गीय मनोरे
दडलेली खालीं देहलालसा हीन ! ९
कामान्ध शहाचे सजवायास पलंग
अपराध एकला ज्यांचा स्त्रीत्व अपंग
ओढल्या किती त्या रमणी राणिवशांत !
तो असे अनात्मा, नाहीं मदन अनंग ! १०
शत अनामिकांचें त्या हें कब्रस्तान
त्या अबल-आसवांचें हें करुणनिधान
मखमली उशीपरि अवघें जीवित-कार्य
हो मृदुल मंचकावर ज्यांचें बलिदान ! ११

१९४३ ]

# टीपा

## गेली ज्योति विझोनिया

**स्थंडिल**—यज्ञासाठी केलेला मातीचा ओटा. हा साधारणतः एक हात चौरस व चार अंगुळे उंच असतो.

**घूर्ण**—घुमणारा.

## नववधू

**भरभरणें**—घेरी आल्यासारखें वाटणें.

## घनतमीं

**अवस**—पहाट, रात्र.

## रुद्रास आवाहन

माधवराव पटवर्धन यांनी या कवितेविषयी पुढील मार्गदर्शन केले आहे : ‘ कडव्यांचा अनुक्रम पुढीलप्रमाणे घेऊन अर्थात भर पडेल : ४–३–२–१ अशा क्रमाने कडवी वाचली तर कविता प्रभावी होते, तीत विलक्षण नवीन अर्थ गोचर होतो आणि ती न्यायतृष्णेच्या निराशेची शेवटली हृदयभेदक नव्हे तर ब्रह्माण्डविदारक आरोळी वाटते असा अनुभव आहे. ’

‘ पूर्वि नरसिंह तूं ’ हे कडवे ३ डिसें. १९२० रोजी लिहिले आहे. इतर कडवी २६ नोव्हें. १९२० रोजी लिहिली आहेत.

**उडु–मक्षिका**–( उडु–नक्षत्र ) नक्षत्ररूपी माशा.

**दिग्गज**—पृथ्वीच्या आठ दिशांस हत्ती असून त्या अष्ट दिग्गजांनी पृथ्वी उचलून धरली आहे अशी पौराणिक कल्पना आहे.

**करटि**—करवंटी.

## रिकामे मधुघट

**कोरांटी**—एक फुलझाड. ते ३।४ हात उंच असते. त्याच्या सर्वांगास काटे असतात. फुलास वास नसतो. फुले पांढरी, तांबडी, पिवळी, निळी अशा विविध रंगांची असतात. फुलांत मध फार असतो.

## झलरी

**सजण**—प्रियकर, सखा.

**इर्जिक**—पेरणी, काढणी वा मळणी या वेळी पुष्कळ गडी कामाला लावतात. त्या गड्यांना न्याहारी, जेवण आणि संध्याकाळी मोठे जेवण देतात. अशा अन्नरूपाने दिलेल्या मोबदल्यास इर्जिक म्हणतात.

## शांतिस्थान

**विंझणवारा**—( व्यजन – पंखा – विंझण ) आल्हाददायक वारा.

**वंशतरू**—वेळूचे झाड.

**गवतुन**—गवताळणे – गवताने झाकून जाणे.

**डगरी**—डगर—नदीच्या तीराची किंवा टेकडीची दरड.

**फुलारी**—फुलमाळी.

**हीरक**—हिरा, रत्न.

## सुंदर हिरवे माळ

**नवती**—नवी पालवी.

**सुढाळ**—चांगल्या घडणीचा, सुरेख पाणीदार ( मोती ).

**जोगवलेली**—चांगली पोसलेली.

## मानसमेघ

**यक्षसंदेश**—कालिदासाने मेघदूत नावाचे अतिशय उत्तम काव्य लिहिले. त्या काव्यात एका यक्षाने मेघाकरवी आपल्या प्रिय पत्नीस संदेश पाठविला अशी भूमिका आहे.

**उमेचे तेज**—उमा (पार्वती ) ही हिमालयाची मुलगी. तिने शंकराची प्राप्ती व्हावी म्हणून उग्र तपश्चर्या केली आणि शेवटी शंकरास ( गिरीशास ) प्रसन्न केले.

**उर्वशी पुरुदर्शनी**—पुरूरवा राजा हा सोमवंशाचा मूळ पुरुष. उर्वशी नावाची अप्सरा देवाने शाप दिल्यामुळे स्वर्गातून पृथ्वीवर पतन पावत असता, तिला एका दैत्याने पकडले आणि तो तिला घेऊन जाऊ

लागला. तेथे पुरूरवा आला. उर्वशीचे सौंदर्य पाहून तो मोहित झाला. उर्वशीस त्याने दैत्यापासून सोडविले. पुरूरव्याबरोबर ती राहू लागली. पुढे उर्वशीने घातलेल्या अटी पुरूरव्याने मोडल्यामुळे ती परत जावयास निघाली. त्या वेळी पुरूरव्याने व्याकुल चित्ताने तिची याचना केली.

**शुक–कंचनी**—व्यासाचा पुत्र शुक. तो तपश्चर्या करीत असता त्यास मोहिनी घालून त्याच्या तपश्चर्येची कसोटी पाहण्यासाठी देवांनी रंभा नावाची अप्सरा पाठविली होती. रंभेने अनेकांस जिंकले परंतु शुकापुढे ती पराभूत झाली.

**कंचनी**—नर्तकी.

**बोधिसत्त्व**—सिद्धार्थ गौतम हा ज्ञानप्राप्तीसाठी तपश्चर्या करीत असता त्याला पुन्हा राज्यात परत नेण्यासाठी संसारमोहात मग्न करण्यास राज-देवांगना आल्या, त्या पराभूत होऊन परत गेल्या. त्याच या मेघमालेच्या रूपाने येथे दिसत आहेत काय ?

**अंगारणे**—( अंगार – आग ) जळफळणे, धुमसणे.

**मानदंड**—कालिदासाने हिमालयास मानदंड म्हटले आहे.

**अश्रणी**—( अशरीरिणी ) देववाणी, आकाशवाणी.

## दौल्याची दिवाळी

**झिळमिळ**—पगडीस लावलेला कलाबतूचा झुवका.
**पोटभकाळी**—उपासमारीने पोटास पडलेली खळगी.
**काळी**—शेतीची जमीन.
**भांगलणे**—शेत निंदणे.
**हेळ**—पाण्यासाठी खणलेला खोल झरा.
**काम्बुरनं**—पांघुरणी.
**गडणि**—गडण–मैत्रीण, सखी. गडणि हे संबोधन आहे.

## चांदण्यातील हुरहूर

**चुकूर**—अस्थिर, चुकल्यासारखे.

## रसिकांस

**वायवी**—वाऱ्यासारखे तरल.
**अवगुंठन**—ओढणी, बुरखा.

## संगमोत्सुक डोह

**प्रदोषसमय**—सायंकाळ,
**खेव**—आलिंगन. **काषायरंग**— भगव्या रंगाचा.

## सर्वा खल्वियं माया

**लवण**—नदीचे वाकण, सखल जमीन.
**मरीचि**—किरण.

## तेथे चल राणी

**रात्रवितानीं**—वितान = छत, मंडप, विस्तार.
**अनिकेत**—निराश्रित.

## ताजमहाल

**सुरधुनी**—गंगा.

**अजविलाप**—रघुकुलातील राजा अज याने आपली पत्नी इंदुमती हिच्या निधनप्रसंगी केलेला विलाप.

**पांडुर**—पांढुरका.

**जगत्किल्मिष**—किल्मिष—दोष, पाप.

## आई

प्रा. लागू यांनी ' साहित्य-सुवर्ण ' या पुस्तकात ही कविता घेताना ५ वे आणि ६ वे कडवे गाळले आहे. आणि १-२-३-४ आणि ७ अशी कडवी घेऊन कविता संपादिली आहे. हा फरक त्यांनी कवीच्या संमतीने केला आहे. मधली दोन कडवी गाळून राहिलेली पाच कडवी लागोपाठ वाचली तर नाट्यगीत या दृष्टीने कवितेतील उत्कटता चांगली व्यक्त होते.

**कुठार**—कुऱ्हाड

## मांडवी

**कवेंत**—मिठीमध्ये, विळख्यात.

**खळभारमुक्त शेष**—पृथ्वीवर पापकृत्यांचा कहर गुदरला की, पृथ्वी डोक्यावर धारण करणाऱ्या शेषास त्याचा भार असह्य होतो. त्या दुष्टांचा नाश करून वीर पुरुष शेषाचा भार दूर करतात.

**मिरास**—वंशपरंपरा मिळणारी संपत्ती, वतनदारी.

**खनाळ**—गुहा, डोंगरकपार.

**आनंदवनभुवन**—रामदासांनी महाराष्ट्रास उद्देशून हा शब्द योजिला आहे. औरंगजेबाच्या मृत्यूनंतर महाराष्ट्रात जे वातावरण निर्माण झाले त्याला उद्देशून रामदास म्हणतात :

बुडाला औरंग्या पापी
म्लेंच्छसंहार जाहला,
मोडिलीं, मांडलीं क्षेत्रें
आनंदवनभूवनीं

## अखेरचें मागणें

**रुस्तुमी**—शौर्य, पराक्रम.

**विद्रुम**—पोवळ्याचें झाड.

**कादंबिनी**—मेघमाला.

## अखेरचें वंदन

'बंदिशाळा' नावाच्या दीर्घकाव्यातील हे एक गीत आहे. लहानपणी बाप वारला आणि आई पराधीन होऊन मोलमजुरीने पोट भरू लागली. अशा स्थितीत संजीवास (या गीतातील नायकास) योग्य ते वळण लागले नाही. तो अशा अनाथ स्थितीतच वाईट संगतीने बालगुन्हेगार ठरला आणि बंदिशाळेत त्याची रवानगी झाली. तेथे असताना वाढत्या वयाबरोबर त्याला आपल्या हातून झालेल्या प्रमादांचा पश्चात्ताप झाला आणि बंदिशाळेतून

मुक्त झाल्यावर आपल्या जीवनाची घडी नीट बसवावी असा त्याने निश्चय केला. परंतु तो बाहेर आला त्या वेळी त्याला समजले की, बालवयात अज्ञानाने जरी आपल्या हातून गुन्हा झाला, त्याबद्दल आपण शिक्षाही भोगली, तरी समाजाने आपल्या कपाळावर ‘ गुन्हेगार ’ असा कायमचा शिक्का मारला आहे. आपण आपले जीवित शुद्ध करण्यासाठी कितीही तळमळलो तरी “ काकांचे जेविं थवे भ्रष्टल्या पिला ” तशी आपली सर्वत्र हेटाळणी होत राहणार ! संजीवास वाटे :

पोरपणामधिं चुकून घडलें असेल कांहीं पाप.
प्रायश्चित्तास्तव शिक्षेचें पुरें दिल्यावर माप.
एक वेळचा कैदी परि का माणुसकीला मुकला ?
पालवीस का मुकतें पुरतें जितें मनाचें झाड ?

परंतु त्याला शेवटी असेच आढळून आले.

‘ जिणें नव्हे हें बंदिवास हा जग हें बंदीशाळा ! ’ जीवनाचे शुद्धीकरण तर राहोच, पण पोटापुरतेही मिळविणे संजीवास अशक्य झाले. तो जाईल तेथे त्याची बालवयातील गुन्हेगारी त्याचा घात करी. अशा स्थितीत भटकत असता महायुद्धाचे वारे वाहू लागले, आणि निराश्रित, निराधार, तिरस्कृत असे लोक लष्करात भरती होऊ लागले. संजीवानेही शेवटी तोच मार्ग स्वीकारला. कारण :

जिवावरी जो उदार झाला त्यास शिपायीबाणा
कां न सुचावा ज्यांत दाखला कुणी न पाहि पुराणा

पुन्हा त्याला बंदिशाळेतून बाहेर आल्यापासून आईचाही शोध लागला नव्हता. कुणासाठी जीव जगवावा त्याने ?

संजीव सैनिक झाला. त्याची पलटण विलायतेस जाण्यास निघाली. संजीव गाडीत बसला, गाडी सुरू झाली आणि :

तोंच अचानक संजीवाच्या दृष्टी पडली जननी !

मायलेकरांची अशी ताटातूट झाली. दुसऱ्या दिवशी संजीव बोटीवर उभा होता. मायभूमीचा किनारा हळूहळू दुरावत चालला.

नव्हती आशा कीं आईचें घडेल दर्शन फिरुन
रुद्ध जाहला कण्ठ तयाचा, आर्द्र लोचनें मिटलीं
जुळले गेले हातहि कांहीं ओठदळें पुटपुटलीं
'वंदन तुज मायभूमि ! हे अखेरचें
न कळे तव दर्शन कधिं फिरुन व्हायचें !'

## युगंधरांचें पालुपद

दुसऱ्या जागतिक महायुद्धाचा शेवट जसजसा जवळ येऊ लागला तसतसा 'युद्धोत्तर पुनर्घटना! युद्धोत्तर पुनर्घटना!' ह्या विषयाचा ऊहापोह वर्तमानपत्रांतून ठळकपणाने होऊ लागला. विश्वचिंता वाहणाऱ्या महाभागांच्या तोंडी ही जी शब्दसंहती घोळू लागली ती जरी चालू युगाची असली तरी तिच्यामागील कल्पना नवीन नाही. नमुनेदार समाजरचना व राज्यव्यवस्था अस्तित्वात येऊन, अखिल मानवजातीला शाश्वत सुखशान्तीचा लाभ घडावा हा हेतू प्रत्येक युगन्धराच्या अन्तःकरणात घोळत आला आहे. ह्याच महान कार्यासाठी परमेश्वराने 'संभवामि युगे युगे' असे आश्वासन दिले आहे. अशा रीतीने इतके अवतार झाले असूनही, अजून समाजरचनेची आदर्श सिद्धता होत नाही.

आम्ही मानव, बुद्धी हे आमचे वैभव, इतर प्राण्यांपेक्षा आमचा ह्या बाबतीत वरचढपणा, आम्ही आमचे अवघड प्रश्न बुद्धीच्या जोरावर सोडवू शकतो. तथापि ह्याही दृष्टीने पाहू जाता, आमच्या मार्गातील धोंड बुद्धिबळाने बाजूला सरकेनाशी झाली, की, "बरं तर ! आता उद्या आपली समरांगणातच भेट" असा निर्वाणीचा मार्ग पत्करावा लागतो. प्रत्येक युगाला अशाच प्रकारे पाशवी शक्तीचा अंगीकार करावा लागला आहे. सारांश, बुद्धिसामर्थ्याची शेखी मिरवता मिरवता पाशवी शक्तीची कास धरावयाची आणि मग युद्धोत्तर पुनर्घटनेबद्दल विवंचना करावयाची. तेव्हा

साकल्याने पाहू जाता सर्व युगंधरांच्या अंतर्यामी हेच पालुपद घोळत असेल की :

जमोचि ना,	घडेचि ना
कळेचि ना,	पटेचि ना,

[ कवीच्याच शब्दांत या कवितेची पार्श्वभूमी वर दिली आहे. ]

## स्वप्नाची समाप्ती

**खिरणें**—कमी होणे, विरून जाणे.

## टिळकांच्या पुतळ्याजवळ

**पुळणी**—वाळूचे मैदान.
**गोपुर**—गावाची सेवा, सुंदर शिल्पकाम केलेले देवळाचे प्रवेशद्वार.

## अहि-नकुल

**मंथर**—संथ, रेंगाळत चालणारा.

**तांडव करतां काली**—पार्वतीलाच श्यामल वर्णामुळे काली म्हणतात. विश्वप्रलयाच्या वेळी काली अतिशय भयंकर नृत्य करू लागली तेव्हा शंकराने स्वतःचे शरीर तिच्या पायाखाली लोटले. ते पाहिल्याबरोबर ती दचकली, तिने जीभ चावली आणि नृत्य थांबविले.

१६९९०
REFBK-0016960
REFBK-0016960
ठाणे, स्वकम
अनुक्रम ... ६७२८०
दिनांक ... २०/१२/६९